नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ५५ * अंक १८१ * * नागपूर * बुधवार, दिनांक १ ऑक्टोबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्रालेख

## खरीखरी..

### श्रीमंत महाराष्ट्राचे असेही दुखणे

गेल्या काही वर्षात आपल्या देशात राज्यातील सरकारांचे अनेक नमुने आपल्याला पहावयास मिळालेले आहेत. काही राज्ये इंजिनाशिवाय निवडून येतात, काही राज्यांमध्ये एक इंजिन असते. तर काही राज्ये दोन इंजिनाची असतात. आपला महाराष्ट्र दोन इंजिनांचा आहे. कारण, अनेक राज्यात दोन इंजिनाचे सरकार आल्यावर त्या त्या राज्यावर फारच मोठी मेहरबानी होते असे सांगितले गेलेले आहे. पण महाराष्ट्राचा अनुभव यापेक्षा फार वेगळा आहे सरकार एक इंजिनचे असो किंवा दोन इंजिनाचे असो महाराष्ट्रात तर तिसरेही इंजिन आहे असेही म्हणतात. एवढी इंजिनांची रांग लागल्यावर आपल्या सौभाग्यशाली महाराष्ट्राला वणवण का फिरावे लागत आहे हे मात्र कळत नाही. आपले मुख्यमंत्री पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लाडकेच आहेत. मुख्यमंत्र्यांनी अतिशय जोरदारपणे महाराष्ट्रावर आलेल्या संकटाची कल्पना केंद्र सरकारला दिली आहे हे त्रिकालाबाधित सत्य आहे. तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंजाब, हिमाचल प्रदेश या एक इंजिनी सरकारला केंद्राची मदत जाहीर केली, त्या राज्यांचा दौराही केला. इतरही काही राज्य वर्षाग्रस्त होती त्यांनाही मदत जाहीर करण्यात आली. परंतु 'महाराष्ट्रा विना राष्ट्रगाडा न चाले' असे ज्या महाराष्ट्राचे वर्णन आहे त्यातील गाडा म्हणजे महाराष्ट्राला 'गाडा' (म्हणजे जमिनीखाली गाडा) असे समजावे काय. यावर्षी महाराष्ट्रातील अनेक दुर्दैवी शेतकऱ्यांनी स्वतःला गाडून घेतलेले आहे. एका ठिकाणी एका शेतकऱ्याने आधी बायकोला मारले आणि मग स्वतः जीव दिला. जल भीषणतेच्या अशा प्रकारच्या अनेक सत्यकथा दररोज कानावर येत आहेत. ते ऐकल्यावर किंवा वाचल्यावर डोळ्यांसमोर जे भीषण वास्तव येते. ते मात्र केंद्र सरकारला ठाऊक नाही, असे कोण म्हणेल. कारण सरकार कोणाचेही असो महाराष्ट्रावर सतत अन्याय होतच असतो. हाच आपल्या स्वातंत्र्योत्तर काळातील इतिहास आहे. तसे पाहिले तर महाराष्ट्र राज्य १९९५ सालापर्यंत कर्जविहीन राज्य होते. त्यानंतर या श्रीमंत राज्याला कर्ज घेणे भागच पडले. आता तर कर्ज खोरीमध्ये महाराष्ट्राच्या डोक्यावर सात आकडी रकमेचे काही लाख कोटींचे असे कर्ज आहे. ज्या योजना आणि जी खर्चिक आश्वासने महाराष्ट्रातील निवडणुकांपूर्वी धडाधड देण्यात आली होती ती पूर्ण करता करता सध्या नाकात तोंडात पाणी जात आहे. म्हणजे आपली परिस्थिती 'बडा घर पोकळ वासा' अशी आहे. अशा या महाराष्ट्ररुपी बड्या घरावर केंद्र सरकारची बडी मेहरबानी होईल आणि आपण हाहा म्हणता अस्मानी आपत्तीचा मुकाबला करू, असे जे काही आपल्याला वाटत होते ते सपशेल धुळीस मिळालेले आहे. कारण इतक्या महाभीषण आपत्ती नंतरही केंद्र सरकारने एक छदामही महाराष्ट्रासाठी दिलेला नाही असे म्हणतात. शेतकऱ्यांनी कर्ज घेऊन शेती पेरली आणि पाऊस असा काही आला की बिचाऱ्यांची सगळी आशा आकांक्षा जिरली. अशा परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने स्वबळावर मदत निधी उपलब्ध करण्याचा निर्धार आज व्यक्त केला आहे. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्यातील सर्व जिल्ह्याच्या डीपीडीसीचा पैसा की, ज्या पैशामुळे त्या त्या जिल्ह्याचा विकास होत असतो त्यालाच कात्री लावून त्यातीलच दहा टक्के निधी पर्जन्यग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वळवण्यात आलेला आहे. आता खरोखरच असे म्हणावेसे वाटते की,

*'तुज वनराजा अशी काय दशा आली,*
*थुंकलेले चाटण्याची बुद्धी कशी झाली'*

थोडक्यात महाराष्ट्राने यापुढे केंद्राची आशा धरू नये, मदत मिळेल ही आशा ठेवावी, जरूर ठेवावी. पण मिळाली नाही तर इतर अनेक मार्ग आहेतच. राज्यातील सत्ताधारी पक्षाचे आणि विरोधी पक्षाचे आमदार-खासदार, सहा आकडी पगार घेणारे आपले अधिकारी, त्यासोबतच सिनेतारक आणि सिनेतारका आणि सर्वात महत्त्वाचे, महाराष्ट्राच्या शिरपेचात म्हणजेच मुंबईत बसलेले उद्योगपती मग त्यामध्ये अर्ध्या मुंबईचे मालक असणारे काही दाणी त्यांच्यासोबत काही बाणी यांनी महाराष्ट्रातील मरणासन्न असलेल्या शेतकऱ्यांवर कृपा करावी. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना किमान अर्धी भाकर तरी खाता येईल एवढी व्यवस्था करावी. दिलेले कर्ज मागू नका आणि इतर दुखणे सांगू नका. काहीही करा आपल्या आत्महत्येच्या प्रदेशाला आणखीन बदनाम होऊ देऊ नका. एवढीच नम्र विनंती आहे!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# राज्यात ओल्या दुष्काळाच्या सर्व सवलती लागू!

मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा ■ पुढच्या आठवड्यात निर्णय ■ दिवाळीपूर्वी मदत ■ ई-केवायसीची अट शिथिल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

महाराष्ट्रभर झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. यामुळे विरोधकांकडून राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज यापूर्वी राज्यात केव्हाही ओला दुष्काळ जाहीर झाला नसल्याचे स्पष्ट केले.

दुष्काळ काळात लागू करण्यात येणाऱ्या सर्व उपाययोजना सध्याच्या काळात लागू करण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचे ते म्हणाले. सरकारकडून करण्यात येणारी मदत शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पोहोचती केली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी प्रामुख्याने अधोरेखित केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वात आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली.



या बैठकीनंतर बोलताना फडणवीसांनी उपरोक्त माहिती दिली. ते म्हणाले, मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आलेत.

गेल्या काही महिन्यांत महाराष्ट्रात सातत्याने अतिवृष्टी झाली. त्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. या प्रकरणी लाखो हेक्टरचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सरकारने ऑगस्टपर्यंतच्या नुकसानीसाटी २२१५ कोटी रुपये वितरित करणे सुरू केले आहे. ई-केवायसीची अट शिथिल करून हे पैसे देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यासंदभार्तील कारवाई सरकारने सुरू केली आहे.

**शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत**

ते पुढे म्हणाले, पावसामुळे झालेल्या नुकसानीची आकडेवारी पुढील दोन-तीन दिवसांत आमच्यापर्यंत पोहोचेल. काही ठिकाणी पाणी असल्यामुळे योग्य प्रकारे असेसमेंट करता येत नव्हते. पण पुढच्या २-३ दिवसांत ही संपूर्ण माहिती आमच्यापर्यंत पोहोचेल.

त्यानंतर शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे एक सर्वंकष धोरण तयार करून त्यांना योग्य ती मदत केली जाईल. या सर्व मदतीची घोषणा पुढच्या आठवड्यात केली जाईल. विशेषतः शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी सर्व मदत मिळावी असा सरकारचा प्रयत्न आहे.

फडणवीस पुढे म्हणाले, राज्यात सातत्याने ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत असते. पण मॅन्युअलमध्ये ओला दुष्काळ कुठेही नाही. आजपर्यंत कधीही ओला दुष्काळ जाहीर झाला नाही.

तथापि, सरकारने हा निर्णय घेतला आहे की, ज्यावेळी दुष्काळ पडतो, ज्यावेळी ज्या - ज्या उपाययोजना व सवलती आप देतो, त्या सगळ्या सवलती आत्ता लागू केल्या जातील. मुळात ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीचा अर्थच असा असतो की, दुष्काळ काळातील सवलती लागू झाल्या पाहिजेत. सरकारने या सर्व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

## भाजप नेते विजय कुमार मल्होत्रा यांचे दीर्घ आजाराने निधन

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :

भाजपचे ज्येष्ठ नेते विजय कुमार मल्होत्रा यांचे मंगळवारी सकाळी वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून ते दिल्लीच्या एम्समध्ये दाखल होते. आज सकाळी एम्सने त्यांच्या निधनाची घोषणा केली.



मल्होत्रा हे ४० वर्षांहून अधिक काळ दिल्लीच्या राजकारणात एक प्रमुख व्यक्ती होते. त्यांनी पाच वेळा संसद सदस्य आणि दोन वेळा दिल्लीचे आमदार म्हणून काम केले. विजय मल्होत्रा १९८० मध्ये दिल्लीचे प्रदेश समितीचे पहिले अध्यक्ष बनले. १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत मल्होत्रा यांनी दक्षिण दिल्लीतून काँग्रेस उमेदवार मनमोहन सिंग यांचा पराभव केला. हा त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

२००४ च्या लोकसभा निवडणुकीत, दिल्ली संसदीय जागेवर विजय मिळवणारे ते एकमेव भाजप उमेदवार होते. २००८ च्या निवडणुकीत त्यांना पक्षाचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणूनही सादर करण्यात आले होते. तथापि, काँग्रेसने त्या वर्षीही विजयाची मालिका सुरू ठेवली.

**मोदींनी व्यक्त केला शोक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विजय कुमार मल्होत्रा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आणि त्यांच्यासोबतचा एक फोटो शेअर केला. मोदींनी म्हटले आहे की, विजय कुमार मल्होत्रा हे सार्वजनिक प्रश्नांची सखोल समज असलेले एक महान नेते होते.

## जिल्हा वार्षिक निधीतील पैसे पूरग्रस्तांच्या मदतीसाठी खर्च करण्यास मंजुरी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० : मराठवाडा आणि राज्यातील इतर भागांमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीनंतर, सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता अतिवृष्टीग्रस्त जिल्ह्यांना जिल्हा वार्षिक योजनेतील निधीतून आर्थिक मदत करता येणार आहे.

या नव्या निर्णयामुळे पूरग्रस्त भागांमध्ये मदतीसाठी निधी उपलब्ध करून देताना जिल्हाधिकाऱ्यांना आता सरकारच्या मंजुरीची वाट पाहावी लागणार नाही. आता जिल्हा वार्षिक योजनेच्या एकूण निधीपैकी पाच टक्के रक्कम स्थानिक पातळीवरच आपत्कालीन मदतीसाठी वापरता येईल.

यापूर्वी ही मुभा केवळ टंचाईसारख्या संकटांसाठी होती. मात्र आता पूर, अतिवृष्टी आणि गारपीट यांसारख्या आपत्तीग्रस्त भागांनाही या निधीतून मदतीचा मार्ग खुला झाला आहे.

या निर्णयामुळे विशेषतः मराठवाडा, परभणी, अमरावती, अकोला, धाराशिव आणि सोलापूरसह अतिवृष्टीचा मोठा फटका बसलेल्या जिल्ह्यांतील नागरिकांना तातडीचा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## विभागीय आयुक्तालयात घुसले शेतकरी



■ वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. ३० : संतप्त शेतकरी व कामगार आज आपल्या विविध मागण्यांसाठी थेट विभागीय आयुक्तालयात घुसलेत. अखिल भारतीय किसान सभा, महाराष्ट्र सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन आणि महाराष्ट्र अखिल भारतीय शेतमजूर युनियन यांच्यावतीने शेतकरी नेते डॉ. अजित नवले यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर निदर्शने आयोजित करण्यात आली होती.

दुपारी २ वाजेच्या सुमारास आंदोलकांनी अचानक आयुक्तालयात प्रवेश केला. मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करणे, शेतकऱ्यांना प्रति एकर ५० हजार रुपये पीक नुकसान भरपाई देणे, शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी लागू करावी अशा अनेक मागण्यांसाठी आंदोलन करीत संतप्त शेतकरी चक्क कार्यालयात घुसले.

## कर्करोग उपचारासाठी सर्वसमावेशक धोरण

महाकेअर फाऊंडेशनची स्थापना : मंत्रिमंडळाचे निर्णय

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० : महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळ बैठकीत आज अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. नागरिकांच्या आरोग्य सेवेपासून ते औद्योगिक विकास, ऊर्जा क्षेत्रातील सुधारणा, नियोजनातील तांत्रिक प्रगती आणि न्यायव्यवस्थेच्या बळकटीकरणापर्यंत विविध स्तरांवर परिणाम करणारे हे निर्णय आहेत.

या बैठकीत घेतलेल्या निर्णयांमुळे राज्यातील जनजीवन अधिक सक्षम होईल, तसेच प्रशासनाची कार्यक्षमता वाढेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागामार्फत नागरिकांसाठी कर्करोग उपचाराचे सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्यात आले आहे. राज्यभरातील रुग्णांना दर्जेदार आणि त्रिस्तरीय समग्र उपचार मिळावेत, यासाठी महाराष्ट्र कॅन्सर केअर, रिसर्च अँड एज्युकेशन फाऊंडेशन स्थापन होणार आहे.

या फाऊंडेशनसाठी सरकारने शंभर कोटी रुपयांचा निधी भागभांडवल स्वरूपात मंजूर केला आहे. राज्यातील एकूण १८ रुग्णालयांतून कर्करोगाशी संबंधित विशेषोपचार उपलब्ध करून देण्यात येणार असून, ग्रामीण भागातील रुग्णांनाही तज्ज्ञ सेवांचा लाभ घेता येईल. यामुळे आजवर उपचारासाठी मुंबई किंवा पुण्यासारख्या शहरांकडे धाव घेणाऱ्या रुग्णांना स्थानिक स्तरावरच सुविधा उपलब्ध होतील.

**उद्योग क्षेत्राला चालना**

राज्याच्या उद्योग विभागाने ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर धोरण २०२५ ला मंजुरी दिली आहे. या धोरणामुळे राज्यातील युवकांना रोजगाराच्या संधी मिळतील, आयटी व सेवा क्षेत्राला नवी उभारी मिळेल आणि जागतिक स्तरावर महाराष्ट्राचे स्थान बळकट होईल.

**ऊर्जाक्षेत्रात सुधारणा**

ऊर्जा विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार औद्योगिक, वाणिज्यिक व इतर श्रेणीतील ग्राहकांकडून वीज वापरावर अतिरिक्त वीज विक्री कर आकारण्यात येणार आहे. या करातून मिळणारा निधी प्रधानमंत्री कुसुम योजना (घटक-ब) आणि इतर सौर कृषीपंप योजनांवर खर्च करण्यात येणार आहे.

**नियोजन आणि न्याय क्षेत्रातही महत्त्वाचे निर्णय**

राज्याच्या नियोजन विभागाने महाजिओटेक महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. भू-स्थानिक तंत्रज्ञानचा वापर करून प्रशासनात गतिमानता आणणे, धोरणात्मक नियोजन सुलभ करणे आणि निर्णय प्रक्रियेत अचूक माहितीचा वापर करणे हा यामागील उद्देश आहे.

दुसरीकडे विधि व न्याय विभागाने सातारा जिल्ह्यातील फलटण येथे वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. यामुळे प्रलंबित प्रकरणाचा निपटारा लवकर होणार आहे.

## बिहारची अंतिम एसआयआर यादी जाहीर

■ वृत्तसंस्था, पाटणा, दि. ३० : निवडणूक आयोगाने मंगळवारी बिहारमध्ये विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) ची अंतिम यादी जाहीर केली. बिहारमधील एकूण मतदारांची संख्या आता ७४.२ दशलक्ष झाली आहे. अंतिम यादीतून ६९ लाख नावे वगळण्यात आली आहेत आणि २१.५३ दशलक्ष नवीन नावे जोडण्यात आली आहेत. मसुदा यादीतून वगळण्यात आलेल्या ६५ लाख नावांमध्ये १७ लाख नावे जोडण्यात आलीत.

२००३ नंतर पहिल्यांदाच बिहारमध्येएसआयआरप्रक्रिया राबविण्यात आली. ती २४ जून २०२५ रोजी सुरू करण्यात आली. ७२.४ दशलक्ष मतदारांकडून फॉर्म गोळा करण्यात आले. एसआयआरचा पहिला टप्पा २५ जुलै २०२५ पर्यंत पूर्ण झाला.

## शिंदेसेनेचा दसरा मेळावा गोरेगावला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा दसरा मेळावा यंदा गोरेगावच्या नेस्को मैदानावर पार पडणार आहे. राज्यातील पूरस्थिती लक्षात घेता दसरा मेळाव्यासाठी मुंबई महानगर प्रदेशमधील शिवसैनिकांना आमंत्रण देण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत याविषयी माहिती दिली.



यंदाच्या दसरा मेळाव्यासाठी मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि एमएमआरडीए परिसरातील शिवसैनिकांना आमंत्रण देण्यात आले आहे. . पूरग्रस्त भागातील कार्यकर्त्यांनी मेळाव्यासाठी न येता शेतकऱ्यांच्या मदतीला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. आम्हाला शक्तिप्रदर्शन करण्याची गरज नाही. लोकांनीच आम्हाला विजयी केले आहे. आता आमची शक्ती शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वापरणार आहोत, असेही शिंदे यांनी सांगितले.

दरम्यान, राज्यातील पूरस्थितीचे संकट लक्षात घेता शेतकऱ्यांना मदत देताना राज्य सरकार हात आखडता घेणार नाही. मदतीच्या संदर्भातील सर्व अटी, शर्थी, नियम बाजूला ठेवून शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल. राज्य सरकार त्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. यापूर्वी अटी, शर्थी बाजूला ठेवण्यात आल्या होत्या, असेही शिंदे म्हणाले.

## कोट्यवधी रूपयांचा गुटखा जप्त, तिघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी
खामगाव, दि. ३० :

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने प्रतिबंधीत गुटखा आणि वाहतूक करणाऱ्या ट्रकसह १ कोटी ४३ लाख रूपयांचा माल जप्त केला.

राज्य शासनाने प्रतिबंध केलेल्या, मानवी आरोग्यास हानीकारक गुटखा व तत्सम सुगंधीत तंवाखूजन्य पदार्थाची विक्री, वाहतूक, साठवणूक करणाऱ्यांवर कार्यवाही करण्यासाठी पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला आदेशीत केले होते. एलसीबी पीआय सुनिल अंबुलकर यांनी स्वतंत्र पथके तयार करुन कारवाई करणेबाबत सुचित केले होते.

त्यानुसार, स्थानिक गुन्हे शाखेने सापळा रचून अमरावती कडून समृध्दी महामार्गाने मुंबईकडे जात असलेले दोन ट्रक पो.स्टे. मेहकर हद्दीत फदार्पूर टोलवर पकडले. या ट्रकमधून मोठ्या प्रमाणात गुटखा व सुगंधीत पान मसाला जप्त करण्यात आला आहे.

कारवाईमध्ये दोन ट्रक चालकांसह तिघांना पकडण्यात आले. मोहम्मद इम्रान मो. हफिज (वय २८), रा. बियाबानी मोहल्ला, अचलपूर, अजीम बेग हाफिज बेग (वय ३६), रा. अन्सारनगर, अमरावती आणि एजाज अहेमद अजीज अहेमद (वय ३१), रा. शिरजगांव ता. चांदूरबाजार, अशी आरोपींची नावे असून, त्यांचे विरुध्द पो. स्टे. मेहकर येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



या कारवाईत १ कोटी १३ लाख ९७६० रूपये किमतीचा २६४ पोते गुटखा आणि ३० लाख रूपये किमतीचे अशोक लेलॅन्ड कंपनीचे दोन ट्रक असा १ कोटी ४३ लाख ९७६० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

बुलडाणा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांचे आदेशान्वये, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल अंबुलकर यांचे नेतृत्वात पोउपनि, प्रताप बाजड, अविनाश जायभाये, हेकाँ, शरद गिरी, दिपक लेकुरवाळे, पुरुषोत्तम आघाव, गणेश पुरुषोत्तम पाटील, पोकाँ, निलेश राजपूत, पूजा जाधव, समाधान टेकाळे राजू आडवे, ऋषीकेष खंडेराव यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

## आरक्षणावरून युवकाची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
वणी / यवतमाळ, दि. ३० :

ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या प्रश्नावर आंदोलन पेटले असताना वणी तालुक्यातील कायर गावातील एका युवकाने या मुद्द्यावरून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. अजय पुंडलिक शेंडे (३२), रा. कायर, असे मृताचे नाव आहे.

वणी तालुक्यातील घुग्गुस रोड टोल प्लाझा जवळील शिव मंदिराच्या मागे त्याचा मृतदेह आढळून आला. त्याने विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले. मृताच्या खिशात विषारी द्रव्य विकत घेतल्याच्या देयकावर मागील बाजूस, मी अजय शेंडे, रा. कायर ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण दिल्याने मी आत्महत्या करत आहे, हा संदेश लिहिलेली चिठ्ठी आढळली.

## सीएम बदला घेत आहेत...

■ वृत्तसंस्था, चेन्नई, दि. ३० :

तामिळनाडूतील करूर येथे झालेल्या चेंगराचेंगरीच्या दोन दिवसांनंतर, अभिनेता विजय थलापथी मंगळवारी म्हणाले, मुख्यमंत्री स्टॅलिन बदला घेण्याचा प्रयत्न करत आहेत का? आम्ही काहीही चूक केलेली नाही. जर तुम्हाला बदला घ्यायचा असेल तर माझ्याकडे या. मी तुम्हाला घरी किंवा ऑफिसमध्ये भेटेन.



त्यांनी पुढे सांगितले की, त्यांच्या पक्षाच्या अधिकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे. मी मुख्यमंत्र्यांना आवाहन करतो की, कृपया माझ्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना इजा करू नका, असे ते म्हणाले. विजय म्हणाला, लवकरच, सत्य उघड होईल. मला या घटनेबद्दल वाईट वाटते. आम्ही राजकीय प्रवासात ताकद आणि धैर्याने पुढे जाऊ.

२७ सप्टेंबर रोजी संध्याकाळी तमिळ अभिनेता विजयच्या राजकीय पक्षाच्या, टीव्हीकेच्या निवडणूक रॅलीत चेंगराचेंगरी झाली. यात ४१ जणांचा मृत्यू झाला. जखमी झालेल्या ५१ जणांना आयसीयूमध्ये ठेवण्यात आले आहे. या प्रकरणात तामिळनाडू पोलिसांनी आतापर्यंत तीन जणांना अटक केली असून काहींचा शोध सुरू आहे.



# लस निर्मितीसाठी हाफकिनला २५ कोटी

## सर्पदंशावरील दीड लाख लसी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाने खरेदी कराव्यात : अजित पवार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

लस निर्मितीच्या क्षेत्रात हाफकिन संस्थेचं मोलाचं योगदान असून देशातून पोलिओचे उच्चाटन करण्यामध्ये हाफकिनचा मोठा वाटा आहे. भारत सरकारकडून पोलिओच्या २६८ दशलक्ष मौखिक लसींची मागणी आहे. या लसींची निर्मिती करण्यासाठी हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाला हाफकिन खरेदी कक्षाच्या दोन टक्के उपकारातून २५ कोटी रुपयांचा निधी देण्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तत्वतः मान्यता देण्यात आली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाच्या प्रश्नांसंदर्भात आणि संस्थेतील निवृत्त कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतनाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर,विधान परिषद सदस्य सचिन अहिर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभागाचे सचिव धीरज कुमार, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, हाफकिनचे व्यवस्थापकीय संचालक सुनील महिंद्रकर,विधी व न्याय विभागाच्या सहसचिव अश्विनी सैनी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सहसचिव रामचंद्र धनावडे उपस्थित होते.

हाफकिन इन्स्टिट्यूट आणि हापकिन जीव औषध निर्माण महामंडळाचे सक्षमीकरण करण्यासाठी डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आलेला आहे. या समितीच्या शिफारशींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात यावी. त्यामध्ये वैद्यकीय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि नियोजन विभागाच्या सचिवांचा समावेश करावा. या समितीने हाफकीनच्या सक्षमीकरणासाठी ५ वर्षांचा रोडमॅप तयार करावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

**सर्पदंशावरील दीड लाख लस खरेदी**

सध्या हापकिनकडे सर्पदंशावरील दीड लाख लस तयार आहेत. सर्पदंशावरील हाफकिनने तयार केलेली लस प्रभावी आणि परिणामकारक आहे. या लसींची खरेदी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाने हापकिनमार्फत करावी, यावी असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिले.

## नियम-निकष लावायची ही वेळ नाही सुप्रिया सुळेंची सरकारवर टीका



**मुंबई :** राज्यात आलेल्या पूर परिस्थितीवर काय उपाययोजना करावा या संदभार्तील सविस्तर दोन पत्र आदरणीय पवार साहेबांनी राज्य सरकारला दिलेले असल्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे. या पत्रामध्ये काय उपाययोजना तातडीने कराव्या तसेच काही सूचना देखील आदरणीय पवार साहेब यांनी केले आहे. मी दोन महिन्यांपूर्वी खरंतर मी केंद्रीय मंत्री अमित शहा यांना भेटून सांगितले होते की ओला दुष्काळ जाहीर करा. आणि सरसकट कर्जमाफी करा पण आता तीव्रता आणि अतिवृष्टी एवढी वाढलेली आहे की आता दोन भागात काम करावे लागणार आहे. एक तर ओला दुष्काळ जाहीर झालाच पाहिजे. त्याचबरोबर सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजेत. ही एक बाजू तर दुसरी बाजू रिहॅबिलिटेशन बाबत देखील काम करावे लागेल. असे सुप्रिया सुळे बोलताना म्हणाल्या. राज्यात अतिवृष्टीमुळे बळीराजासह सामान्य नागरिकांचा संसार उध्वस्त झाला आहे. बळीराजाचा हातात आलेले पीक अतिवृष्टीमुळे वाहून गेले आहे. त्यामुळे बळीराजा मोठा संकटात सापडला आहे. तसेच अतिवृष्टीमुळे नागरिकांचे संसार पाण्यात वाहून गेला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शेती विषयक आणि जीवनावश्यक वस्तू बळीराजाला आणि नागरिकांना मदत म्हणून प्राथमिक स्वरूपात आज सात ते दहा दहा ट्रक राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मुंबईतील मुख्य कार्यालयातून पाठवण्यात आले, या वेळी त्या बोलत होत्या.

## १३ वर्षीय आयुषचा नाल्यात पडून मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,डोंबिवली, दि. ३० :

डोंबिवली येथे एक अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. नवरात्रीच्या भंडाऱ्यात जेवण करायला गेलेला 13 वर्षीय मुलाचा नाल्यात पडून मृत्यू झाला आहे. या नाल्याचे झाकण उघडे असल्याचे समोर आले आहे. यावेळी या मुलाच्या आई-वडिलांनी आपल्या मुलाला वाचवण्यासाठी मदतीची हाक मारली, हंबरडा फोडून याचना करत होते. मात्र, तिथे उपस्थित लोक भंडाऱ्याचे जेवण करण्यात मग्न होते. लोकांनी थोडी जरी तत्परता दाखवली असती तर या मुलाचे प्राण वाचले असते.

आयुष तब्बल दोन तास नाल्याच्या पाण्यात होता आणि लोकांनी अर्धा तास जरी आधी उपचारासाठी आणले असते, तरी त्याचा जीव वाचू शकला असता, असे डॉक्टरांनी स्पष्ट केले आहे.

त्यामुळे या प्रकरणी निष्काळजीपणा करणाऱ्या महापालिका आणि एमएमआरडीए अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. दुसरीकडे, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी मात्र या घटनेसाठी देवीच्या मंडळाला जबाबदार धरले आहे.

## पर्यटन विभागाच्या १४ लोकसेवा अधिसूचित : शंभुराज देसाई



**मुंबई:** महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' अंतर्गत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील पर्यटन संचालनालय, मुंबई आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई यांच्यामार्फत पात्र व्यक्तींना पुरविण्यात येणाऱ्या एकूण १४ लोकसेवा अधिसूचित केल्या आहेत. या सेवांसाठी नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपील प्राधिकारी निश्चित करण्यात आले असल्याची माहिती पर्यटन मंत्री शंभुराज देसाई यांनी दिली. पर्यटन विभागाच्या ११ नोव्हेंबर २०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित केलेल्या एकूण ५ सेवा या अधिसूचनेद्वारे अधिक्रमित करण्यात आल्या आहेत. या अधिसूचनेमुळे पर्यटन क्षेत्रातील गुंतवणूकदार आणि पर्यटन घटकांना वेळेवर शासकीय सेवा मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे, ज्यामुळे राज्यात पर्यटनाला अधिक चालना मिळेल. 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' नुसार, अर्जदारांना वेळेत सेवा मिळाली नाही, तर ते निश्चित केलेल्या प्रथम आणि द्वितीय अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील करू शकतात. पर्यटन संचालनालयाच्या सेवांसाठी द्वितीय अपिलीय प्राधिकारी हे प्रधान सचिव, पर्यटन विभाग आहेत.

## सिंधुदुर्ग जिल्हा साहित्य संमेलनाध्यक्षपदी कवयित्री नीरजा यांची निवड

■ महासागर प्रतिनिधी,
सावंतवाडी, दि. ३० :



महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने पुरस्कृत केलेल्या आणि श्रीराम वाचन मंदिर, सावंतवाडी या संस्थेने आयोजित केलेल्या पहिल्यावहिल्या सिंधुदुर्ग जिल्हा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवयित्री व लेखिका नीरजा यांची सन्माननीय निवड करण्यात आली आहे.

या संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ लेखक व विचारवंत डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या हस्ते होणार आहे. हे संमेलन येत्या २८ डिसेंबर रोजी येथील आरपीडी हायस्कूलच्या कविवर्य केशवसुत सभामंडपात साजरे होईल. संमेलनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत प्रा. प्रवीण बांदेकर यांनी ही घोषणा केली. कवयित्री नीरजा यांचे निरन्वय, वेणा, स्त्रीगणेशा, निरर्थकाचे पक्षी, मी माज्या थारोळ्यात इत्यादी सहा कविता संग्रह प्रकाशित झाले आहेत. कथासंग्रह (उदा. ओल हरवलेली माती, पावसात सूर्य शोधणारी माणसे) आणि थिजलेल्या काळाचे अवशेष ही कादंबरी यासह अनेक ललित लेख संग्रह आणि संपादने असे त्यांचे साहित्य विपुल आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कारासह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

संमेलनाचे उद्घाटक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे खाली जमीन वर आकाश हे आत्मचरित्र विशेष गाजले आहे. शिरोडा व कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठात ज्ञानपीठ विजेते लेखक वि. स. खांडेकर यांच्या स्मृती जतन करणारी भव्य दालने उभारण्यात त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे.

## भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात चिमुकली जखमी

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. ३० :

पुण्याच्या खेड तालुक्यातील पापळवाडी येथील घरांच्या अंगणात भटक्या कुत्र्यांनी चिमुकलीवर हल्ला केल्याचे वृत्त समोर आले आहे. या घटनेत चिमुकल्या मुलीवर कुत्र्यांच्या टोळीने थरारक हल्ला केला. मुलगी खाऊची पिशवी घेऊन घराकडे जात असताना अचानक कुत्र्यांच्या झुंडीने तिच्यावर झडप घालली. हा भयानक प्रसंग सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेत मुलगी जखमी झाली. मात्र तिच्या आरडाओरडेमुळे पालकांनी तत्काळ मुलीला कुत्र्यांच्या तावडीतून बाहेर काढले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला, परंतु यामुळे पालकांमध्ये भीती निर्माण झाली आहे. गावात वाढत्या भटक्या कुत्र्यांमुळे सुरक्षेबाबतीमधील चिंतेत वाढ झाल्याने नागरिकांनी उपाययोजना करण्याची मागणी केली.

## मुंबईचा महापौर मराठी आणि मनसेचाच होणार : संदीप देशपांडे

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. ३० :



आगामी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम अद्याप जाहीर झाला नसला तरी, निवडणुकी पूर्वीच महापौर पदावरून राजकीय वातावरण तापले आहे. शिवसेना (ठाकरे), शिवसेना आणि भाजपकडून मुंबईचा महापौर आमचाच असा दावा करण्यात येत असताना, आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांनीही मुंबईचा महापौर मराठी आणि मनसेचाच होणार असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेची आगामी निवडणूक चांगलीच गाजणार असल्याचे दिसत आहे.

मुंबई महानगरपालिकेवर सत्ता मिळवण्यासाठी सर्वच पक्षांनी तयारी सुरु केली आहे. त्या दृष्टीने शिवसेना ठाकरे आणि मनसे यांच्यात राजकीय युती होण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वीच शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी मुंबईचा महापौर शिवसेनेचाच होणार असा विश्वास व्यक्त केला होता. त्यानंतर रविवारी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात मुंबईचा महापौर शिवसेनेचाच अशा आशयाचे फलक लावण्यात आले होते.

त्यावर प्रतिक्रिया देताना देशपांडे यांनी, मुंबई ही मराठी माणसांची आहे आणि येथील महापौरही मराठी असलाच पाहिजे. मनसेच्या बळावरच मराठी माणूस पुन्हा महापौरपदी विराजमान होईल, असा विश्वास व्यक्त केला. एकंदरीतच मुंबई महापालिकेचे महापौरपद मिळवण्यासाठी आतापासूनच राजकीय पक्षांकडून निवडणूक तयारी आणि दावे-प्रतिदावे केले लावू लागले आहेत.

## सामाजिक, राजकीय आंदोलनाच्या ७७ खटल्यांना दिलासा : आशिष शेलार



**मुंबई :** राज्यातील धार्मिक, राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या २०१ अर्जदारापैकी ७७ अर्जदारांवरील खटले मागे घेण्याबाबत शासनाने नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने शिफारस केली आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिली. राज्यातील राजकीय आणि सामाजिक आंदोलनांदरम्यान दाखल करण्यात आलेले खटले मागे घेण्याबाबत शासनाने नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक सह्याद्री अतिथीगृहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मंत्री ॲड.शेलार होते. या बैठकीस विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव उदय शुक्ला, अभियोग संचालनालयाचे संचालक अशोक भिल्लारे, गृह विभागाचे उपसचिव चेतन निकम तसेच राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. स्त्रीविषयक गुन्हे, गंभीर स्वरूपाचे खटले, वैयक्तिक व दिवाणी प्रकरणे ही शासनाच्या धोरणांतर्गत माफ केली जाऊ शकत नाहीत. तसेच, आमदार, माजी आमदार, खासदार व माजी खासदार यांच्याशी संबंधित सहा प्रकरणांबाबत, शासन निर्णय व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, मुंबई उच्च न्यायालयातच अंतिम निर्णय घ्यावा लागेल. त्या दिशेनेही पावले उचलण्यात येत असल्याचेही मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले. मंत्रिमंडळ उपसमितीकडे प्राप्त २०१ अर्जदारापैकी ७७ अर्जावर पुन्हा विचार करण्याची शिफारस करण्यात आली असून ही प्रकरणे पोलीस उपायुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त क्षेत्रीय समितीपुढे ठेवण्यात येतील, असे मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले.

## मराठवाड्याला पुन्हा अतिवृष्टीचा तडाखा

### तब्बल १९६ मंडळांत अतिवृष्टी; शहरांतही मुसळधार



■ महासागर प्रतिनिधी,
छत्रपती संभाजीनगर, दि. ३० :

मराठवाड्यातील तब्बल १९६ मंडळांमध्ये तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ५८ मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. पावसाने पुन्हा झोडपल्याने छत्रपती संभाजीनगर शहरासह जिल्ह्यातही दाणादाण उडाली असून, अनेक वसाहतींमधील घरांमध्ये पाणी शिरले, तर नदी नाल्यांना आलेल्या पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले. लक्ष्मी कॉलनीतील पूल तुटल्याने नागरिकांचा संपर्क तुटला. जिल्ह्यातील ३५४ नागरिकांना सुखरूप बाहेर काढले असून, कन्नड तालुक्यातील ब्राह्मणी नदीत मदन झब्बू राठोड (वय ५५) वाहून गेले असून शोधमोहीम सुरू होती.

शहरात मनपा प्रशासक जी. श्रीकांत यांच्यासह अग्निशमन दलाचे जवान, झोन कार्यालयाचे अधिकारी-कर्मचाऱ्यांनाही रस्त्यावर उतरून मदतकार्यात सहभागी व्हावे लागले. हर्सूल तलाव ओसंडून वाहू लागला असून खाम आणि सुखना नदीला पूर आला आहे. शहरातील जालाननगर येथील गौरव रेसिडेन्सी, राहुलनगरातील गल्लीनंबर एक, रेवती सोसायटी, सातारा परिसरातील पाडुरंग कॉलनी, विठ्ठल कॉलनी, आनंद कॉलनीसह अनेक वसाहतींना पाण्याचा वेढा पडला. नक्षत्रवाडी आणि जळगाव रोडवरील दोन झाडे पडली. शहरातील पाच मंडळांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली.

जायकवाडी धरणातून सध्या दोन लाख २६ हजार प्रतिसेकंद घनफूट वेगाने पाणी सोडले असून, त्यामुळे पैठण शहरात पाणी येऊ शकते, असे कळविण्यात आले आहे. पैठण तालुक्यातील नदीकाठच्या १३ गावांतील नागरिकांना हलवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. वैजापूर तालुक्यातील दोन गावांत पाणी घुसले. नारायणपूर आणि गोपाळवाडी येथील नागरिकांना व वैजापूर शहरातील २० कुटुंबांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले, वैजापूरमधील दोन गावांतील स्थिती लक्षात घेऊन काही कुटुंबांना सुरक्षित स्थळी आणले आहे. प्रशासन सतर्क आहे. कोणीही घाबरू नये, आवश्यकता वाटली की प्रशासनाशी संपर्क साधवा.

## मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर वृद्धाचा आत्मदहनाचा प्रयत्न



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर मंगळवारी दुपारी एका वृद्धाने आत्मदहनाचा प्रयत्न केल्याने खळबळ उडाली. नवी मुंबई महानगरपालिका आणि पोलिसांविरोधात वृद्धाकडून जोरदार निदर्शन करण्यात आले. दोन्ही प्रशासन मदत करत नसल्याचा आरोप करत त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले.

प्राथमिक माहितीनुसार, वृद्ध राहत असलेल्या परिसरात 24 तास दारूची भट्टी सुरू आहे. या विरोधात महानगरपालिका आणि पोलिसांकडे वारंवार तक्रारी केल्या, नोटिसा दिल्या; मात्र काहीही कारवाई झाली नाही. त्यामुळे अखेर त्यांनी मंत्रालयासमोर अंगावर रॉकेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. अंगावर रॉकेल टाकत असतानाच पोलिसांनी तत्परतेने हस्तक्षेप करून त्यांना रोखले.

## कंटेनरच्या धडकेत मुलीचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
ठाणे, दि. ३० :

घोडबंदर मार्गावरील वाघबीळ उड्डाणपूलावर एका भीषण अपघातात २७ वर्षांच्या मुलीचा कंटेनरच्या धडकेत मृत्यू झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात कंटेनर चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. दरम्यान, या घटनेनंतर घोडबंदर भागातील रहिवाशांकडून संताप व्यक्त केला जात आहे. येथील रहिवाशांचे अपघातात किती बळी जाणार असा प्रश्न विचारला जात आहे.

गेल्याकाही दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे शहरातील माजिवाडा उड्डाणपूल, घोडबंदर येथील आनंदनगर, वाघबीळ, कापूरबावडी येथे ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना अक्षरशः धोकादायक प्रवास करावा लागतो. दुचाकी आणि पादचारी विशेषतः धोक्यात आहेत. वाहतूक कोंडीत अडकून राहणाऱ्या नागरिकांचा वेळ वाया जात आहे, इंधनाचा अतिरिक्त खर्च होत आहे आणि मानसिक तणावही वाढत आहे. घोडबंदर मार्गावर मागील काही वर्षांपासून मेट्रो मार्गिकेच्या निमार्णाची कामे सुरू आहेत. त्याचा परिणाम देखील होत आहे. मेट्रो मार्गिकेसाठी अनेक ठिकाणी खड्डे खणले होते. या खड्ड्याची कामे झाल्यानंतरही दुरुस्ती करण्यात आली नाही. त्यामुळे मुख्य रस्ते निमुळते झाले आहेत.

घोडबंदर येथील ओवळा भागात आरती अभिषेक मिश्रा (२७) ही तिच्या पतीसोबत राहते. ती ठाण्यातील एका खासगी कंपनीत कामाला आहे. सोमवारी कामावरुन घरी परतताना ती तिच्या स्कुटरने प्रवास करत होती. वाघबीळ उड्डाणपूलाच्या चढणीवर आली असता, एका कंटेनरची धडक तिला बसली. तिच्या अंगावरून कंटेनरची चाके गेल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.

## पब्लिक रिलेशन्स काऊन्सिल ऑफ इंडियाची महापारेषणला तीन राष्ट्रीय पारितोषिके प्रदान

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :




पब्लिक रिलेशन्स काऊन्सिल ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकांचे वितरण गोवा विधानसभेचे सभापती डॉ. गणेश गावकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट नियतकालिक, डिजिटल मीडिया इनोव्हेशन्स व कार्पोरेट कम्युनिकेशन एक्सलन्सचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पारितोषिकांबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले.

गोव्यातील पणजी येथील हॉटेल फर्न कदंबामध्ये आयोजित करण्यात आलेल्या १९ व्या जागतिक संवाद परिषदेमध्ये या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी अभिनेते व दिग्दर्शक मिलिंद तेंडुलकर, "पीआरसीआयचे अध्यक्ष एम. बी. जयराम, डॉ. गीता शंकर, चिन्मयी प्रवीण यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी या पुरस्काराचे संपूर्ण श्रेय जनसंपर्क विभाग व त्यांच्या टीमवर्कला दिले आहे. भविष्यातही, महापारेषणचा जनसंपर्क विभाग सातत्यपूर्ण कामगिरी करून महापारेषणचे नाव उंचावेल, असा विश्वास व्यक्त केला.

## पूरग्रस्तांसाठी मंदिरांचा कोटींचा वर्षाव

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

महाराष्ट्रातील मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे आयुष्य उद्धवस्त झाले आहे. उभी पिके वाहून गेली, संसार पाण्याखाली गेला, घरदार उघड्यावर आले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी पूरग्रस्त भागाची पाहणी केली खरी, पण शेतकऱ्यांच्या मनातला प्रश्न अजूनही तसाच आहे -सरकारकडून ठोस मदत कधी मिळणार? दरम्यान, राज्यातील प्रमुख मंदिर संस्थानं मात्र वेगाने पुढे सरसावली आहेत. गजानन महाराज संस्थानने तब्बल १ कोटी ११ लाखांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे सुपूर्त केला. शिर्डी साईबाबा संस्थानने १ कोटींची मदत जाहीर केली. तुळजाभवानी संस्थाननेदेखील मागे न हटता १ कोटी रुपयांची मदत दिली.

पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने मदतीसोबत अन्न, वस्त्र, पाणी यांचेही वाटप सुरू केले आहे. लालबागच्या राजाने या संकटसमयी आपली जबाबदारी ओळखत ५० लाख रुपये मुख्यमंत्री निधीत दिले. मात्र सर्वात मोठा हातभार लावत मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायक न्यासाने तब्बल १० कोटी रुपयांची मदत जाहीर करून पूरग्रस्तांच्या डोळ्यांत आशेचे पाणी आणले आहे. मंदिर संस्थानं आणि गणेशोत्सव मंडळं कोटींचा वर्षाव करत आहेत, समाजधर्माचे भान ठेवून पूरग्रस्तांच्या सोबत उभी राहत आहेत. पण जनता मात्र एकाच सवालावर अडकली आहे जेव्हा देवधर्माची संस्थानं इतकी मोठी मदत करू शकतात, तेव्हा निवडून दिलेलं सरकार आणखी किती वेळ हातावर हात धरून बसणार?

## पुणे येथे १,१११ शंखवादकांचा विश्वविक्रम सोहळा वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडियामध्ये होणार नोंद

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३० :




पुणे येथे रविवारी, ५ ऑक्टोबर रोजी १,१११ हून अधिक शंखवादकांसह एकाच वेळी शंखवादनाचा विश्वविक्रम सोहळा आयोजित करण्यात आला आहे. स.प. महाविद्यालयाच्या मैदानावर सकाळी ८.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. हिंदुस्तानातील पहिले शंखवादकांचे पथक असलेल्या केशव शंखनाद पथकाने या सोहळ्याचे आयोजन केले आहे.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंती वर्ष, जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचे सदेह वैकुंठगमन ३७५ वे वर्ष, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याचे ३५१ वे वर्ष, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती, महात्मा जोतिबा फुले यांच्या १३५ व्या पुण्यतिथी वर्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० व्या वर्षानिमित्त हे आयोजन करण्यात आले आहे. पथकाचे संस्थापक अध्यक्ष नितीन महाजन यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

या विश्वविक्रम सोहळ्याला राष्ट्रीय महाकाल सेनेचे अध्यक्ष महंत योगी रोहतास नाथ महाराज, जगद्गुरुकृपांकित डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर आणि विचारवंत सोपानदादा कानेरकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

याशिवाय, राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विश्व हिंदू परिषदेचे प्रांतमंत्री किशोर चव्हाण, बजरंग दल क्षेत्र संयोजक विवेक कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, रा.स्व.संघ पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, शि.प्र. मंडळी नियामक मंडळ अध्यक्ष ॲड. एस. के. जैन, भाजप प्रदेश महामंत्री राजेश पांडे, सुप्रसिद्ध संगीतकार-गीतकार अवधूत गांधी आणि सिने दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पत्रकार परिषदेला किशोर चव्हाण, रणजित हगवणे, नितीन महाजन, काळूराम डोमाळे, शैलेंद्र भालेराव, सुहास मदनाल आदी उपस्थित होते.

'वर्ल्ड रेकॉर्ड बुक ऑफ इंडिया'मध्ये या विश्वविक्रमाची नोंद होणार आहे. यासाठी गेल्या एक वर्षापासून तयारी सुरू असून, पुणे महानगर आणि महाराष्ट्र राज्यभरातून शंखवादक येणार आहेत. पुणेकरांनी या सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# दोन दिवसांच्या पावसाने ८,१६० हेक्टरवर पिकांचे नुकसान

## पुरात वाहून गेलेल्या तिघांचे मृतदेह मिळाले



■ महासागर प्रतिनिधी, बुलडाणा, दि. ३० : गेल्या दोन दिवसांपासून अतिवृष्टी झाल्याने सर्वाधिक नुकसान बुलडाणा तालुक्याचे त्यानंतर मोताळा तालुक्याचे झाले आहे. एकूण ८१६० हेक्टर क्षेत्रावरील हे नुकसान आहे. सप्टेंबर महिन्यात लागोपाठ होणाऱ्या या नुकसानीचा पंचनामा अजून होणे बाकी आहे. नुकसान हे अंदाजित हेक्टरचे आहे. मात्र या पावसामुळे नदीला पूर आल्यामुळे चार जण वाहून गेले होते. त्यातील तिघांचे मृतदेह आढळून आले आहे. नदीच्या पुरामुळे जिल्हयातील सात प्रकल्प १०० टक्के भरले आहेत. जिल्ह्यात सध्या जवळपास ८५ मंडळ अतिवृष्टीने बाधित झाले आहेत.

या भागात बहुतांश नुकसान झाले आहे. आजपर्यंत एकूण ३३२ गावे बाधित आहेत. २७ ते २९ सप्टेंबर दरम्यान बुलडाणा तालुक्यातील २१ गावे बाधित असून सोयाबीन व तुर पिकांचे ७,७२१ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे तर मोताळा तालुक्यातील १७ गावांमध्ये सोयाबीन, मका व कापूस पिकांचे ४३९ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. ऐन दसरा तोंडावर असताना शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. मोठ्या प्रकल्पामध्ये नळगंगा ९०.४५, खडकपूर्णा ९५.९६, पेनटाकळी ९८.०८, मध्यम प्रकल्पामध्ये ज्ञानगंगा,मस, कोराडी, पलढग, तोरणा, उतावळी व येळगाव जलाशयात १०० टक्के जलसाठा आहे. निमगाव तालुका नांदुरा येथे २८ सप्टेंबर रोजी दोन युवक पाण्यात बुडाले होते. त्या दोघांचा बचाव पथकाकडून नदीपात्रात शोध घेणे सुरु असताना २८ तासानंतर करण गजेंद्र भांबळे याचा मृतदेह आढळून आला आहे तर वैभव ज्ञानेश्वर फुके अद्यापही बेपत्ता आहे. मलकापूर तालुक्यातील दसरखेड येथील निंबोळी (शिवणी) येथील व्याघ्रा नदीवर कसोबा मंदिरा नजीक असलेल्या बंधाऱ्यावर पोहण्यासाठी रविवारी शुभम राजू दवंगे (वय १५) रा.दसरखेड याला नदीपात्रातून बाहेर काढले. तर यातील दुसरा मुलगा सोहम सोनोने याचा शोध घेतला असता तो आज सोमवारी सकाळी साडेसात वाजे दरम्यान नदीपात्रात सापडला.

## ४०० वर्षांपूर्वीपासून वाघाई देवस्थान



■ महासागर प्रतिनिधी यवतमाळ, दि. ३० : शहरापासून दक्षिणेला गोधनी मार्गावरून पुढे गेल्यास निसर्ग सौंदर्याने नटलेल्या परिसरात डोंगरपायथ्याशी आई वाघाईचे मंदिर आहे. उजाड झालेल्या निळोणा गावातील वाघाई अनेक कुटुंबांची कुलस्वामिनी असून. भक्तांची वाघाई वर अतूट श्रद्धा आहे. त्यामुळेच नवरात्री उत्सवात वाघामायच्या जागर होत असून इथे नेहमीच भाविकांची ओढ असते.

यवतमाळ शहरातून उगम पावलेली वाघाडी नदी नागमोडी वळण घेत वाघाई मंदिराशेजारून वाहते, वाघाईच्या नावावरून नामकरण झालेल्या वाघाडी नदीवर यवतमाळला पाणी पुरवठा करणारे निळोणा धरण असून, धरणाच्या काठावर वाघाई वसली आहे. वाघामाय यवतमाळवासीय भक्तांचे श्रद्धास्थान आहे.

गोधनी ते बरबडा गावाच्यामध्ये सुमारे ४०० वर्षांपूर्वीपासून वाघाईचे मंदिर आहे. ५० वर्षापूर्वी यवतमाळकरांच्या तृष्णातृप्तीसाठी निळोणाची जमीन अधिग्रहित करून तेथे धरणाचे निर्माण झाले. गाव स्थलांतरीत झाले मात्र वाघाईचे तेथेच वास्तव्य आहे. देवीची सुंदर मूर्ती स्वयंभू आहे. अडीच फुट उंच असलेली आईची मूर्ती लोभस असून तिला नित्यनेम साज शृंगार केला जातो. यवतमाळपासून ७ किमी अंतरावर पूर्वी येथे निळोणा हे गाव होते. ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेल्या वाघाई वर बरबडा, चौधरा, पांढरी, खरला, गोधनी, जांब सह यवतमाळ शहर व नजीकच्या भक्तांची प्रचंड श्रद्धा आहे. पूर्वी हे मंदिर टेकडीवर कपाऱ्यांमध्ये होते मात्र भक्तांच्या तपश्चर्ये नंतर आई पायथ्याशी आली अशी मान्यता आहे. वाघाईची मूर्ती अतिशय जागृत असल्याची भावना आहे. वाघामायच्या गाभाऱ्या समोरच तिचे वाहन असलेल्या वाघांच्या मुर्त्या देखील आहेत.

पूर्वीच्या काळात यवतमाळ वरून पाय वाटेने निळोणा पर्यंत येता येत होते. मात्र पुढे वाघाडी नदी असल्याने बरबडा चौधरा साठी कठीण मार्ग होता. वाघाई अनेकांचे कुलदैवत असल्याने भक्तांची नेहमीच येथे रेलचेल असते. निसर्गरम्य परिसर, गर्द हिरवळ असलेली वृक्षवल्ली, निळोणा धरण यामुळे भरभरून निसर्गसौंदर्य लाभलेल्याने वाघाई मंदिरात मन रमते. हा परिसर पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित असला तरी विकास हवा. पूर्वी येथे छोटेसे मंदिर होते मात्र वाघामायवर श्रद्धा असणाऱ्या भक्तजनांनी ५० फुट उंचीचे कळस असलेल्या मंदिराचे बांधकाम केले असून नुकतीच विधिवत कलशस्थापना झाली आहे. मंदिराचा गाभारा देखील सुशोभीत करण्यात आला असून, मंदिराचा परिसर देखील देखणा व सर्व सोईनी सज्ज होत आहे. शासन सहयोगातून निर्माण केलेल्या सभागृहात व मंदिराच्या मंडपात गरजवंतांचे विवाह व वर्षभर अनेक कौटुंबिक सोहळ्यासाठी देखील वाघाई देवस्थानला पसंती आहे. भक्तांच्या सहकार्यातून वाघामाय चे भव्य मंदिर साकारण्यात आले आहे.

## महात्मा फुले कॉलेजमध्ये जागतिक हृदय दिन उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी शेंदुरजना घाट, दि. ३० : वरुड येथील महात्मा फुले कला, वाणिज्य व सीताराम चौधरी विज्ञान महाविद्यालयात जागतिक हृदय दिन साजरा करण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालय विभाग व ग्लेनमार्क फार्मास्युटिकल लि. यांचा संयुक्त विद्यमाने डॉ. सुमित जैस्वाल यांचे मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिलीप हांडे, अलका पवार, डॉ. कदम, जितेश खडसे, सुमित भिंगारे उपस्थित होते. प्रास्ताविक अलका पवार यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. सुमित जैस्वाल यांनी जागतिक हृदय दिनानिमित्त मानवी शरीरातील हृदय हा महत्वाचा घटक असून ते चांगल्याप्रकारे सशक्त व सुदृढ ठेवण्यासाठी आपण सतत जागृत राहिले पाहिजे. तसेच हृदयविकाराच्या आजाराला बळी पडू नये म्हणून आपण पूर्व काळजी घ्यावी. यासाठी आपल्या शरीरातील ब्लडप्रेशर व साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यासाठी नियमित तपासणी करून घ्यावी. त्याचबरोबर आपल्या आहारात नियमितता असावी, फास्ट फूड खाणे टाळावे, मीठ व साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवावे, विडी, सिगारेट, मद्यपान करू नये. याशिवाय आपल्या दैनंदिन जीवनात सततचा ताण तणाव कमी करावा. शिवाय नियमित व्यायाम करून पालेभाज्या, फळांचा वापर जेवणात करावा असे, आवाहन केले. प्राचार्य डॉ. दिलीप हांडे यांनी हृदय विकाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, तरुण वयात हा आजार होत आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी व्यायामासोबतच शारीरिक कष्टाची कामे करावीत व आपले आरोग्य तंदुरुस्त ठेवावे, असे म्हटले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कदम यांनी केले, तर आभार जितेश खडसे यांनी मानले. या वेळी प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## शिक्षणाचे धडे वर्धा जिल्ह्यात प्रवेश मात्र अमरावती जिल्ह्यात



■ महासागर प्रतिनिधी आष्टी /(वर्धा) दि. ३० : रणसंग्राम भूमी असलेल्या आष्टी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी स्थापण केलेल्या हुतात्मा स्मारक समिती अंतर्गत चालविल्या जाणाऱ्या हुतात्मा राष्ट्रीय विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय येथे प्रवेशित असलेले अंदाजे १५ते१६ विद्यार्थी अमरावती जिल्ह्यातील डॉ.माधवराव उमेकर विद्यालय टेंभूरखेडा येथे प्रवेशित असल्याचे यूडायस प्रणालीमध्ये आढळून आल्याने शिक्षणक्षेत्रात चांगलीच खळबळ माजली.

येथील हुतात्मा राष्ट्रीय विद्यालयाचे मुख्याध्यापकांवर संस्थेचे अध्यक्ष भरत वणझारा यांनी भ्रष्ट प्रवृत्तीचे अनेक मार्ग स्विकारण्यास बाध्य केल्याचे समजते. याबाबत स्थानिक एका संचालकाशी प्रतिनिधीने संपर्क साधला असता त्या संचालकांनी शाळा चालवायच्या नावाखाली काही व्यवस्थापकांनी थेट बनावट नोंदींचा उद्योग सुरू केल्याचे उघड झाले आहे. शासनाकडून लाखोंचे अनुदान उकळण्यासाठी विद्यार्थ्यांची संख्या फुगवून दाखवण्याचा प्रकार चक्क डोळ्यांदेखत सुरू आहे. या गोंधळाचा पत्ता लागला, तोही एका साध्या पण भेदक घटनेतून माणिकवाडा येथील एका नववीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीचं नाव प्रत्यक्षात आष्टी (शहीद) गावातील हुतात्मा राष्ट्रीय विद्यालयात असतानाही ती अमरावती जिल्ह्यातील शाळेत दाखवली गेल्याचे समोर आले. खरी गोष्ट अशी की ती कधीच अमरावतीला गेली नव्हती, म्हणजेच तिच्या नावाचा उपयोग करून बनावट आकडेवारी तयार करण्यात आली. विद्यार्थिनीच्या वडिलांना या प्रकाराचा संशय आल्यावर त्यांनी सामाजिक कार्यकर्ते शरद वरकड यांच्याकडे धाव घेतली. वरकड यांनी तातडीने गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली. मात्र अजूनही शासन यंत्रणा घोर झोपेत असून, कारवाईचा मागमूसही नाही, त्यामुळे संतप्त पालक व स्थानिक नागरिकांनी शाळा व्यवस्थापकांना थेट कायद्याच्या कचाट्यात ओढा अशी मागणी केली आहे. या गंडाळ्यातून एकच प्रश्न समोर आला, शिक्षणखाते नेमके काय करते ?

विद्यार्थ्यांची बनावट नोंदी करून काही मंडळी स्वतःची तिजोरी भरतात, पण खरा मार बसतो तो निरागस मुलांच्या भविष्यात. आज शिक्षणाच्या आकडेवारीत फसवाफसवी सुरू असेल, तर उद्या त्यांच्या भविष्यातील गुणपत्रिका, प्रमाणपत्रांवर कोणाचीही खात्री राहणार नाही.

शाळा वाढवल्याचे ढोल पिटायचा आणि मुलांच्या नावांची खैरात करायची असा प्रकार म्हणजे शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणे नाही तर काय? ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत शाळेची पारदर्शकता आष्टी येथील महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक नाकतोडे यांनी प्रवेश प्रक्रियेबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांनी सांगितले की विद्यार्थिनीचा प्रवेश शाळेत पूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने करण्यात आला आहे. मुख्याध्यापक नाकतोडे यांच्या मते, विद्यार्थ्यांची संख्या ही शिक्षकांच्या नोकरीशी संबंधित असते. जर प्रवेश कमी झाले, तर शिक्षकांच्या सेवेला धोका निर्माण होतो. त्यामुळे आम्ही प्रवेश प्रक्रियेकडे अत्यंत बारकाईने लक्ष देतो. शाळा प्रशासनाने स्पष्ट केले की या प्रक्रियेत त्यांच्याकडून कुठलाही प्रकारची चूक झालेली नाही. सर्व प्रवेश नियमबद्ध आणि संगणकाधिष्ठित पद्धतीनेच पार पडले आहेत. प्रतिक्रिया हुतात्मा राष्ट्रीय स्मारक समितीचे अध्यक्ष भरत वणझारा यांच्याशी स्थानिक प्रतिनिधीने संपर्क साधला असता त्यांनी कुठलाच प्रतिसाद दिला नसल्याने नेमका शिक्षण संस्थेत चाललेला गोंधळ काय आहे हे समजू शकले नाही.

**प्रतिक्रीया**

माध्यमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना राऊत(धारफळकर)यांचेशी हुतात्मा स्मारक समिती आष्टी संचलित असलेल्या हुतात्मा राष्ट्रीय विद्यालय व महाविद्यालयात गेल्या अनेक वर्षापासुन शैक्षणिक आकृतीबंध प्रवेश व शिक्षकांच्या झालेल्या अतिरिक्त नियुक्तासह नवीन नियुक्तया गाजत असलेल्या विषयावर प्रतिनिधीने दोन ते तीन वेळा संपर्क साधला असता त्यांनी भ्रमणध्वनीवर मी मिसीमध्ये असल्यामुळे बोलता येणार नाही. अशी सावध प्रतिक्रीया नोंदविली.

## सावंगी येथे शुक्रवारपासून साई मंदिर वार्षिकोत्सव



■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. ३० : श्रीमती राधिकाबाई मेघे स्मृती न्यासाद्वारे सावंगी (मेघे) रुग्णालय परिसरातील साई मंदिरात दरवर्षीप्रमाणे वार्षिकोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी दि. ३ ते ८ या कालावधीत प्रवचन, कीर्तन तसेच संगीतसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या वार्षिकोत्सवात शुक्रवार, दि. ३ रोजी सायंकाळी ७.३० वाजता नागपूर येथील श्रीकांत मुडकी यांचे 'सद्गुरू वाचोनी सापडेना सोय' या विषयावर प्रवचन होणार आहे. दि. ४ व ५ रोजी सायंकाळी ७.३० वाजता नागपूरचे हभप श्यामबुवा धुमकेकर यांचे कीर्तन होणार असून त्यांना गुणवंत सावरकर (संवादिनी) व शंकर तिखे (तबला) हे वादक संगीतसाथ करतील.

सोमवार, दि. ६ रोजी कोजागरी पौर्णिमेनिमित्त रात्री ९.३० वाजता 'साई स्वरांजली हा भक्तिगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात गायक अरविंद बटाले, विजय चांदेकर, वैष्णवी शिवरकर यांच्यासह वादक शंकर तिखे, सतीश खांडेकर यांचा सहभाग राहणार आहे. दि. ७ रोजी सायंकाळी ७.३० वाजता अकोला जिल्ह्यातील पिंपळगाव येथील ज्ञानदेव चांभारे यांचे 'धर्म आणि ईश्वर' या विषयावर प्रवचन होणार आहे. महोत्सवाची सांगता बुधवार, दि. ८ रोजी होणार असून दुपारी ३ वाजता निर्गुण खैरकार काल्याचे कीर्तन करतील. त्यांना सहगायक विलास नागोसे, प्रकाश गव्हाळकर, दिलीप कराळे, सगुण खैरकार, वादक क्षीरसागर गुरुजी (संवादिनी) व गुलाब राऊत (तबला) हे साथ करणार आहेत.

कीर्तनानंतर सायंकाळी ५ वाजता साई मंदिरापासून सावंगी गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरापर्यंत पालखी मिरवणूक काढण्यात येईल. परिसरातील नागरिकांनी या वार्षिकोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजक मधुकर इंगळे व व्ही.आर. मेघे यांनी केले आहे.

## दुचाकीला अपघात एक ठार, दोन गंभीर



■ महासागर प्रतिनिधी संग्रामपूर , दि. ३० : तालुक्यातील पातुर्डा येथील तीन युवक इच्छापूर येथील देवीचे दर्शन घेऊन परत येत असताना त्यांच्या दुचाकीला चिचखेड खुर्दजवळ रानडुकराने धडक दिली. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना रविवार २८ सप्टेंबर रोजी रात्री नऊ बाजेच्या सुमारास घडली.

राम रमेश नांदणे (वय २५), रा. पातुर्डा असे ठार झालेल्या युवकाचे नाव आहे. तर दीपक मारोती इंगळे (वय २३) व अभिजीत बाळू उर्फ प्रमोद म्हसाळ (वय २४) असे जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे.तालुक्यातील पातुर्डा येथील राम नांदणे, दीपक इंगळे व प्रमोद म्हसाळ हे तीन युवक एमएच २८ बी एन ०१६६ या क्रमांकाच्या दुचाकीने इच्छापूर येथील देवीचे दर्शन करून परत येत असताना अचानक रस्त्यावर आलेल्या रानटी डुकराला त्यांच्या दुचाकीची जबर धडक बसली. या अपघातात भरधाव दुचाकी रस्त्याच्या बाजुला असलेल्या निंबाच्या झाडावर आदळली. या अपघातात राम नांदणे हा युवक जागीच ठार झाला असून जखमी युवक जवळपास एक तास बेशुद्ध अवस्थेत पडून होते. त्यानंतर ऑटो चालकाने या घटनेची माहिती मोबाइलवरून नातेवाइकांना दिली.

जखमींना प्रथम मुक्ताईनगर आरोग्य केंद्रात उपचारार्थ दाखल करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून राम नांदणे यास मृत घोषित केले. तर उर्वरीत जखमींना पुढील उपचारासाठी रुग्ण वाहिकेव्दारे खामगाव येथील रुग्णालयात हलवण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सध्या दोघांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती नातेवाइकांनी दिली.

### निधन वार्ता

**पार्वती राऊत**



वर्धा, धनगर समाजाचे कार्यकर्ते वासुदेव राऊत यांच्या मातोश्री पार्वती नामदेव राऊत (८७)यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि.१ रोज बुधवारला सकाळी ११वा त्यांच्या निवासस्थानातुन बुरांडे ले - ऑऊट येथून निघेल .

**लीला बडवाईक**



सिंदी(रे). येथील लीला रामचंद्र बडवाईक(८७) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. स्थानिक मोक्षधामात त्यांच्या पार्थिवाबर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## महिलांचा तलवार लाठीकाठीचा रात्रकालीन सराव



■ महासागर प्रतिनिधी वर्धा, दि. ३० : स्त्री ही आदिशक्ती. त्याचा प्रत्यय पौराणिक, मध्ययुगीन, ऐतिहासिक व आता वर्तमानकाळात पण आलेला आहे. सिंदूर ऑपरेशन हे त्याचे प्रतीक ठरावे. नवरात्रातील देवींची विविध रूपे ही विविध शक्तीचे प्रतीक म्हटल्या जातात. पण थेट हातात तलवार घेत सज्ज होण्याचा प्रकार जर आता दिसून येत असेल तर कोणीही चकित होणारच. रात्रीच्या वेळेस सलग तीन तास महिला, मुली एकत्र येत हा सशस्त्र सराव चालला. नवरात्रात दुर्गा मातेची आराधना ही शक्ती साधना करून होते. म्हणून लाठीकाठी, तलवार प्रशिक्षण ही काळाची गरज, अशी भूमिका जागर फॉउंडेशन व शक्ती साधना उपक्रमाच्या संयोजक श्रेया देशमुख मांडतात. समाजात महिलांनी चूल मूल इतकेच मर्यादित राहू नये. तिने सशक्त व्हावे. भारत मातेच्या चरणी सेवा अर्पण करावी. या प्रशिक्षणामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढतो. स्वरक्षण होते. गैरकृत्यास आळा बसतो, असा युक्तीवाद आयोजक करतात. त्याहेतूने गत पाच दिवस हे लढावू शिक्षण देण्यात आले. गरबा हा संस्कृतीचा भाग झाला. पण हे प्रशिक्षण स्व संरक्षण देणारे ठरते. दांडिया सोबत आता मुलींच्या हातात दंड शोभून दिसतो, असे मत. या प्रशिक्षणात मुलींना लाठी चालवीण्याचे, तलवार फिरविण्याचे, हल्ला झाल्यास त्यास प्रत्युत्तर देण्याचे, स्वतःचा बचाव करण्याची विद्या देण्यात आली. सराव समारोपप्रसंगी मुलींनी सादर केलेल्या कवायती पाहून नागरिक दंग झाल्याचे पाहायला मिळाले. नारीशक्तीचा आवाज बुलंद करणारे हे प्रशिक्षण महिला मुलींना एक नवे भान देणारे ठरेल, अशी भावना स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रवीणा जैन यांनी समारोपवेळी व्यक्त केली. चारित्र्य निर्माण व त्यातून राष्ट्र निर्माण असा हेतू स्तुत्य असल्याचे मत उद्योजक मोनाली ढोमणे यांनी व्यक्त केले. जिल्हा संघचालक जेठानंद राजपूत, माजी जि. प. उपाध्यक्ष वैशाली येरावार, क्रीडा भारतीचे अध्यक्ष हरीश गांधी यांनी उपक्रमाचे कौतुक केले.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MR. SHEIKH MOBIN AHMED LATIF.** NOW MY NEW NAME IS **MOBIN AHMAD SHEIKH LATIF.**
**ADD** : HOUSE NO.1128/J/3011, PLOT NO. 57,KHARBI ROAD, NEAR BOUDDHA VIHAR, SHESH NAGAR, NAGPUR 440009 MS

MY PASSPORT NO. **F5350125** IS MY INCORRECT NAME WAS **MOHMMAD FARZAN SIDDIQUI.** NOW NEW CORRECT NAME IS **MOHAMMAD FARZAN MOHAMMAD IBRAHIM SIDDIQUI.**
**ADD:** BEHIND RABIYA MANZIL, JAMIL COLONY, AMRAVATI 444001 MS

MY OLD NAME WAS **SANA KAUSAR.** NOW MY NEW NAME IS **SANA KAUSAR SAYED ISMAIL.**
**ADD** : PENSIOPURA ,HINGOLI - 431513

MY OLD NAME WAS **SAYYAD ISMAEEL IBRAHIM.** NOW MY NEW NAME IS **SAYED ISMAIL IBRAHIM.**
**ADD** : PENSIONPURA , HINGOLI - 431513

MY OLD NAME WAS **GODA KISHOR SHRINIWASAN.** NOW MY NEW NAME IS **G KISHOR G SHRINIWASAN.**
**ADD** : P.NO.04, SHAMBHU NAGAR, NEAR WATER TANK, ZINGABAI TAKLI, NAGPUR - 440030

MY OLD NAME WAS **NUSARATJAHA.** NOW MY NEW NAME IS **NUSARAT ASIF SHEIKH.**
**ADD** : ARJUNI MORGAON GONDIYA - 441701

MY OLD NAME WAS **ALIYA FIRDOS.** NOW MY NEW NAME IS **ALIYA FIRDAUS.**
**ADD** : 835 NALSAB TIMKI ROAD CHUNA MOHALLA HANSAPURI IN FRONT OF RANDHIR PRATHMIC SHALA NAGPUR - 440018

MY OLD NAME WAS **MOHAMMAD JUNAID MOHAMMAD RAFIQUE.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD JUNAID RAFIQUE QURESHI.**
**ADD** : BANDE NAWAZ NAGAR, NAGPUR - 440026

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildamgpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११९५
क.स.म.अ./तह.नाग/(शहर)/कवि-१४२७/२०२५ दिनांक : २५/०९/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. परवीन अफरोज अजीमुद्दीन, रा. प्लॉट नं.५९, गोरले लेआऊट, अवस्थी नगर, नागपूर यांचा अर्ज दिनांक १८/०८/२०२५

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार परवीन अफरोज अजीमुद्दीन, रा. प्लॉट नं.५९, गोरले लेआऊट, अवस्थी नगर, नागपूर यांनी त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू परवीन अफरोज अजीमुद्दीन यांचा जन्म दिनांक ३१/०३/१९६२ रोजी राहते घरी जुनी किदवाई हायस्कूलच्या समोर, लष्करीबाग, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildamgpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११९५
क.स.म.अ./तह.नाग/(शहर)/कवि-१४४८/२०२५ दिनांक : २९/०९/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. अजीज उल्ला खान, रा. घर क्र. २४५, पॉक्स कॉलनी, कामठी रोड, नागपूर यांचा अर्ज दिनांक १८/०८/२०२५

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार अजीज उल्ला खान, रा. घर क्र. २४५, पॉक्स कॉलनी, कामठी रोड, नागपूर यांनी त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अजीज उल्ला खान यांचा जन्म दिनांक २५/०५/१९५६ रोजी क्वार्टर नं. ५, बेड लाईन, पोलीस लाईन टाकळी, काटोल रोड, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

## पंचायत समिती सभापती पदाची आरक्षण सोडत आज

**वर्धा:** जिल्ह्यातील आठही पंचायत समिती सभापती पदासाठी अनुसूचित जाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण महिलांसह आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या अध्यक्षतेखाली दि.१ ऑक्टोबर रोजी सभेचे सभेचे आयोजन करण्यात आले. सभेला जिल्ह्यातील राष्ट्रीय, राज्यस्तरीय मान्यता प्राप्त राजकीय पक्षाचे प्रतिनिधीं व इच्छुक नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आज दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्ह्यातील वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, आष्टी, कारंजा, हिंगणघाट व समुद्रपूर या पंचायत समितीच्या सभापती पदासाठी आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे, असे उपजिल्हाधिकारी सामान्य तथा ग्राम पंचायत, पंचायत समिती निवडणूकचे प्रभारी अधिकारी श्रीपती मोरे यांनी कळिवले आहे.

## अण्णासाहेब पाटील यांची ९२ वी जयंती साजरी

**वर्धा:** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ व जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने माथाडी कामगार चळवळीचे संस्थापक व मराठा क्रांतीसूर्य स्व. अण्णासाहेब पाटील यांची ९२ जयंती व पंडित दिनदयाल उपाध्याय यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त निता यांनी अण्णासाहेब पाटील व पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेला हार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी कौशल्य विकास अधिकारी रुपसिह ठाकूर, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक सागर आंबेकर, वरीष्ठ लिपीक मुकेश वाघुले, अतुल व्हरेकर, सुवर्णा थेरे, अंकिता मयूर आदी उपस्थित होते.

MAHAGENCO Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

Online tenders are invited in two bids at O/o Chief Engineer (Const.), MSPGCL, Koradi.
**Sale of bid document:** From 01.10.25 to 21.10.25, 1300Hrs, Tender fees: Rs 1180.00/-
**Last date of submission of bid:** 21.10.2025 up to 1400 Hrs.

| SN | Tender RFx No. | Particulars of work | Est. cost. | EMD |
| --- | --- | --- | --- | --- |
| 1 | 3000062223 | Annual work contract for providing taxi on hire basis as and when required at the O/o Chief Engineer (Const.), MSPGCL, Koradi. | Rs. 48,73,749.50/- | Rs. 52,237/- |

1. Further details pertaining to the above tenders are available on the website https://eprocurement.mahagenco.in
2. Any amendment to this notice and or notification of amendment in the bidding document shall be notified on the website https://eprocurement.mahagenco.in only. Potential bidders are requested to make a note of the same.

Sd/-
CHIEF ENGINEER (CONST.), MSPGCL, KORADI

# भारताच्या आर्थिक व सांस्कृतिक पुनर्जागरणामागील अदृश्य हात

## आरएसएस @ १००



डॉ. मोनिका बी. सूद
सीईओ नवजीवन, लेखक, सामाजिक-आर्थिक विश्लेषक आणि मानसिक आरोग्य समर्थक

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) आज आपल्या शतकपूर्तीच्या टप्प्यावर आहे. शंभर वर्षांचा हा प्रवास केवळ एका संघटनेचा इतिहास नाही, तर भारताच्या आत्म्याचा पुनर्जन्म आहे. राजकारण, निवडणुका आणि सत्ता यांच्या पलीकडे जाऊन संघाने समाजाला असा अदृश्य हात दिला, ज्याने संस्कृतीला नवसंजीवनी दिली आणि अर्थव्यवस्थेला नैतिकतेची चौकट दिली. आज भारत जेव्हा आत्मविश्वासाने जागतिक मंचावर उभा आहे, तेव्हा त्याच्या मागे संघाचा हा खोलवर रुजलेला प्रभाव जाणवतो.

**सांस्कृतिक पुनर्जागरण: गुलामीच्या मानसिकतेपासून आत्मविश्वासाकडे**

औपनिवेशिक काळात भारताची सर्वात मोठी हानी ही केवळ संपत्तीची लूट नव्हती, तर आत्मविश्वासाचा ऱ्हास होता. ह्रतुमची संस्कृती निकृष्ट आहे, असा न्यूनगंड प्रत्येक भारतीयाच्या मनावर लादला गेला. १९२५ मध्ये डॉ. केशव बळिराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली आणि शाखेच्या माध्यमातून भारतीयत्वाचा अभिमान पुन्हा जागवला.

शाखा म्हणजे केवळ व्यायामाचे मैदान नव्हते, तर ती आत्मविश्वासाची विद्यापीठे होती. सामूहिक प्रार्थना, खेळ, व्यायाम आणि सेवाकार्य यामधून संघाने भारतीय समाजाला पुन्हा उभारी दिली. आज जेव्हा योग, आयुर्वेद, संस्कृत भाषा किंवा भारतीय तत्त्वज्ञान जगभरात सन्मान मिळवते, तेव्हा त्याच्या मुळाशी संघाने रुजवलेली हीच सांस्कृतिक पुनर्जागरणाची ठिणगी आहे.

**आर्थिक विचार: स्वदेशी ते आत्मनिर्भर भारत**

संघाचा आर्थिक दृष्टिकोन स्वावलंबनावर आधारलेला आहे. १९३० ते ४० च्या दशकात जेव्हा पाश्चात्त्य औद्योगिकीकरण भारतात रुजवले जात होते, तेव्हा संघाने स्वदेशी उत्पादन, स्थानिक बाजारपेठ आणि लघुउद्योगांना प्रोत्साहन दिले. हातमाग, खादी, हस्तकला, गावी तयार होणाऱ्या वस्तूंना संघाने केवळ व्यापारी दृष्टिकोनातून नाही, तर राष्ट्रधर्म म्हणून महत्व दिले.

आज जेव्हा आपण मेक इन इंडिया, स्टार्टअप इंडिया किंवा आत्मनिर्भर भारत अशा योजना पाहतो, त्यामागे संघाने रुजवलेली हीच मानसिक पायाभरणी आहेकी भारताची प्रगती भारताच्या हातांनीच घडवायची.

**ग्रामीण अर्थव्यवस्था, खऱ्या विकासाचा पाया**

संघाने सुरुवातीपासूनच ओळखले की भारताचे खरे सामर्थ्य हे गावांमध्ये आहे. पाणी अडवा पाणी जिरवा, जलसंवर्धन, दुग्धव्यवसाय, औषधी वनस्पतींचे उत्पादन, नैसर्गिक शेती अशा अनेक उपक्रमांत स्वयंसेवक सक्रिय राहिले.

एक गाव, एक उत्पादन सारख्या संकल्पना संघाने पुढे नेल्या. ज्या गावात मातीची भांडी परंपरेने तयार होत होती, तिथे तेच उत्पादन वाढवण्यावर भर दिला गेला; जिथे औषधी झाडे सहज उगवत होती, तिथे त्यावर आधारित व्यवसाय उभारला गेला.

यामुळे ग्रामीण लोकांना केवळ रोजगार मिळाला नाही, तर गावकुसाबाहेर स्थलांतर कमी झाले. आज सरकार जेव्हा डिजिटल इंडिया किंवा ग्रामीण ई-कॉमर्सबद्दल बोलते, त्यामागे संघाने आधीपासून तयार केलेला हा मानसिक पाया आहे.

**उद्योग आणि रोजगारनिर्मिती: छोट्या उद्योजकांचा कणा**

भारताची अर्थव्यवस्था केवळ मोठ्या उद्योगांनी नव्हे, तर लाखो लघुउद्योगांनी आधारलेली आहे. संघाने याच छोट्या उद्योजकांना आत्मविश्वास दिला. सहकारी साखर कारखाने, दुध संघ, हस्तकला गट, लघुउद्योग क्लस्टर्स यामध्ये संघाची थेट प्रेरणा व भूमिका दिसते.

युवकांना व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन, जोखीम घेण्याची तयारी आणि सामाजिक पाठबळ दिल्यामुळे आज भारतीय युवक स्टार्टअप्सच्या माध्यमातून नवनवीन प्रयोग करू शकतो. भारताच्या स्टार्टअप संस्कृतीमागे केवळ तंत्रज्ञान नाही, तर स्वावलंबनाचा संस्कारही कारणीभूत आहे.

**पर्यावरण धर्म : विकास व निसर्गाचा समन्वय**

संघाने सदैव सांगितले की विकास म्हणजे निसगार्चे शोषण नाही. पृथ्वी माता, गंगा मैया, वृक्षपूजन या भारतीय संकल्पना पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेच्या संतुलनाची शिकवण देतात. आज जेव्हा जग हवामानबदलाने त्रस्त आहे, तेव्हा भारताचा शाश्वत विकासाचा मार्ग हाच पर्यावरण धर्मावर आधारित आहे. जैविक शेती, सेंद्रिय अन्न, नवीकरणीय ऊर्जा–या सर्व संकल्पनांच्या मुळाशी भारतीय परंपरेचे तेच तत्त्व आहे ज्याला संघाने पुन्हा बळ दिले.

**जागतिक भारतीय : सांस्कृतिक अभिमानातून आर्थिक प्रगती**

प्रवासी भारतीय जगभर पसरले आहेत आणि त्यांनी विज्ञान, व्यापार, तंत्रज्ञान, वैद्यक या सर्वच क्षेत्रांत प्रगती केली आहे. परंतु त्यांच्या प्रगतीमागे एक अदृश्य मानसिक पाठबळ आहे, आपल्या भारतीयत्वाचा अभिमान.

अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅलीपासून आफ्रिकेतील व्यापारजगतापर्यंत भारतीयांनी आर्थिक सामर्थ्य दाखवले. ते जिथे गेले तिथे त्यांनी केवळ संपत्तीच नाही, तर संस्कृतीही पोहोचवली. यामुळे भारताची सॉफ्ट पॉवर वाढली आणि जागतिक अर्थव्यवस्थेत भारताचे स्थान दृढ झाले.

**युवकांचे मानसशास्त्र : शिस्त, धैर्य आणि जबाबदारी**

आजचा युवक सोशल मीडिया, उपभोगवाद आणि स्पर्धेच्या गोंधळात हरवतो. पण शाखेत शिकवली जाणारी प्रार्थना, व्यायाम, सेवा प्रकल्प त्याला आत्मशिस्त, धैर्य आणि जबाबदारी शिकवतात. संघाने युवकांना हे भान दिले की करिअर महत्वाचे आहे, पण त्याहून मोठे ध्येय म्हणजे समाज व राष्ट्राची सेवा. म्हणूनच आज अनेक भारतीय उद्योजक, शास्त्रज्ञ, अधिकारी आपली प्रगती करतानाही समाजसेवेमध्ये सक्रिय आहेत.

**स्त्रीशक्ती: राष्ट्रनिर्मितीत समान भागीदारी**

१९३६ मध्ये स्थापन झालेली राष्ट्र सेविका समिती हे स्त्रीशक्तीला दिलेल्या सन्मानाचे उदाहरण आहे. स्त्रिया राष्ट्रनिर्मितीत तितक्याच महत्वाच्या आहेत, ही दृष्टी संघाने दिली. आज स्त्रिया शिक्षण, आरोग्य, उद्योग, राजकारण, सामाजिक कार्य अशा सर्वच क्षेत्रांत पुढे आहेत. त्यांना आत्मविश्वास, जबाबदारी आणि राष्ट्रभावना देणारे संस्कार संघाने दिले.

**सामाजिक एकात्मता: जात, धर्म, प्रांताच्या पलीकडे**

संघाने समाजाला एकत्र आणले. जात, धर्म, भाषा, प्रांत यांच्या भिंती पाडून ह्रराष्ट्र प्रथमह्र ही भावना रुजवली.या एकात्मतेमुळेच विकास सर्वसमावेशक झाला. आर्थिक प्रगती केवळ शहरांपुरती किंवा श्रीमंतांपुरती न राहता ती शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न झाला.

**आरएसएस @१०० : भविष्याची दिशा**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शताब्दी ही केवळ स्मरणोत्सव नाही, तर भारताच्या नव्या अध्यायाची सुरुवात आहे. गेल्या शंभर वर्षांत संघाने हे सिद्ध केले की राष्ट्र केवळ धोरणांनी नव्हे, तर संस्कारांनी उभे राहते.

संघ हा तो अदृश्य हात आहे, जो चारित्र्य घडवतो, संस्कृतीला पुनर्जीवित करतो आणि अर्थव्यवस्थेला नैतिकतेशी जोडतो. आज भारत जेव्हा विश्वगुरू होण्याच्या दिशेने वाटचाल करतो, त्यामागे संघाने घातलेली ही शतकभराची पायाभरणी आहे. ही यात्रा पुढील शतकात भारताला आणखी तेजस्वी करणार आहे.

# भारतीय संख्याशास्त्रज्ञ : डॉ. राधा गोविंद लाहा!



संख्याशास्त्रज्ञ डॉ. राधा गोविंद साहा यांचा जन्म १ ऑक्टोबर १९२६ रोजी कोलकाता येथे झाला. ते ख्यातनाम संख्याशास्त्रज्ञ प्रोफेसर सी. आर. राव यांचे विद्यार्थी. डॉ. साहा यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण कोलकात्यामध्येच झाले.

शालेय जीवनात त्यांनी अनेक पारितोषिके आणि शिष्यवृत्त्या मिळविल्या. यामध्ये प्रामुख्याने सरदप्रसाद प्राईझ,डफ शिष्यवृत्ती, एस.एस. बोस सुवर्णपदक आणि कोलकाता विद्यापीठाचे रौप्य पदक यांचा समावेश करावा लागेल. १९४९ मध्ये त्यांनी प्रेसिडेन्सी कॉलेजमधून प्रथम क्रमांकाने संख्याशास्त्र मधील पदवी प्राप्त केली तर १९५१ मध्ये प्रथम श्रेणी मध्ये पदव्युत्तर पदवी मिळविली.

कोलकता विद्यापीठांमधून १९५७ मध्ये त्यांनी पी.एच.डी. ही पदवी प्राप्त केली. त्यांच्या संशोधनाचा विषय होता, विश्लेषणात्मक संभाव्यता उपपत्ती (एनालिटिकल प्रोबॅबिलिटी थेअरी).

दरम्यान, १९५२ मध्ये ते कोलकाता येथील इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूट (आय.एस.आय.) या संस्थेमधील संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र (रिसर्च अँड ट्रेनिंग स्कूल) या विभागांमध्ये रुजू झाले. याच वेळी फ्रान्स,अमेरिका, स्वित्झर्लंड आदी देशातील सांख्यिकीय संस्थांनी त्यांना निमंत्रित केले. अल्पावधीतच म्हणजे १९६० पर्यंत त्यांनी आपल्या संशोधन कार्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती मिळवली.

१९५८ मध्ये ते संशोधन सहकारी (रिसर्च असोसिएट) म्हणून कॅथलिक युनिवर्सिटी ऑफ अमेरिका वॉशिंग्टन डी.सी. येथे कार्यरत झाले. त्यानंतर दोन वर्षासाठी ते भारतात आय.एस.आय. मध्ये परतले आणि पुन्हा १९६२ मध्ये कॅथॉलिक युनिव्हर्सिटी मध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले. येथे ते १९७२ पर्यंत कार्यरत राहिले. त्यानंतर ते औहिओ येथील बॉउलिंग ग्रीन स्टेट युनिव्हर्सिटी मध्ये कॅथॉलिक युनिवर्सिटी मधील त्यांचे सहकारी विजय रोहटगी आणि एयूगेने ल्युकास यांच्या समवेत रवाना झाले. तेथूनच ते १९९६ साली निवृत्त झाले.

**संशोधन आणि लेखन कार्य**

संभाव्यता वितरणाचे गुणवर्णन (कॅरेक्टरायझेशन ऑफ प्रोबॅबिलिटी डिस्ट्रिब्यूशन) हा डॉ. लाहा यांच्या आवडीचा संशोधनाचा विषय. त्यांचा सर्वात गाजलेला एक निष्कर्ष म्हणजे, दोन स्वतंत्र आणि भिन्न (इंडिपेनडंट एंड नॉनआयडेंटीकल) वितरण असणाऱ्या साहचिक चलांचे गुणोत्तर हे कॉशी वितरण प्रमाणे असते; जर आणि फक्त ती चले सामान्य वितरण अनुकरण करत असतील तर. लाहा यांनी हा सिद्धांताला प्रसिद्ध केले आणि त्यांनी या सामान्य (नॉर्मल) नमुना वितरणाच्या गुणधर्माचे अनेक प्रकारे सामान्यीकरण केले. यासाठी त्यांनी नमुना सरासरी (सॅम्पल मीन) आणि नमुना विचरण (सॅम्पल व्हेरियन्स) यांच्या स्वतंत्रते चा आधार घेतला.

डॉ. लाहा यांनी सांख्यिकी आणि संभाव्यता सिद्धांतावर अनेक क्रमिक पुस्तके लिहिली असून त्यांचे अनेक संशोधन लेखही विविध नियतकालिकांतून प्रकाशित झाले आहेत. तसेच त्यांनी फ्रेंच, रशियन,बंगाली, हिंदी, इंग्रजी आदी भाषेतील शोधनिबंधांचे मूल्यमापन(रिव्ह्यू) केले असून इतर भाषांत अनुवादही केला आहे.

इंस्टीट्युट ऑफ मैथेमेटीकल सोसायटी चे फेलो,आणि इंटरनैशनल स्टॅटिस्टिकल सोसायटी चे सभासद असणारे डॉ. लाहा हाडाचे शिक्षक होते. कोणतीही गोष्ट नीटपणे समजावून सांगण्या मध्ये त्यांचा हातखंडा असल्याने ते त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये आदरणीय आणि प्रिय होते.

विज्ञानाखेरीज डॉ. लाहा यांना संगीत आणि नाटकाची विशेष आवड होती. या क्षेत्रातील त्यांचे सखोल वाचन होते. नाटकांविषयी च्या आणि संगीत रचनाकारा बाबतच्या चर्चांमध्ये उत्साहाने भाग घेणारे लाहा जेव्हा लंडन, पैरीस, न्युयॉर्कला जात तेव्हा नाटकांना आणि संगीत कार्यक्रमांना आवर्जून उपस्थित राहत असत. डॉ. लाहा यांचे पेरीसबर्ग, औहिओ येथे १४ जुलै १९९९ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांना विनम्र अभिवादन!



प्रा. विजय कोष्टी
कवठेमहांकाळ
जि. सांगली.

# महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज १०६ वि जयंती. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले.

गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली.

त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला.

या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते.

त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते.

त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली.

ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटांची निर्मिती झाली.

दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांचा मूळ कथाही गदिमा यांच्याच.

चार दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांना पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते.

१४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमासारखा बहुमुखी प्रतिभा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# क्रांतीचे सूर्यसुत : स्मृतिशेष अॅड. विमलसूर्य चिमणकर



"Miles to go before I sleep..." भाऊ किंवा भैय्या या नावाने आंबेडकरी चळवळीत ओळखले जाणारे स्मृतिशेष अॅड. विमलसूर्य चिमणकर सर हे एक तेजस्वी, निर्मळ, समर्पित आणि वैचारिकदृष्ट्या प्रगल्भ नेतृत्व होतं. त्यांनी केवळ विचारांची माळ ओवली नाही, तर आपल्या जीवनात त्या विचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करत एक आदर्श निर्माण केला.

नागपूरच्या क्रांतीभूमीत जन्मलेले चिमणकर सर विज्ञान शाखेचे विद्यार्थी असतानाच बाबासाहेबांच्या विचारांनी प्रेरित होऊन 'समता सैनिक दल' या बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या मातृसंघटनेत सक्रिय झाले. १९७० च्या दशकात महाराष्ट्रात बौद्ध समाजावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराच्या घटनांना त्यांनी सामोरं जाऊन विरोध केला. शहीद पोचीराम कांबळे यांच्यापासून ते जवखेडा प्रकरणापर्यंत त्यांनी खंबीर भूमिका घेतली.

नामांतर आंदोलन, रिडल्स प्रकरण, आणि आंबेडकरी लढ्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांची सक्रिय उपस्थिती होती. १५ ऑगस्ट १९९३ रोजी मुंबईत मा. उपेंद्र शेंडे यांच्या आमरण उपोषणात सहभागी होऊन त्यांनी संपूर्ण आंदोलनात एक नवी ऊर्जा फुंकली.

'दि पीपल' या मासिकाचे त्यांनी संपादन करताना संविधान, आरक्षण, बहुजनवाद, विपश्यना यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सडेतोड, बिनधास्त विश्लेषण केले. त्यांच्या लेखनातून अनेकांना दिशा मिळाली.

'दुसरा महायुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर', 'कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर' ही त्यांची विश्लेषणात्मक पुस्तके आंबेडकरी विचारवंतांसाठी दीपस्तंभ ठरली आहेत.

२००१ मध्ये त्यांनी १२०० कि.मी.चा ऐतिहासिक संविधान जागृती अभियान लॉंग मार्च मुंबईच्या चैत्यभूमीपासून नागपूरच्या दीक्षाभूमीपर्यंत यशस्वीरित्या पूर्ण केला. हे अभियान म्हणजे बाबासाहेबांच्या विचारांचा जणू प्रात्यक्षिक प्रवास होता. ४६ वर्षे त्यांनी समता सैनिक दलाच्या माध्यमातून देशभर काम केलं. स्वतःच्या जीवनाचे सारे स्वप्न, आकांक्षा बाजूला ठेवून त्यांनी चळवळीच्या व्रतासाठी स्वतःला वाहून घेतलं.

**आंबेडकरी समर्पित कार्यकर्ता गौरव पुरस्कारः**

त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २०२१ पासून आंबेडकरी समर्पित कार्यकर्ता गौरव पुरस्कार सुरु करण्यात आला आहे. हा पुरस्कार चळवळीतील समर्पित योद्ध्यांना दिला जातोः

२०२१ : मार्शल सुधाकर सोमकुंवर (महाराष्ट्र)
२०२२ : आ. बुद्ध शरण हंस (पटना, बिहार)
२०२३ : मार्शल अभय कुंभारे (वर्धा, महाराष्ट्र)
२०२४ : छायाताई खोब्रागडे
२०२५ : मार्शल डॉ. शिलाताई दांडगे (पुरस्कार घोषीत)

चिमणकर सरांना खरी श्रद्धांजली हीच असेल की, आपणही त्यांच्या सारखं निष्ठेने, नैतिकतेने आणि प्रामाणिकपणे आंबेडकरी चळवळीला नवी उंची देण्याचा प्रयत्न करू.

त्यांचं जीवन एक प्रेरणा आहे, समर्पण, त्याग आणि वैचारिकतेचा आदर्श. ते गेले, पण त्यांच्या विचारांचा सूर्य अजूनही आपल्याला दिशा दाखवत आहे.

------------

■ प्रमोद जांभुळकर
नागपूर.
9823969097

# गाण्यातून उमगणारी लता

डॉ. अनिल कुलकर्णी
९४०३८०५१५३
anilkulkarni666@gmail.com

(कालच्या अंकावरून पुढे)

कल्पवृक्ष कन्येसाठी लावुनिया गेला बाबा हे खरंच ठरलंय. मंगेशकर घराण्याची लता, तिचा वेलू गगनाला भिडतोय. मंगेशकर घराण्याने सुरांचा उषःकाल करत आशा पल्लवित केल्या आहेत. लतानें आमच्या सर्वांच्या जीवन जगण्याच्या आशा पल्लवित केल्या आहेत. लताच्या सुरमयी आवाजाने आमचे जीवन सुरमयी झाले आहे. सुखं म्हणजे नक्की काय असतं, लतांचं मधुर गाणं ऐकणं असतं.

सूर तेची छेडीता, गीत उमटें लताचेंच हे पदोपदी जाणवते. लताची गाणी मुदतीची ठेवं आहे .सुरांचे व्याज देणारी, मानवी जीवन समृद्ध करणारी लताच्या मधुर, दर्दभऱ्या गाण्यांनी जीवनात आशा पल्लवित केल्या आहेत. अनेकांची दुःख सहन करण्याची प्रतिकारशक्ती वाढविली आहे.

अनेक संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. अनेकांना जगण्याची उमेद दिली आहे. वास्तवाची जांण करून दिली आहे. लताच्या गाण्यांनी, अनेकांनी आपल्या प्रेमाची सुरुवात केली,आपल प्रेम फुलविले,जीवन फुलवले. अनेक गाण्यांनी हसवले, रडवले, डोळे पाणावले आहेत, धीर दिलाय. असेच वास्तव एका गाण्यात सांगितले आहे, जे मला भावलं.

डोळ्याच्या कडा ओलवणारं एक गीत. जन पळभर म्हणतील हाय हाय... मृत्यू हा प्रत्येकाला येणारच, तो अटळ आहे मग अशा मृत्यू कडे पाहण्याचा दृष्टिकोन कवी भा. रा. तांबे यांच्या गीतांनी व लताच्या सुरांनी सुसह्य होतं. आपण मृत्यूला घाबरतो, पण काही गाणी आपल्याला जाणवून देतात की या जगात आपल्याला भोगाव्या लागणाऱ्या दुःख, यातना यापेक्षा मृत्यूच्या स्वाधीन का होऊ नये? मृत्यूनंतर नातेवाईक, मित्र पुन्हा आपल्या कामाला लागतात. जीवन क्षणभंगुर आहे याची जाणीव आपण ठेवली पाहिजे. आजकाल तर मृत्यूपश्चात दुसऱ्या दिवसापासून टीव्ही, मोबाईल, गप्पा हसणं खिदळणं सुरू होतं.

जनपळभर म्हणतील हाय हाय. कोणतेच व्यवहार कोणा वाचुन अडत नाही. जीवनाचे रहाटगाडगे चालूच राहते. सूर्य, चंद्र, तारे आपला प्रवास सुरू ठेवतील. पुन्हा आपल्या कामी लागतील. अशा जगास्तव काय कुढावे, मोहि कुणाच्या का गुंतावे ? शांतीत का जिरवू नये काया. इतक्या यातना, दुःख, या ढोंगी जगाकडून मिळतात.

मृत्यूनंतरच शांती मिळते. जीवनात करू नये जास्त वादे , कारण शेवटी आहेत फक्त चार खांदे. याची जाणीव माणसाला पाहिजे. जीवन आहे तोपर्यंतच भरभरून जगा, दुसऱ्यासाठी जगा, स्वतःसाठी जागा. मृत्यूचा विचार करण्यापासून परावृत्त व्हा. मृत्यू येणारच आहे, त्याला हसत स्वीकारा. मग या मृत्यूची भीती वाटत नाही. सध्या जे भेडसावतेय त्यापेक्षा मृत्यू निश्चित चांगला आहे. बुडते हे जग न देखवे डोळा. याची देहा, याची डोळा, लोकाकडून अवहेलना करून घेण्या पेक्षा मृत्युला जवळ का करू नये. अशा सुखाचा दुःखाच्या जाणिवा लतानी आम्हाला करून दिल्या आहेत. हेआम्ही कधीच विसरू शकणार नाही.

■ ■ ■

# धर्मांतराचे षडयंत्र

**वाचक लिहितात**

धर्मांतर हे घर, नोकरी, पैसा यांचे आमिष दाखवून, छळ, बळ, प्रलोभन, कपट आणि फसवणूक याद्वारे केले जाते हे सर्वश्रुत आहे. धर्मांतर करणारे दोनच पंथाचे आहेत जे काही हजार वर्षांपूर्वीच स्थापन झाले आहे. त्यापैकी एकाला 'दार उल इस्लाम' म्हणजे संपूर्ण जगावर इस्लामचे राज्य आणायचे असल्याचे सांगतो तर 'ग्रेट कमिशन' वर विश्वास ठेवत म्हणजे संपूर्ण जगाला क्रिस्तमय करण्याविषयी येशूनी दिलेली आज्ञा.

ह्या दोन्ही पंथांच्या अगोदरपासून अस्तित्वात असलेला आणि 'वसुधैव कुटुम्बकम' म्हणजेच संपूर्ण विश्वच कुटुंब असल्याचे मानणाऱ्या अशा सनातन धर्माला या विस्तारवादी पंथांपासून रक्षण करणे आवश्यक आहे. भारतात असणारे मदरसे आणि कॉन्व्हेंट शाळा एक प्रकारे धर्मांतराचे अड्डे बनले आहेत. लव जिहाद, भू जिहाद, मुलींना विवाह करून त्यांचा धर्मपरिवर्तन करणे हे एका पंथाचे काम आहे. एका शाळेने तर धर्मनिरपेक्षताच्या नावाखाली काही विद्यार्थ्यांना मंदिर, मस्जिद आणि चर्चमध्ये नेले होते. चर्च आणि मशिदीत त्यांना जास्त वेळ देण्यात आला होता आणि त्यांचे बुद्धिभेद करण्याचा प्रयत्न केला गेला. जेव्हा एखादी गोष्ट अस्तित्वात नसताना तिला आणण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा तो बलपुर्वकच होतो यात श्रद्धेचा प्रश्न येत नाही. हे समजून न घेता श्रद्धेने धर्मांतर होणारे गुन्हा होत नाही हे म्हणणे चुकीचे आहे. हे राष्ट्रहिताच्या विरुद्ध कटकारस्थान किंवा षडयंत्र आहे हे हिंदूंनी लक्षात घेऊन वेळीच सावध होणे व धर्मरक्षण, राष्ट्ररक्षण करणे हे हिताचे आहे.

■ लीना मकरंद गाडगीळ
पनवेल.

# रोज रात्री पाण्यात मनुके भिजवून सकाळी खाल्ल्याने शरीराला मिळतात आश्चर्यकारक फायदे



मनुके त्यांच्या विशेष गुणधर्मांसाठी ओळखले जातात. सुक्या मेव्याचा वापर अनेकदा गोड पदार्थ किंवा खीरची चव वाढवण्यासाठी केला जातो. मनुके हे एक उत्तम ड्राय फ्रूट्स मानलं जातं.ते त्याच्या पोषक तत्वांसाठी देखील ओळखले जाते, जे आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहेत. मनुके जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध असतात, म्हणूनच त्यांना एक सुपर ड्राय फ्रूट म्हणून देखील ओळखले जाते. जर दररोज रात्री थोडेसे मनुके पाण्यात भिजवून ते सकाळी खाल्ले तर त्याचे चमत्कारिक फायदे आपल्या शरीराला मिळतात.

**रक्ताची कमतरता दूर करा**

मनुका हे लोह आणि व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्सचा चांगला स्त्रोत मानले जाते. म्हणून, जर तुमच्यात लोहाची कमतरता असेल तर दररोज रात्री 8 ते 10 मनुके पाण्यात भिजवा. त्यानंतर, दररोज सकाळी नाश्त्यापूर्वी हे मनुका खा. यामुळे अशक्तपणा कमी होण्यास मदत होऊ शकते.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवते**

मनुका हा ऊर्जेचा एक उत्तम स्त्रोत मानला जातो. ज्यांचे आरोग्य खराब आहे त्यांना दररोज कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मनुका खाण्याचा सल्ला दिला जातो. मनुके भिजवून ठेवणे हा त्यांचा सर्वोत्तम मार्ग आहे. मनुका खाल्ल्याने शरीराची प्रतिकारशक्ती वाढते, हंगामी आजार किंवा सर्दी टाळता येते. मनुका खाल्ल्याने शरीराला संसर्गाशी लढण्याची ताकद मिळते.

**पचन चांगले होते**

मनुक्यात मोठ्या प्रमाणात फायबर असते, ज्यामुळे अन्न पचण्यास सोपे होते. त्यात असलेले पोषक तत्व संपूर्ण पचनसंस्थेला आराम देतात. मनुक्यांचा उष्णतेवर परिणाम होतो. त्यांना भिजवून खाल्ल्याने आम्लतासारख्या समस्या दूर होण्यास मदत होते.

**त्वचा चमकदार होते**

मनुक्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन ई आणि अँटीऑक्सिडंट्स असतात, जे आपल्या त्वचेसाठी अत्यंत फायदेशीर असतात. दररोज 8-10 भिजवलेले मनुके खाल्ल्याने चेह?्यावरील डाग आणि सुरकुत्या दूर होतात, रंग उजळतो. चेहरा ताजा आणि तरुण दिसतो. वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावण्यास देखील हे प्रभावी असतात.

**शरीराला डिटॉक्स करते**

मनुका आपल्या शरीरातील सर्व वाईट विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतो. ते खाल्ल्याने शरीर आतून स्वच्छ होते. म्हणून, दररोज मनुके खाल्ल्याने आरोग्य नक्कीच सुधारू शकते.

■ ■ ■

# अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

## भयावह!

महिला मुली होताहेत
बहुसंख्यने बेपत्ता
लागत नाही बहुअंशी
त्यांचा थांगपत्ता ...

आक्रोश करूनी
थकती परिवार
मानवी तस्करीचा तर
नसेल हा प्रकार ...

शोध यंत्रणेने करावे
गुन्हेगारीचे उच्चाटन
तर समाजात राहील
भयमुक्त वातावरण ...

# मागासलेपणामुळे डाव्या विचारसरणीचा अतिरेकीवाद पसरला आहे, असा प्रचार करणारे लोक देशाची दिशाभूल करत आहेत

**मुंबई, ३० सप्टेंबर :** केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री तसेच भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते अमित शाह यांनी अलीकडेच भारत मंथन-२०२५: नक्सलमुक्त भारत, पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली लाल दहशतवादाचा अंत या समारोप सत्राला संबोधित केले. या वेळी शाह यांनी स्पष्ट केले की, जे लोक प्रचार करत आहेत की डाव्या विचारसरणीच्या अतिरेकीपणाचे मूळ कारण विकास आहे, ते देशाची दिशाभूल करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ३१ मार्च, २०२६ पर्यंत भारत नक्षलवादमुक्त होईल.

देशातील लोकांना माहिती आहे की नक्षलवाद हा एक भयंकर आजार होता, जो अनेक दशकांपासून भारताच्या अंतर्गत सुरक्षा, विकास आणि स्थिरतेला क्षीण करत होता. एकेकाळी असे म्हटले जात होते की पशुपतीनाथ ते तिरुपती पर्यंत पसरलेला रेड कॉरिडॉर देशासाठी सर्वात मोठा धोका होता. परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि नक्षलमुक्त भारताचे शिल्पकार अमित शहा यांच्या निर्णायक धोरणांमुळे, तोच रेड कॉरिडॉर आज विनोदाचा विषय ठरला आहे. देशातील जनतेला हे देखील माहित आहे की काँग्रेस पक्षाने नक्षलवादाला कधी गंभीरतेने घेतले नाही. मतदारसंघाच्या राजकारणासाठी तर कधी वैचारिक तडजोडीसाठी, नक्षलवादाला थेट आव्हान देण्याऐवजी त्यासाठी जागा तयार करून दिली. डाव्या पक्षांच्या दुहेरी स्वभावामुळे हा आजार वाढत राहिला. सत्तेत येण्यापूर्वी पश्चिम बंगालमधील वामपंथ्यांनी नक्षलवादाला मोकळीक दिली आणि सत्तेत आल्यावर त्याचाच नायनाट केला. म्हणजेच त्यांचे राजकीय स्वार्थ पूर्ण झाल्यानंतर नक्षलवाद निरुपयोगी ठरला. यावरून स्पष्ट होते की विकास न पोहोचण्यामागचे खरे कारण मागासलेपण नव्हे, तर शस्त्रबंद उग्रवाद होता. भारत मंथन-२०२५ च्या समारोपातून हे दिसून आले की नक्षलवाद संपवण्याच्या दिशेने झालेले ऐतिहासिक परिवर्तन हे २०१४ नंतरच शक्य झाले. त्याआधी, जम्मू आणि काश्मीर, ईशान्य आणि डाव्या विचारसरणीचे कॉरिडॉर - हे तीन हॉटस्पॉट्स भारताच्या अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करत होते. परंतु गृहमंत्रिपदाची जबाबदारी घेतल्यावर, नक्षलवाद मुळापासून नष्ट करण्यासाठी वचनबद्ध असलेल्या शहा यांनी : संवाद, सुरक्षा आणि समन्वय या तीन स्तंभांवर काम केले. २०१४ पूर्वी सरकारच्या प्रतिसादाचे नेतृत्व नक्षलवाद्यांच्या हातात होते, तर २०१४ नंतर, हे नेतृत्व गृहमंत्रालयाच्या हाती आले. आता, सरकारने आपले 'विखुरलेला दृष्टिकोन' सोडून 'एकत्रित आणि ठाम दृष्टिकोन' स्वीकारला. जे शस्त्रे सोडून मुख्य प्रवाहात प्रवाहात यायला तयार आहेत त्यांचे



स्वागत केले गेले, परंतु निरपराध आदिवासींना मारण्याचा निर्धार करणाऱ्यांविरुद्ध सुरक्षा दलांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले होते.
नक्षलवाद्यांचा निधी, कायदेशीर मदत आणि शहरी नेटवर्क तोडण्यात शहा यांची निर्णायक रणनीती दिसून आली.
नक्षलवाद्यांचा निधी, कायदेशीर मदत आणि शहरी नेटवर्क तोडण्यात शहा यांची ठोस रणनीती दिसून आली. ईडी आणि एनआयएने त्यांच्या आर्थिक पुरवठ्याला पूर्णत: आळा घातला. त्याचे परिणामही स्पष्ट दिसले: २००४-१४ च्या तुलनेत २०१४ - २०२४ मध्ये सुरक्षादलांच्या मृत्यूंमध्ये ७३% आणि नागरिकांच्या मृत्यूंमध्ये ७४% घट झाली. ही केवळ आकडेवारी नाही तर अंत्योदय राजकारणाचे प्रणेते शाह यांनी राबवलेल्या नवीन धोरणाचे यश आहे.

विशेषत: छत्तीसगडने २०२४ नंतर निर्णायक यश मिळवले. भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर फक्त एका वर्षात २९० नक्षलवादी मारले गेले, १०९० जणांना अटक करण्यात आली आणि ८८१ जणांनी आत्मसमर्पण केले. २०२५ मध्येच २७० नक्षलवादी ठार झाले, ६८० जणांना अटक करण्यात आली आणि १२२५ जणांनी शरणागती पत्करली. असे परिणाम याआधी कधीही पाहिले गेले नव्हते.

ऑपरेशन ब्लॅक फॉरेस्ट हे याचे सर्वात उल्लेखनीय उदाहरण ठरले. तेलंगणा-छत्तीसगड सीमेवर नक्षलवाद्यांचा मोठा कॅम्प ज्यामध्ये दोन वर्षांचे रेशन, आयईडी फॅक्टऱ्या आणि घातक शस्त्रे होती २३ मे २०२५ रोजी पूर्णपणे उद्ध्वस्त केला गेला. यात २७ कट्टर नक्षलवादी मारले गेले. त्यानंतर बीजापूरमध्ये आणखी २४ नक्षलवादी मारले गेले. २०२४ मध्येच ९८ उच्चस्तरीय नक्षलवादी कमांडरांचा खात्मा करण्यात आला.

आज परिस्थिती अशी आहे की २०१४ मध्ये १२६ जिल्हे नक्षलग्रस्त होते, जे आता फक्त १८ वर आले आहेत. सर्वाधिक प्रभावित जिल्हे ३६ वरून फक्त ६ वर आले आहेत. यावरून स्पष्ट होते की सुरक्षित भारताचे शिल्पकार शाह यांनी नक्षलवादाची मुळे हादरवून टाकली आहे.

जिथे एकेकाळी नक्षलवाद्यांनी रस्ते बांधकाम थांबवले होते आणि कंत्राटदारांना मारले होते, तिथे आता विकासाची गाडी वेगाने धावत आहे. आदिवासींना शिक्षण, आरोग्यसेवा आणि रोजगार मिळण्यामागील खरे कारण गरिबी नव्हे, तर शस्त्रधारी डाव्या विचारसरणीचे होते. शाह यांच्या कठोर धोरणांमुळे हा खोटा प्रचार उघड झाला आहे. शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेल्यांना वाचवण्यासाठी चिंता नाही, तर जगभरात नाकारलेल्या डाव्या विचारसरणीला जिवंत ठेवण्याची चिंता आहे आणि आणि ही वस्तुस्थिती आता सर्वांच्याच समजली आहे. आता देश २०२६ पर्यंत नक्षलवादमुक्त भारताकडे वाटचाल करत आहे. त्यामुळे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही की मोदीजींच्या दृष्टिकोन आणि शाह यांच्या रणनीतीने एकत्रितपणे इतिहास घडवला आहे. येणाऱ्या पिढ्या या काळाला लक्षात ठेवतील की काँग्रेसच्या धोरणांमुळे वाढलेल्या लाल दहशतवादाला एका दृढनिश्चयी नेतृत्वाने शेवटचा श्वास मोजायला भाग पाडले.

## सोहा अली खानची उत्सव आरोग्य मार्गदर्शक: संतुलन, आनंद आणि मुठभर बदाम



**मुंबई, ३० सप्टेंबर:** भारताचा सणासुदीचा काळ म्हणजेच भव्यता, आनंद आणि मोहक गोडधोड व चटकदार पदार्थांनी भरलेली मेजवानी. हे पदार्थ आस्वादाने खाणे योग्यच असले तरी अतिरेक केल्यास शरीर जड, सुस्त व अस्वस्थ वाटू शकते. वर्षाअखेरीपर्यंत सुरू असलेल्या सलग उत्सवांदरम्यान अभिनेत्री, लेखिका व जबाबदार आई सोहा अली खान तिचा आवडता वेलनेस मार्गदर्शक शेअर करते, ज्यामुळे ती आरोग्याशी तडजोड न करता सणांचा मनमुराद आनंद घेते.

सोहा म्हणते की पार्टीला जाण्यापूर्वी न जेवणे ही सर्वात वाईट चूक आहे. जेव्हा आपल्याला भूक लागते तेव्हा आपण अनेकदा अस्वास्थ्यकर पदार्थ निवडतो. जर तुम्ही बराच वेळ न खाता राहिलात तर तुम्ही चिडचिडे व्हाल, तणावग्रस्त व्हाल आणि नंतर तुम्ही जास्त खायला सुरुवात कराल. तिथूनच जास्त प्रमाणात खाणे सुरू होते, ती स्पष्ट करते.

तिचा सल्ला असा आहे: प्रवासात असाल तर नेहमी कॅलिफोर्निया बदामांची मूठभर सोबत ठेवा. तळलेले किंवा साखरयुक्त पदार्थ खाण्याऐवजी बदामासारखा पोटभर पर्याय निवडा. कॅलिफोर्निया बदामांच्या एक मूठ पोट भरल्यासारखे वाटू देते, ज्यामुळे जेवणांच्या मधल्या वेळेत भूक आवरता येते. त्यात आहारातील फायबर, व्हिटॅमिन ई आणि व्हिटॅमिन बी१२ सारखे अनेक पोषक तत्त्वेही मुबलक प्रमाणात असतात, असे सोहा सांगते.

आयुर्वेद, सिद्ध व युनानी ग्रंथांनुसार बदाम त्वचेसाठी लाभदायी असून ऊर्जा मिळविण्याचा एक आरोग्यदायी स्रोत आहे. चिप्स किंवा जास्त कॅलरीयुक्त पदार्थांच्या ऐवजी सोहा सोपी व झटपट बनवता येणारी स्टार्टर डिश तिळातले स्मोक्ड बदाम याची शिफारस करते.

दररोजच्या आहारात ताज्या चिरलेल्या फळांचा एक वाटा समाविष्ट करणे ही एक साधी पण उपयुक्त सणसुदीची सवय ठरू शकते, कारण फळांमध्ये नैसर्गिकरीत्या फंट व कॅलरीज कमी असतात. त्यात असे पोषकतत्त्वेही असतात जी सणासुदीच्या काळात आपण बहुतेकदा घेत नाही. फायबरयुक्त असल्याने ती पचन सुधारतात आणि तळलेले व मसालेदार पदार्थांमुळे होणाऱ्या पोटदुखी किंवा त्रासापासून संरक्षण करतात, असे सोहा सांगते.

ती सफरचंद, संत्री, चिकू, खरबूज आणि द्राक्षे अशी विविध फळे एकत्र मिसळण्याचा सल्ला देते. तुम्ही ही फळे रस किंवा स्मूदी स्वरूपात देखील घेऊ शकता आणि त्यांना कॅलिफोर्नियाच्या बदामांनी सजवून ती आणखी चविष्ट बनवू शकता.

हलत राहा: सणासुदीच्या काळात व्यायामाचे वेळापत्रक विस्कळीत होऊ शकते, परंतु सोहा साध्या हालचालींचे महत्त्व अधोरेखित करते. जलद चालणे, थोडकसा धावणे किंवा घरच्या घरी हलके स्ट्रेचिंग केल्यास अतिरिक्त कॅलरीज जळतात आणि शरीर ताजेतवाने राहते. यामुळे तुम्ही घेतलेल्या अतिरिक्त कॅलरीज देखील जळतात, असे सोहा सांगते.

हायड्रेट, हायड्रेट, हायड्रेट: शेवटी ती सांगते की, पुरेसे पाणी पिणे खूप महत्त्वाचे आहे. हायड्रेट राहण्यासाठी नेहमी पाण्याची बाटली सोबत ठेवा. भरपूर पाणी प्यायल्याने ॲसिडिटीवर नियंत्रण ठेवता येते, जी तळकट आणि तेलकट पदार्थांमुळे होते, असे ती निष्कर्ष काढते.

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांचा ए.व्ही.एम. अहमदाबाद विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश

**अहमदाबाद, ३० सप्टेंबर :** अदाणी विद्यामंदिर (ए.व्ही.एम.),अहमदाबादचा परिसर आज उत्साहाने उजळून निघाला,कारण गुजरातचे माननीय राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी विद्यार्थ्यांना धैर्य, मूल्ये आणि आशेचा संदेश दिला. अदाणी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्रीती अदाणी आणि विश्वस्त श्रीमती शिलीन अदाणी यांनी त्यांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी गार्ड ऑफ ऑनर आणि पारंपरिक पद्धतीने राज्यपालांचे स्वागत केले.



भावनांनी भारलेल्या भाषणात राज्यपाल म्हणाले: जेव्हा मुले लहानपणापासून मेहनत करतात, दुर्गुणांपासून दूर राहतात आणि पुढे जाण्याचा निश्चय करतात. त्यांना जगातील कोणतीही शक्ती अडवू शकत नाही. अशा मुलांसाठी नवनवीन दारे नेहमीच उघडतात.

त्यांनी विद्यार्थ्यांना आठवण करून दिली की कठीण परिस्थितीतून आलेला पार्श्वभूमी कधीही अडथळा ठरत नाही, जर एखाद्याने परिश्रम आणि प्रामाणिकता निवडली तर. त्यांनी अमेरिकेचे माजी अध्यक्ष अब्राहम लिंकन आणि भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जीवनप्रवास उदाहरण म्हणून दिले,ज्यांनी संकटांवर मात करून जगावर आपली छाप सोडली.

राज्यपालांनी विद्यार्थ्यांना साधेपणाने आणि जबाबदारीने जगण्याचे आवाहन केले. त्यांनी पौष्टिक आहार घ्यावा, प्रामाणिक राहावे आणि शंका, लाज किंवा भीती निर्माण करणारे निर्णय टाळावेत असे सुचवले.

ए.व्ही.एम.च्या निःशुल्क,मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या अद्वितीय मॉडेलचे कौतुक करताना आचार्य देवव्रत यांनी अदाणी फाउंडेशनचे अभिनंदन केले की ते वंचित मुलांना आयआयटी, आयआयएमपासून ते एआयआयएमएससारख्या भारतातील सर्वोच्च संस्थांमध्ये पोहोचण्यास सक्षम करत आहेत.

त्यांचा हा दौरा ए.व्ही.एम.च्या चेंजमेकर सिरीजचा भाग होता, ज्यामध्ये नामवंत व्यक्ती येऊन विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनप्रवासाने प्रेरित करतात. गेल्या काही वर्षांत शाळेत निश्चल नारायण (गणित तज्ज्ञ, भारतातील सर्वात लहान वयाचा सी.ए., जून २०२४),जॉन अब्राहम (अभिनेता, निर्माता आणि समाजसेवक, एप्रिल २०२४), निलेश देसाई (संचालक एसएसी/इस्रो, जुलै २०२३), सिंथिया मॅक्कॅफ्री (देश प्रमुख, युनिसेफ, जुलै २०२३) आणि सफिन हसन (भारताचा सर्वात लहान वयाचा आयपीएस अधिकारी, डिसेंबर २०२२) यांचा समावेश आहे.

२००८ मध्ये स्थापन झालेले ए.व्ही.एम. निःशुल्क, सर्वांगीण शिक्षण देते ज्यामध्ये शिकवणी, पुस्तके, गणवेश, जेवण, सहशालेय उपक्रम आणि वाहतूक सुविधा यांचा समावेश आहे. हे पहिले पिढीतील विद्यार्थ्यांसाठी आशेचा दीप आहे, जेथे शैक्षणिक उत्कृष्टतेसह नैतिकता, मूल्ये, शिस्त आणि सामाजिक जबाबदारी यांचे मिश्रण आहे. अदाणी फाउंडेशन अशा ४ अदाणी विद्यामंदिर शाळा चालवते. अहमदाबाद आणि भद्रेश्वर (गुजरात), कृष्णपट्टणम (आंध्र प्रदेश) आणि सुरगुजा (छत्तीसगड).

राज्यपालांच्या प्रेरणादायी विचारांनी ए.व्ही.एम. परिवाराला प्रेरित केले,ज्यामुळे पुन्हा एकदा विश्वास दृढ झाला की मूल्याधिष्ठित शिक्षणच असे लीडर्स घडवते जे राष्ट्राचे भविष्य घडवू शकतात.

## एअरटेल बिझनेसने स्विफ्ट नेव्हिगेशनसोबत भागीदारी करून भारतातील पहिले नेक्स्ट-जेन स्पॅशियल प्रिसीजन सोल्यूशन लॉन्च

**मुंबई, ३० सप्टेंबर :** एअरटेल बिझनेसने अचूक-लोकेशन तंत्रज्ञानातील अग्रगण्य कंपनी स्विफ्ट नेव्हिगेशनसोबत धोरणात्मक भागीदारी केली आहे. या अंतर्गत भारताची पहिली एआय/एमएल-चालित, क्लाउड-आधारित लोकेशन सेवा एअरटेल-स्कायलार्क प्रिसाईज पोझिशनिंग सर्विस सुरू केली जात आहे. ही सेवा पारंपरिक जीएनएसएस (ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टम)च्या तुलनेत अचूकता १०० पटपर्यंत वाढवेल.

एअरटेल बिझनेस आणि स्विफ्ट नेव्हिगेशनची ही विशेष भागीदारी, एअरटेल-स्कायलार्क ला एअरटेलच्या संपूर्ण भारतभर पसरलेल्या मजबूत ४जी/५जी नेटवर्कसोबत जोडून सादर करेल. यामुळे एक विश्वसनीय आणि सहज उपलब्ध सेंटीमीटर-स्तरावरील अचूक लोकेशन सेवा मिळेल, ज्याचा उपयोग मोठ्या प्रमाणावर आवश्यक आणि लोकेशन-आधारित कामांसाठी केला जाऊ शकेल.

शरत सिन्हा, डायरेक्टर आणि सीईओ एअरटेल बिझनेस, म्हणाले, आपल्या सारख्या देशात, जिथे गल्ल्यांचा आणि वाड्यांचा गुंता आहे, तिथे प्रत्येक सेंटीमीटर अचूक लोकेशन किंवा पत्ता ओळखण्यात खूप मोठा फरक पडतो, विशेषत: आपत्कालीन सेवांसाठी (फर्स्ट रिस्पॉन्डर्स) महत्त्वाचा ठरतो. स्विफ्ट नेव्हिगेशनसोबत भागीदारी करून आम्हाला अभिमान वाटतो की आम्ही भारताची पहिली क्लाउड-आधारित, एआय/एमएल-चालित जीएनएसएस करेक्शन्स सर्विस सुरू करत आहोत, जी सेंटीमीटर-स्तरावरील अचूकता प्रदान करेल. ही क्रांतिकारी तंत्रज्ञान केवळ आपत्कालीन सेवांचा कायापालट करणार नाही, तर औद्योगिक वापरांसाठी नवे मानक निश्चित करेल आणि स्वयंचलित गाड्या तसेच सॅटेलाइट-आधारित टोल वसुली यांसारख्या नवीन उपायांना देखील गती देईल.

होल्गर इप्पाख, ईव्हीपी प्रॉडक्ट आणि मार्केटिंग, स्विफ्ट नेव्हिगेशन, म्हणाले, आम्ही एअरटेलसोबत मिळून स्कायलार्क भारतात आणण्यासाठी अत्यंत उत्साहित आहोत. एअरटेलच्या मजबूत IoT सेवा आणि सोल्यूशन्सच्या आधारे आम्ही देशभरातील व्यवसायांना आणि डेव्हलपर्सना सहजपणे अचूक लोकेशन तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी मदत करत आहोत, ज्यामुळे कामकाज अधिक स्वयंचलित आणि आधुनिक होऊ शकेल.

## व्यापक आणि परवडणाऱ्या विमा उपायांसह मणिपालसिग्नाने नागपुरात सर्व:समावेशक आरोग्यसेवेला गती दिली

**नागपूर, ३० सप्टेंबर :** भारतातील अग्रगण्य आरोग्य विमा कंपन्यांपैकी एक मणिपालसिग्ना हेल्थ इन्शुरन्सने नागपुरात आरोग्यसेवेची सुलभता आणि आर्थिक संरक्षणासाठी महत्त्वाची पाऊले उचलली आहेत. गेल्या आर्थिक वर्षात (२०२४-२५) मिळालेले ९४% दावे कंपनीने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये यशस्वीरित्या निकालात काढले. यामुळे ग्राहकांना सर्व:धिक गरज असताना आर्थिक मदत देण्याची त्यांची भूमिका समोर आली आहे. महाराष्ट्रात, विशेषत: टियर २ आणि ३ शहरांमध्ये आरोग्य विमा हे अजूनही एक महत्त्वाचे आव्हान आहे. इथे अजूनही आवाक्यातील विमा आणि जागरूकता हे प्रमुख अडथळे आहेत. ही तफावत कमी करण्यासाठी मणिपालसिग्नाचे प्रयत्न सुरू आहेत. १३ कोटींहून, अधिक लोकसंख्या असलेला महाराष्ट्र सध्या वाढत्या आरोग्य समस्यांना तोंड देतो आहे. यातही महत्त्वाचे आव्हान आहे ते संसर्गजन्य नसलेल्या पण महत्त्वाच्या अशा उच्च रक्तदाब आणि मधुमेह यांसारख्या आजारांचे. असे आजार (एनसीडी) झपाट्याने वाढत असून जवळजवळ ३०% लोकसंख्या याने ग्रस्त आहे. जीवनशैलीशी संबंधित आजार वाढत असतानाच कुटुंबांसाठीच्या वैद्यकीय खर्चात झपाट्याने वाढ होते आहे. रुग्णालयात दाखल होणे आणि दीर्घकालीन उपचारांमुळे अनेकदा मध्यम आणि कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांवर गंभीर आर्थिक ताण येतो. हे वाढते आरोग्य संकट व्यापक आरोग्य विमा संरक्षणाची गरज अधोरेखित करते जे केवळ आर्थिक संरक्षण प्रदान करत नाही तर योग्य काळजी, लवकर निदान आणि प्रभावी रोग व्यवस्थापनाला देखील प्रोत्साहन देते.

या महत्त्वाच्या गरजेची पूर्तता करण्यासाठी, कंपनीने गेल्या वर्षी मणिपालसिग्ना सर्व: सादर केले. नेल्सन आयक्यूने केलेल्या ग्राहक सर्वेक्षणात वर्षातील सर्वोत्तम उत्पादन म्हणून निवडले गेलेले, मणिपालसिग्ना सर्व: हा एक नावीन्यपूर्ण आरोग्य विमा उपाय आहे. सर्व:समावेशक आणि परवडणारे कव्हर देण्यासाठी हा डिझाइन करण्यात आला आहे. यामुळे कुटुंबांना त्यांचे आरोग्य आणि आर्थिक कल्याण दोन्ही सुरक्षित करता येते. उत्तम, परम आणि प्रथम अशा तीन विविध प्रकारांमध्ये हे उत्पादन उपलब्ध असून यामुळे विविध फायदे मिळतात:

ऑक्टोबर २०२४ मध्ये लाँच झाल्यापासून, मणिपालसिग्ना सर्व: ने संपूर्ण महाराष्ट्रात चांगली लोकप्रियता मिळवली आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे वंचित समुदायांमधील कुटुंबांना वेळेवर आर्थिक मदत मिळणे शक्य झाले आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होऊ लागली.

विमा जागरूकता आणि जास्तीत जास्त लोकांपर्यंत विम्याचे महत्त्व पोहोचावे यासाठी मणिपालसिग्नाचे प्रयत्न हे उपक्रम म्हणजे भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाच्या (IRDAI)"2047 पर्यंत सर्वांसाठी विमा या ध्येयाशी जोडलेले आहेत. यामुळे परवडणारे, सहज आणि सर्व:समावेशक आरोग्यसेवा उपाय सामान्यांच्या आवाक्यात येतात आणि कंपनीची वचनबद्धता सिद्ध होते.

## ऊर्जा साठवण उत्पादनांचा फेरवापर करणाऱ्या आर्डी इंडस्ट्रीजने सेबीकडे दाखल केली आयपीओची कागदपत्रे

**मुंबई, ३० सप्टेंबर :** आर्डी इंडस्ट्रीज लिमिटेडने (आर्डी किंवा कंपनी) दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे. यामध्ये ३२० कोटी रुपयांपर्यंतच्या फ्रेश इश्यूचा आणि प्रत्येकी २ रुपये दर्शनी मूल्य असलेल्या ३७,६५०,००० इक्विटी शेअर्सच्या विक्री प्रस्तावाचा (ऑफर फॉर सेल) समावेश आहे.

वापर संपलेल्या ऊर्जा साठवणुकीच्या साधनांवर आणि नॉन-फेरस स्क्रॅपवर पर्यावरणपूरक पद्धतीने फेरप्रक्रिया करून त्यांचा फेरवापर करण्याच्या परिवर्तनकारी अर्थव्यवस्थेमध्ये अग्रगण्य असलेली आणि या प्रक्रियेतून महत्त्वाची नैसर्गिक वा धातूजन्य संसाधने पुन्हा मिळवणारी आर्डी इंडस्ट्रीज ही भारतातील आघाडीची कंपनी आहे. कंपनीच्या उत्पादनांमध्ये शुद्ध शिसे, तसेच लेड कॅल्शियम मिश्रधातू, लेड अँटिमनी मिश्रधातू, लेड टिन मिश्रधातू, लेड सिल्व्हर मिश्रधातू आणि लेड कॅडमियम मिश्रधातू अशा शिशाच्या विविध मिश्रधातूंचा समावेश होतो. या उत्पादनांचा वापर ऊर्जा साठवणूक, ई-मोबिलिटी, मोटार वाहन, रासायनिक उद्योग इत्यादी महत्त्वाच्या क्षेत्रांत होतो.

संकलन, फेरवापर आणि उत्पादन या सर्व टप्प्यांचे संपूर्ण चक्र पूर्ण करून आर्डी इंडस्ट्रीज कंपनी भारताचे महत्त्वाच्या धातूंच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करते, देशांतर्गत संसाधनांच्या सुरक्षिततेला बळकटी देते आणि औद्योगिक वाढीमुळे होणारा पर्यावरणीय परिणामही कमी करते. कंपनीची फेरप्रक्रियेची स्थापित क्षमता वार्षिक १०४,०२५ मेट्रिक टन इतकी आहे.

## शब्दकोडे क्रमांक २२२९



**आडवे शब्द :-**
१) झुकुझुकु आगिनगाडी गाण्यातील पुढची ओळ
८) दुर्बळ, असमर्थ
११) एक कडवे धान्य
१२) समुद्राचा किनारा
१४) गणेश
१६) सूर्य
१७) वजनदार
१८) अवधान
१९) गोमाता
२०) उंटाच्या पाठीवर उंचवटा
२२) ठाणवई
२५) एक चतुर्थांश
२६) एकरूपता
२८) इंद्रिय, घटक
३०) अभिप्राय
३१) राजाला न आवडणारी राणी
३३) फोडातील द्रव
३४) रात्रीचा अखेरचा प्रहर
३५) चामखीळ
३७) दरवाजा
३९) चीजवस्तू
४१) चहापिण्याचे जोडसाधन
४४) युद्ध
४६) नखे काढण्याचे हत्यार
४७) जखमेवरील जाद झालेले कातडे
४८) तृष्णा
५०) लाकडी तटबंदी
५१) मनाचा ओढा
५२) उत्तर भारतातील एक रामभक्त संत
५५) रंग
५६) सीतापती
५७) भारताचा नागरिक
६०) दु:ख, खेद
६१) आश्रय, टेका, प्रमाण
६२) गवंडी
६५) सेवक
६७) पती
६८) राजांचाही राज, सम्राट
७०) अर्धांगवायू
७१) मौज, गम्मत
७३) घाबरणे
७४) कोवळाअंकुर
७५) कपोल

**उभे शब्द :-**
२) अष्टविनायकातील एक गाव
३) सत्ताविसावे नक्षत्र
४) नगरपाल
५) लता
६) व्याकुळ, घाबरा
७) रास
८) चिवट
९) केसांची बट
१०) रात्रंदिवस
१३) दुलई
१५) दूध, पाणी
२०) माझा
२१) जिव्हा
२३) थोरवी
२४) परमेश्वर
२५) पाप दूर करणे
२६) आठवण
२७) खिडकीची काच
२८) शेळी
२९) परशुरामाची आई, रेणुकादेवी
३०) रात्रभर
३२) भीती
३५) चिंतन
३६) सासर (हिं.)
३८) करंडी
४०) दोन रत्ने
४१) लबाडी, कारस्थान
४२) थंड, गार
४३) जन्म मृत्यू
४५) प्रवासातील टप्पा
४७) धोका
४९) मोठा भाऊ
५१) कान
५२) देहूचे संत
५३) जानकी
५४) विचार मांडण्यासाठी बोलाविलेली बैठक
५५) जमीनजुमला
५६) कृष्णसखी
५८) प्रचंड रास, खरकटे वगैरेचा ढीग
५९) जेव्हा
६१) विश्रांती
६३) आगबोट
६४) पायजमा
६६) मनाला टोचणे
६९) सोन्याचा धागा, कलाबूत
७२) स्थान, जागृत

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## प्यूमोरी मेहता इत्ती सी खुशी मालिकेत विराटच्या आईच्या, उर्वशीच्या रूपात दाखल!

**मुंबई, ३० सप्टेंबर:** सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान) या तरुणीची कहाणी उलगडून दाखवली आहे. अन्विता जीवनातील आव्हानांना हिंमतीने, चिकाटीने आणि आशावादी वृत्तीने तोंड देते आणि आपल्या धाकट्या भावंडांचा सांभाळ करते. एकीकडे तिचे वडील सुहास आहेत (वरुण बडोला), ज्याच्या बेफिकिर स्वभावामुळे त्यांच्या कुटुंबात काही ना काही गोंधळ माजत असतो. आणि त्यामुळे अन्विताला तिच्या वयाला शोभणार नाही इतकी जबाबदारी पेलावी लागते. या संघर्षात तिचा दृढनिश्चय आणि सकारात्मकता कुटुंबाचा मुख्य आधार बनून कुटुंबाला सावरतात. अलीकडच्या भागांमध्ये प्रेक्षकांनी पाहिले की, अन्विताचा प्रियकर विराट (रजत वर्मा) आपली खरी ओळख लपवत असतो. डान्स स्पर्धेच्या वेळी तो तिला एकटीला सोडून गायब होतो आणि आपले बिंग फुटू नये म्हणून अन्विताचा बालपणीचा मित्र संजय याला (ऋषी सक्सेना) थोपवण्याचा प्रयत्न करतो.

कथानकात आणखी गहनता आणण्यासाठी अभिनेत्री प्युमोरी मेहता विराटची आई उर्वशीच्या भूमिकेत मालिकेत दाखल होत आहे. उर्वशी एक सधन, सामाजिक दृष्ट्या महत्त्वाकांक्षी स्त्री आहे, जिच्या लेखी संपत्ती आणि दर्जा यांचे महत्त्व भावनांपेक्षा जास्त आहे. जिद्दी, फटकळ आणि पाताळयंत्री स्वभावाच्या उर्वशीचा एक दबदबा आहे आणि ती बऱ्याचदा विराटच्या निर्णय घेण्याच्या अधिकारात देखील हस्तक्षेप करते. सामाजिक बंधने सांभाळणे आणि स्वतःच्या मर्जीने जगणे याबाबत ती कोणतीही तडजोड करण्यास तयार नाही. आपल्या मुलाबाबत तिच्या मनात अधिकार भावना आहे, ज्यामुळे विराटच्या आयुष्यात तिचे स्थान खूप मोठे आहे. आपल्या भूमिकेविषयी बोलताना प्युमोरी मेहता म्हणते, मी जेव्हा उर्वशीविषयी पहिल्यांदा ऐकले, तेव्हाच मला वाटले की, आपण आपल्या आजूबाजूला पाहतो, त्यापेक्षा ही आई फार वेगळी आहे.

## आज का अंदाज

बुधवार १ ऑक्टोबर २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| ४११ | २६७ | १७८ | १३५ | १६६ | १४९ | १६८ | ५६७ |
| ५७० | ७८० | ३५८ | ३६० | ५१८ | २५७ | २३० | ४४० |
| ६६० | ६१० | २६८ | ५६८ | २४७ | ७८१ | ३३१ | ३५० |
| २४ | ५० | ६१ | ११ | ३२ | ४२ | ५१ | ८१ |
| २७ | ५४ | ६८ | १८ | ३९ | ४९ | ५७ | ८७ |
| २० | ५७ | ६३ | १३ | ३६ | ४६ | ५० | ८० |

१ ऑक्टोबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४३ | ७३ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ |
| ५६१ | १११ | १४९ | ३७७ |
| ४७१ | २२७ | २४८ | ४६७ |
| ३८९ | ३८० | ३४७ | ५५७ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

२ १ ७ ९ ०

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** संवेदनशील समस्या प्रेमाने आणि समजुतीने सोडवा. घरी संघर्ष टाळा; समजूतदारपणा आणि सहकार्यामुळे नातेसंबंध मजबूत होतील. आज, तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा.

**वृषभ :** तुमच्या प्रतिभेचा आणि आकर्षणाचा वापर नातेसंबंधांमध्ये आणि कामात चांगल्या प्रकारे करा. अहंकार टाळा आणि नम्र राहा. तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत खरेदीला जाण्याचा विचार करू शकता.

**मिथुन :** आज तुम्ही आरोग्यात व्यस्त राहाल आणि संध्याकाळपर्यंत तुम्हाला थोडा थकवा जाणवू शकतो. जुन्या मैत्रीमुळे आज तुम्हाला खूप फायदा होईल. तुम्ही एकत्र एक नवीन सुरुवात करू शकता.

**कर्क :** आजचा दिवस खूप खास असेल. आज, तुम्ही अशा गोष्टींना प्राधान्य द्याल ज्यामुळे तुम्हाला आनंद आणि नफा दोन्ही मिळेल. तुमच्या जीवनात तटस्थता आणि स्पष्टता प्रबळ असेल.

**सिंह :** आज, तुम्ही तुमच्या मोठ्या भावाची मदत घेऊन एखादे काम पूर्ण करू शकता. यामुळे काम वेळेवर आणि सर्वोत्तम पद्धतीने पूर्ण होईल याची खात्री होईल. इतरांच्या भावनांचा आदर करा

**कन्या :** आज तुम्ही सर्जनशील कामांकडे अधिक कल ठेवाल. आज तुमच्या नोकरीतील अडथळे दूर होतील आणि तुम्हाला बहुराष्ट्रीय कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळेल. चांगला नफा होईल.

**तुळ :** आज, तुम्हाला व्यवसायात चांगला नफा मिळेल, ज्यामुळे तुमच्या घरात आनंद येईल. तुमच्या वैवाहिक जीवनात सुरू असलेल्या कोणत्याही समस्या आज दूर होतील आणि कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

**वृश्चिक :** आज तुम्हाला प्रगतीच्या नवीन संधी मिळतील, ज्याचा फायदा घेऊन तुम्ही आयुष्यात पुढे जाऊ शकता. या राशीच्या अविवाहित व्यक्तींना लवकरच लग्नाचे प्रस्ताव येऊ शकतात.

**धनु :** तुम्हाला एखाद्या कायदेशीर प्रकरणाबाबत वरिष्ठ अधिकाजयांकडून सल्ला मिळेल, ज्यामुळे प्रकरण लवकर सोडवण्यास मदत होईल. तुम्ही एखादे काम शांततेने पूर्ण कराल.

**मकर :** आज, तुम्हाला कुटुंबातील वडीलधाजयांकडून सल्ला मिळेल, ज्यामुळे कोणतेही काम पूर्ण करणे सोपे होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांकडून पूर्ण पाठिंबा मिळेल.

**कुंभ :** कापड व्यापाजयांना आज अपेक्षेपेक्षा जास्त नफा मिळेल, ज्यामुळे त्यांच्या व्यवसायात वाढ होईल. तुमचे व्यावसायिक उपक्रम सुरळीत सुरू राहतील. कामाच्या ठिकाणी संयम आणि पूर्ण तयारी आवश्यक आहे.

**मीन :** आज, तुम्हाला एका ऐतिहासिक परंपरेशी जोडण्याची एक उत्तम संधी मिळेल, जी तुम्हाला तुमच्या चालीरीती आणि परंपरा चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत करेल. अडकलेलं काम पूर्ण होईल.

# सावत्र बापाकडून पाच वर्षीय चिमुकलीवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. १ :**

खदान पोलिस ठाण्याच्या हद्दीत सावत्र बापाने पाच वर्षीय मुलीवर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणातील खदान पोलिसांनी आरोपी विरुद्ध लैंगिक अत्याचार व पोस्को अन्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. पीडित मुलीची आई गरबा पाहण्यासाठी बाहेर गेली होती. जाण्यापूर्वी तिने मुलगा आणि मुलीला सावत्र वडिलांकडे सोपले. याचा गैरफायदा घेत आरोपी सावत्र वडिलाने रात्री साडेदहाच्या सुमारास पाच वर्षीय निरागस चिमुरडीवर लैंगिक अत्याचार केला. अत्याचारानंतर मुलीला तीव्र वेदना होऊ लागल्या आणि ती अस्वस्थ झाली. आई घरी आल्यानंतर झोपण्यापूर्वी मुलीने संपूर्ण हकीकत आईला सांगितली. हे ऐकताच आईने तत्काळ मुलीला शासकीय रुग्णालयात नेऊन दाखल केले.



सध्या पीडित बालिकेवर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून, डॉक्टर तिच्या प्रकृतीवर बारीक लक्ष ठेवून आहेत. घटनेची माहिती मिळताच खदान पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि तपास सुरू केला आहे. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला असून, त्याला अटक केली आहे, अशी माहिती खदान पोलिस ठाण्याचे ठाणेदार मनोज केदारे यांनी दिली. बाप-लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी ही हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. शहरातील खदान पोलिस स्टेशन हद्दीतील एका नराधम सावत्र बापाने आपल्या केवळ पाच वर्षांच्या चिमुकल्या मुलीवर लैंगिक अत्याचार केला आहे. या भीषण प्रकारामुळे संपूर्ण जिल्हा हादरून गेला असून परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. निरागस बालिकेवर अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात तातडीने उपचार सुरू करण्यात आले असून तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. दरम्यान, पोलिसांनी अवघ्या काही तासांत आरोपी सावत्र बापाला अटक करत त्याला न्यायालयीन कोठडीत ठेवले आहे. या प्रकरणामुळे पुन्हा एकदा बालिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पीडित बालिकेची आई गरबा खेळण्यासाठी बाहेर गेली होती. घरात मुलगी आणि सावत्र बाप दोघेच असताना आरोपीने संधी साधून मुलीवर अमानुष अत्याचार केला. घटनेनंतर मुलीला तीव्र पोटदुखी जाणवू लागली. आई घरी परतल्यावर निरागस चिमुकलीने धैर्य दाखवत घडलेला प्रकार आईला सांगितला. त्यानंतर तातडीने मुलीला अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीत अत्याचार झाल्याचे स्पष्ट झाले आणि त्यानंतर संपूर्ण प्रकार पोलिसांच्या लक्षात आला. मुलीवर सध्या वैद्यकीय अधिकारी व उपचार पथक लक्ष ठेवून असून तिची प्रकृती नियंत्रणात असल्याची माहिती मिळाली आहे.

प्रकरणाची माहिती मिळताच खदान पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. अवघ्या काही तासांत नराधम सावत्र बापाला अटक करण्यात आली. पोलिसांनी त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करत संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. प्राथमिक चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती मिळत आहे. पोलिसांकडून सखोल तपास सुरू असून न्यायालयात आरोपीला हजर केले असता त्याला कोठडी देण्यात आली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणावर संताप व्यक्त करत असून आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी जनतेतून होत आहे.

# श्री माता महाकाली, शाळू देवी मंदिरात नवरात्री उत्सव

■ महासागर प्रतिनिधी
**मलकापूर, दि. ३० :**

शहरातील प्राचीन मंदिरांपैकी असणारे नळगंगा नदीच्या तीरावर वसलेले श्री. माता महाकाली, शाळू देवी मंदिरात नवरात्री उत्सवानिमित्ताने नऊ दिवस विविध धार्मिक सांस्कृतिक तथा समाज उपयोगी उपक्रम राबवित मोठ्या उत्साहाने नवरात्री उत्सव साजरा करण्यात येतो. मलकापूर शहर म्हणजे धार्मिकतेचा वसा असलेले शहर असून येथे विविध धार्मिक सण उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे करण्यात येतात. शहरातील नळगंगा नदीच्या तीरावर वसलेले पुरातन श्री माता महाकालीचे मंदिर असून या ठिकाणी दरवर्षी अश्विन नवरात्री उत्सवानिमित्ताने नऊ दिवस विविध धार्मिक सांस्कृतिक तथा समाज उपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. या ठिकाणी संत तुकडोजी महाराज, गाडगे महाराज व तनपुरे महाराज यांच्या कीर्तनाचे कार्यक्रम सुद्धा झालेले असल्याची माहिती मिळते. यावर्षी २२ सप्टेंबर पासून सुरू होणाऱ्या नवरात्र उत्सवानिमित्ताने पहिल्या दिवशी घटस्थापना देवीपूजन, दुसऱ्या दिवशी दुर्गा श्री स्वामी समर्थ केंद्र मलकापूर यांचे सप्तशती पाठ, तर रात्री समाज सुधारक संत तुकडोजी महाराज प्रेरित कुलमखेड येथील गुरुदेव सेवा मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम, तसेच तिसऱ्या दिवशी व्याख्याते ओम शिंदे यांचे धर्मसंवाद व विषयावर चर्चा सत्राचे आयोजन सायंकाळी ५ वाजता, चवथ्या दिवशी कृष्णदास सेवा समिती मलकापूर यांचे कल्याणिपदी, पाचव्या दिवशी श्री.माता महाकाली महिला भजनी मंडळ, शनिवारी श्रीराम सुंदर कांड सत्संग मंडळाचा सुंदरकांड पठण, रविवार रोजी परिसरातील नागरिकांकरिता मोहनराव नारायण नेत्रालय यांचे दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत मोफत नेत्र तपासणी शिबिर, सातव्या दिवशी संत निरंकारी सत्संग मंडळ, आठव्या दिवशी ओम सुंदर कांड सत्संग कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.



धार्मिक परंपरेनुसार नवरात्री उत्सवानिमित्ताने आम्ही आई भगवतीचे भजन व पूजन त्याचबरोबर समाजाला उपयोग होईल अशा उपक्रमांचे आयोजन करीत असतो. हे कार्य पूर्वापार पिढीजात करीत आहोत. या कार्यक्रमांचा लाभ परिसरातील भाविक भक्त मोठ्या उत्साहाने घेत असतात.

**महंत नगीनदास प्रल्हादास बैरागी**

# कीटकनाशक फवारणी विषबाधेने तरुणाचा मृत्यू

**अकोला :** शेतातील पिकावर कीटक नाशकाची फवारणी करताना विषबाधा झाल्याने उपचार घेत असलेल्या वडनेर गंगाई येथील एका तरुण शेतकऱ्याचा सोमवारी दुपारी १२ वाजता येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय संचलित सर्वोपचार रुग्णालयात मृत्यू झाला. गणेश ज्ञानेश्वर कात्रे (२३), रा. वडनेर गंगाई असे या शेतकऱ्याचे नाव आहे. तुरीच्या पिकावर फवारणी करण्यासाठी वडनेर गंगाई (ता. दर्यापूर) शिवारातील शेतात गणेश हा गेला होता. गत दोन ते तीन दिवसांत अकोला व मूर्तिजापूर तालुक्यातील १५ शेतकऱ्यांना कीटकनाशक फवारणी दरम्यान विषबाधा झाली असून, या रुग्णांना सर्वोपचार रुग्णालयातील वॉर्ड ३१ व ३२ मध्ये दाखल करण्यात आले आहे. सर्व रुग्णांवर उपचार सुरू असून, यातील एकाचा सोमवारी मृत्यू झाला तर इतरांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. श्यामकुमार सिरसाम यांनी दिली.



# श्री बालाजी महाराज उत्सवांसाठी महिला स्वयंसेविका सज्ज

■ महासागर प्रतिनिधी
**देऊळगाव राजा , दि. ३० :**

सध्या शहरामध्ये श्री बालाजी महाराजांच्या विविध उत्सवांना सुरुवात झाली आहे. मंडपोत्सव, पालखी मिरवणूक, लळितोत्सव तसेच इतर उत्सवांची तयारी जोमात सुरू आहे. हे उत्सव साजरे करताना यामध्ये मानकरी व भाविक आपले योगदान देत असतात. राणीसाहेब सौ. छायाराजे विजयसिंह जाधव तसेच परिसरातील महिलांच्या पुढाकारातून तीन वर्षांपूर्वी देऊळगावराजा शहर व ग्रामीण भागातील महिला स्वयंसेविकांच्या उत्सव काळातील सेवाकार्यास सुरुवात झाली आणि वर्षागणिक त्यास वाढता प्रतिसाद मिळत आहे. महिला स्वयंसेविकांच्या सेवाकार्याबाबतची यावर्षीची नियोजन सभा दि. २६ सप्टेंबर रोजी श्री बालाजी संस्थानच्या भक्तनिवासात पार पडली आहे. स्वयंसेविकांचा समूह आठ गटांमध्ये विभागला असून प्रत्येक गटामध्ये गटप्रमुखासह प्रत्येकी १५ महिला याप्रमाणे एकूण १२० महिला सेवारत आहेत. सकाळी ७ ते रात्री ११ पर्यंत प्रत्येक दोन तासासाठी एक गट याप्रमाणे एकूण सोळा तास वरील ८ गट सेवा देण्यासाठी तत्पर आहेत. या स्वयंसेविकांच्या माध्यमातून मंदिर परिसर स्वच्छ ठेवणे, मंदिर परिसरामध्ये दर्शन रांगा व्यवस्थित राहतील यासाठी भाविकांना सूचना देणे, मंडपोत्सवातील लाटांजवळ स्वच्छता ठेवणे, भाविकांना अन्नछत्रातील सेवा देणे यासह चप्पल स्टॅन्ड सेवा आणि इतर सेवाकार्य केले जाते. वरील बाबींसाठीचे तसेच स्वच्छतेसाठीचे सर्व साहित्य पुरवण्याचे कार्य श्री बालाजी संस्थानचे कर्मचारी करीत असतात. स्वयंसेविकांनी स्वतःसाठी एक ड्रेस कोड ठरवून घेतला असून ऑरेंज साडी व ओळखपत्र त्या परिधान करतात. उत्सव संपल्यानंतर ओळखपत्र श्री बालाजी संस्थान कार्यालयात जमा केले जाते. महिला स्वयंसेविका हे सेवाकार्य अतिशय निष्ठेने, भक्तीभावाने व सातत्याने करीत असून, उत्सव काळात ते सर्वांना जाणवत आहे. या स्वयंसेविकांचे परिसरातील नागरिकांनी दरवर्षी कौतुकच केले आहे. श्री बालाजी संस्थानचे वंशपारंपरिक विश्वस्त राजे विजयसिंह जाधव यांनीही महिलांच्या या सेवावृत्तीची दखल घेऊन त्यांची मनापासून प्रशंसा केली आहे.



# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात एपीआय प्रमाणपत्रावरून गहजब

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. ३० :**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील प्राचार्य, डीन, प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक नियुक्तीसाठी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आय.क्यू.ए.सी. कडून अनिवार्य शैक्षणिक कामगिरी निर्देशक प्रमाणपत्र घेण्याबाबतचा निर्णय काल २९ सप्टेंबर २०२५ झालेल्या विद्यापीठाच्या सिनेट सभेत गहजबाचा विषय ठरला. सिनेट सभेला प्रारंभ होताच नुटा संघटनेचे सिनेट सदस्य डॉ. प्रशांत विघे यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून कुलगुरू डॉ. मिलिंद बाराहाते यांना या निर्णयासंदर्भात प्रश्न उपस्थित केला. यावर कुलगुरूंनी हा निर्णय व्यवस्थापन परिषदेचा असल्याचे सांगितल्यानंतर डॉ. प्रशांत विघे यांनी स्पष्ट केले की, व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकांच्या कारकिर्द उन्नती योजना संदर्भात शैक्षणिक कामगिरी निर्देशक Academic Performance Indicator प्रमाणपत्र देण्याचा कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ तसेच विद्यापीठ अनुदान आयोग दिनांक १८ जुलै २०१८ च्या नियमांमध्येही विद्यापीठ स्तरावर API प्रमाणपत्र देण्याची कोणतीही तरतूद नसल्याचे डॉ. विघे यांनी अधोरेखित केले. संबंधित महाविद्यालयातील आय.क्यू.ए.सी. कक्षाचीच असल्याचे त्यांनी नमूद केले. मग उमेदवारांकडून ५ हजार रुपये घेऊन प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया कोणत्या कायद्यानुसार राबवली जात आहे, असा थेट सवाल त्यांनी केला.

या चर्चेत नुटाचे डॉ. रवींद्र मुंद्रे यांनीही सहभाग घेत चुकीची परंपरा निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. तर नुटा संघटनेचे अध्यक्ष व व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी यांनीही CAS-API प्रमाणपत्राबाबत व्यवस्थापन परिषदेत कोणताही निर्णय झालेला नाही, अशी ठाम भूमिका घेतली.

त्यामुळे ज्या उमेदवारांनी एपीआय शुल्क भरले आहे त्यांचे पैसे परत करावेत, अशी मागणी त्यांनी केली. चर्चेत नुटाचे डॉ. सुभाष गावंडे, डॉ. संतोष बनसोड, डॉ. संतोष कुटे, तसेच प्राचार्य डॉ. राधेश्याम शिकची यांनी उअड संदर्भातील निर्णय मागे घेण्याची मागणी केली.

## ओला दुष्काळ व कर्जमाफीसाठी संभाजी ब्रिगेड आक्रमक

**मेहकर :** उपविभागीय अधिकारी कार्यालया बाहेर संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष शेतकरी नेते पांडुरंग पाटील यांच्या नेतृत्वात तालुका व जिल्हाभरातील हजारो शेतकरी ओला दुष्काळ,विना अटी-शर्तीसातबारा कोरा, हेक्टरी किमान पन्नास हजार रुपए मदत,प्रलंबीत पिकविमे,योजनांचे रखडलेले अनुदान व शेतकर्यांना सोलार प्लेटसाठी विलंब करनार्या कंपन्यांविरोधात आक्रमक होत भव्य शेतकरी संघर्ष आंदोलन पार पडले.यावेळी शेतकर्यांसहीत संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकार्यांचे रौद्र रुप पहायला मिळाले.प्रशासन व सरकारच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेड पदाधिकारी व शेतकर्यांच्या वतीने महामार्ग अडवुन रास्ता रोको करन्याचा प्रयत्न करन्यात आला.शेतकरी आज मरनाच्या दारात असताना सरकार ने किमान पन्नास हजार रुपए हेक्टरी मदत करन्याचे सोडुन केवळ साडेआठ हजार रुपए व दोन हेक्टरची मर्यादा लावने म्हणजे शेतकर्यांची सरकार कडुन थट्टा करन्यात आली आहे अशा प्रतिक्रिया पाटील यांनी व्यक्त केल्या.तसेच आजपर्यंत रखडलेले विमे व येलो मोझॅकमुळे रिजेक्ट केलेले शेतकरी याविषयी यापुर्वी पालकमंत्र्यांसहीत जिल्हाप्रशासना मार्फत मुख्यमंत्री कार्यालयाला पाठवलेल्या विमा पावत्यांबद्दल जाब विचारन्यात आला.यावेळी तालुकाभरातील हजारो शेतकरी जमल्यामुळे काहीकाळ वाहतुक बंद झाली होती.

# न्याय द्या अन्यथा जलसमाधी घेणार १९८ शेतकऱ्यांचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
**बुलडाणा, दि. ३० :** बुलढाणा जिल्ह्यातील शेतकरी गेल्या काही महिन्यांपासून संकटाच्या फेऱ्यात सापडला आहे. नोव्हेंबर २०२३ आणि २६ फेब्रुवारी २०२४ या काळात सिंदखेड राजा व देऊळगाव राजा तालुक्यांत झालेल्या गारपीट आणि अवकाळी पावसामुळे शेकडो शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. या नुकसानीसाठी मदत देण्यासंबंधी शासनाच्या आदेशात गावांचा समावेशही जाहीर झाला, मात्र आजपर्यंत एकाही शेतकऱ्याच्या हाती एक रुपयाचीही मदत पोहोचलेली नाही. यामुळे येथील १९८ शेतकऱ्यांनी जलसमाधी घेणार असल्याचा इशारा दिला आहे. शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने एकूण १९८ शेतकरी ९ ऑक्टोबर रोजी सामूहिक जलसमाधी घेतील, असा इशारा देण्यात आला आहे. या १९८ शेतकऱ्यांनी वैयक्तिकरित्या सिंदखेड राजा उपविभागीय अधिकाऱ्यांना आज लेखी निवेदन दिले आहे. त्यामुळे प्रशासन व शासनासमोर शेतकऱ्यांच्या





मदतीचा आणि त्यांच्या आंदोलनाचा मोठा प्रश्न उभा राहिला आहे.

दरम्यान, शासकीय मदत रखडल्याने येथील शेतकरी अत्यंत आक्रमक झाले आहेत. शिवाय, गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टी, ढगफुटी आणि मुसळधार पावसामुळे खरीप पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. एका बाजूला गारपिटीची मदत

नाही आणि दुसरीकडे सततच्या पावसामुळे पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी पूर्णपणे कर्जबाजारी झाला आहे. शासकीय मदत मिळत नसल्यामुळे शेतकरी आता आत्महत्येच्या उंबरठ्यावर असल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात अनेक भागांमध्ये पूरपरिस्थितीचा सामना करावा लागत आहे. शेतकरी हवालदिल तर झाला आहेच, पण त्याच सोबत अनेकांचे घरात पाणी शिरल्याने संसार उघड्यावर पडले आहेत. मालमत्तेचे नुकसान झाले असून प्राण्यांची देखील मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली आहे. त्यात आणखी काही ठिकाणी तीव्र पावसाची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

---

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com — दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९७५

क.स.म.अ./तह.नाग/(शहर)/कवि-१४७/२०२५ — दिनांक : २५/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/काबि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. अलीम उल्हा खान बरकत उल्हा खान, रा. प्लॉट नं. ५९, गोरले लेआउट, अवस्थी नगर, नागपूर यांचा अर्ज दिनांक १८/०८/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार अलीम उल्हा खान बरकत उल्हा खान, रा. प्लॉट नं. ५९, गोरले लेआउट, अवस्थी नगर, नागपूर यांनी त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अलीम उल्हा खान बरकत खान यांचा जन्म दिनांक ०१/०८/१९६० रोजी बेड लाईन, क्वार्टर नं. ५, पोलीस लाईन टाकळी, काटोल रोड, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता**

---

**कोर्ट विद्यमान कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, भिवापूर यांचे कार्यालय**
(भिवापूर रोड, भिवापूर जिल्हा नागपूर पिन कोड - ४४१२०१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsilbhiwapur@gmail.com — दूरध्वनी क्र. ०७१०६-२३२२४१

क.प्रस्तु-१/तह.भि./ज.मृ. नोंद/कावि १८१/२०२५ — दिनांक : २६/०९/२०२५

वाचा: १. जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम - १९६९ चे कलम १३. २) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र. ३) जन्म-मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३, २०२३ चा २० च्या खंड १ आणि उपखंड. ४) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक ज.मृ.नों. २५२५/ (ई-ऑ. ९९११८१)/प्र.क्र. २२/कु.क. दिनांक १२ मार्च, २०२५. ५) मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक आयग/डी-१/जन्म-मृत्यु आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५ अन्वये. ६) अर्जदार श्री. नंदकिशोर रामहरी माहुरे, राह. तास तह. भिवापूर, जि. नागपूर

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार श्री. नंदकिशोर रामहरी माहुरे राह. तास तह. तह. भिवापूर,जि. नागपूर यांनी त्यांचे स्वतः चे जन्माची नोंद ग्राम पंचायत, तास येथे दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केली आहे.

सदरहू अर्जदार यांचा जन्म दिनांक १७/०६/१९८९ रोजी मौजा तास, तह. भिवापूर, जि. नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना जन्म प्रमाणपत्र शासकिय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी अधिकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार भिवापूर, उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नूसार ३,४ व ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तिच्या जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार भिवापूर, यांचे न्यायालयात स्वतः जातीने/ वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

(बी.डी. टेळे)
**कार्यकारी दंडाधिकारी, तथा तहसिलदार, भिवापूर**

---

## जाहीरनामा (सायटेशन नोटीस)

**कोर्ट विद्यमान श्री. सुरज जे. लाड साहब, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, भिवापूर**
एम.जे.सी. क्र. २६/२०२५

पेशी दिनांक : ११-११-२०२५ — प्रोसेस क्र. ७५४/२०२५, दि. २९/०९/२०२५

अर्जदार : १. श्रीमती देवका वि. वामन ठोंबरे - आई, वय-७२ वर्षे, धंदा - रोजमुरी, २) श्री. हरिदास वामन ठोंबरे - भाऊ, वय-३३ वर्षे, धंदा - रोजमजुरी, दोघेही रा. मोखेबर्डी, तह. भिवापूर, जि. नागपूर ह.मु. धर्मापूर चक्रधर मंदिराजवळ, भिवापूर, तह. भिवापूर, जि. नागपूर.

विरुद्ध

गैरअर्जदार : कोणीही नाही.

मयतदार : मयत-शुभम वामन ठोंबरे, रा. मोखेबर्डी, ता. भिवापूर, जि. नागपूर.

ज्यापेक्षा मयत - शुभम वामन ठोंबरे, रा. मोखेबर्डी, ता. भिवापूर, जि. नागपूर हे दिनांक १७/०८/२०२० रोजी मौजा, भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर येथे मयत झाले आणि वरील अर्जदार यांनी ह्या कोर्टास सदरहू मयत-शुभम वामन ठोंबरे, यांचे वारसान प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) मिळण्याकरिता मुंबई नियमन, १८२७ चे कम २ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा अर्जदार सदरहू मयताने वारसान नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याने प्रसिद्धीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत किंवा पे तारखेवर त्याने त्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास तयांनी सदरहू मयत-शुभम वामन ठोंबरे, यांचे वारसान (Legal Heirship Certificate) प्रमाणपत्र येईल.

आदेशानुसार
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, भिवापूर

---

## जाहीरनामा (सायटेशन नोटीस)

**कोर्ट विद्यमान श्री. सुरज जे. लाड साहब, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, भिवापूर**
एम.जे.सी. क्र. २४/२०२५

पेशी दिनांक : २७-१०-२०२५ — प्रोसेस क्र. ७५३/२०२५, दि. २९/०९/२०२५

अर्जदार : १. अहमदखां गुलमिरखां उर्फ गुलबिरखां पठाण-भाऊ, वय-८३ वर्षे, धंदा - पेन्शनर, रा. वार्ड नं. ३, मानीपुरा, भिवापूर, तह. भिवापूर, जि. नागपूर

विरुद्ध

गैरअर्जदार : कोणीही नाही.

मयतदार : मयत-इसलांबी गुलमिरखां उर्फ गुलबिरखां पठाण, रा. भिवापूर ता. भिवापूर, जि. नागपूर

ज्यापेक्षा मयत - इसलांबी गुलमिरखां उर्फ गुलबिरखां पठाण, रा. भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर हे दिनांक २१/०७/२०२२ रोजी मौजा नागपूर, ता. नागपूर, जि. नागपूर येथे मयत झाले आणि वरील अर्जदार यांनी ह्या कोर्टास सदरहू मयत-सलांबी गुलमिरखां उर्फ गुलबिरखां पठाण यांचे वारसान प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) मिळण्याकरिता मुंबई नियमन, १८२७ चे कम २ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा अर्जदार सदरहू मयताने वारसान नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याने प्रसिद्धीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत किंवा पे तारखेवर त्याने त्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास तयांनी सदरहू मयत-सलांबी गुलमिरखां उर्फ गुलबिरखां पठाण यांचे वारसान (Legal Heirship Certificate) प्रमाणपत्र येईल.

आज दिनांक २९/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, भिवापूर

---

**अरविंद कारेमोरे, ॲडव्होकेट**
बार-असोसिएशन, रामटेक, तह. रामटेक, जि. नागपूर
निवास/ऑफीस : मुरमुरा फॅक्टरी ते किट्स कॉलेज रोड, सह्याद्री रेस्टॉरेंटच्या समोर, प्लॉट नं. २५, बालाजी नगर-१, रामटेक, तह. रामटेक, जि. नागपूर मो. ९४२२८२२७०७

## जाहीर सूचना

आम जनतेस सूचित करण्यात येते की, माझी पक्षकार सौ. निर्मला देवचंद धमगाये, रा. आंबेडकर वार्ड, रामटेक, तह. रामटेक, जि. नागपूर यानी श्री पंढरी उरकुडा कोचे, रा. यशोदीप कॉलोनी, महेंद्र नगर, नागपूर, तह. व जि. नागपूर यांच्या मालकीची व कब्जात असलेली तसेच सर्व सरकारी निमसरकारी रेकॉर्डवर दर्ज असलेली मौजा रामटेक, मौजा नं. ३०८, प.ह.नं. ३८, तह. रामटेक, जि. नागपूर येथील नगर परिषद हद्दीतील शिट नं. ११, सिटी सर्व्हे क्र. २३४१, एकूण क्षेत्रफळ ११७.७० चौ.मी. (१२६६.४५ चौ. फूट) यापैकी पूर्व पश्चिम विभागणी दक्षिणेकडील भागाचे एकूण क्षेत्रफळ ५८.५ चौ.मी. ही जागा व त्यावरील घर ज्याव जूना मालमत्ता क्रमांक ९९ व नवीन ११७ आहे, ही मालमत्ता खरेदी करण्याचा करारनामा केलेला आहे. ही मालमत्ता कोणत्याही लेखान्वये दुसऱ्या कोणत्याही करारनामा केलेला आहे. ही मालमत्ता कोणत्याही लेखान्वये दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीस मधल्या काळात लिहून दिलेली असल्यास अथवा कोणाचाही मालकी हक्क, अधिकार, ताबा, बोझा, उजर, कर्ज, तसेच कोठेही गहाण, मृत्युपत्र, कब्जापत्र, करारनामा विक्रीपत्र, बक्षिस पत्र, दानपत्र, मुखत्यारपत्र अथवा कोणत्याही न्यायालयात न्यायप्रविष्ट वगैरे असल्यास ही सूचना प्रकाशित झालेल्या तारखेपासून ७ दिवसाचे आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह समक्ष भेटावे. मुदतीनंतर माझे पक्षकार या मालमत्तेचे विक्रीपत्राची नोंद करण्यास स्वतंत्र राहतील व नंतर कोणाचाही उजर दावा ऐकल्या जाणार नाही याची आम जनतेने काळजीपूर्वक नोंद घ्यावी. ही विनंती.

दिनांक ३०/०९/२०२५

(ए.जी. कारेमोरे)
ॲडव्होकेट

---

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com — दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९७५

क.स.म.अ./तह.नाग/(शहर)/कवि-१४४/२०२५ — दिनांक : २६/०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/काबि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. अंजुम सहर सैय्यद मुजफ्फर अली. रा. प्लॉट नं. १०३, अयप्पा नगर, नागपूर यांचा अर्ज दिनांक १९/०८/२०२५

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार अंजुम सहर सैय्यद मुजफ्फर अली, रा. प्लॉट नं. १०३, अयप्पा नगर, नागपूर यांनी त्यांच्या स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अंजुम सहर सैय्यद मुजफ्फर अली यांचा जन्म दिनांक २२/०५/१९५७ रोजी मोमीनपुरा, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता**

---

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com — दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९७५

प्र.क्र. १२५/प्रस्तु-३/तह.नाग (शहर)/कवि- /२०२५ — दिनांक : /०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/काबि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. सुमैय्या कौसर d/o खालीद अहमद, महात्मा फुले बाजार पास, नागपूर मो. ९५९५०५१९२१ नागपूर

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार सुमैय्या कौसर d/o खालीद अहमद, महात्मा फुले बाजार पास, नागपूर मो. ९५९५०५५९२१ नागपूर यांनी नातू यांच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू सुमैय्या कौसर d/o खालीद अहमद यांचा जन्म दिनांक ०१/०३/१९८५ येथे घरी झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता**

---

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com — दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९७५

प्र.क्र. १२६/प्रस्तु-३/तह.नाग (शहर)/कवि- /२०२५ — दिनांक : /०९/२०२५

वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/काबि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. अर्जदार रफीया कौसर d/o खालीद अहमद, प्लॉट नं. ९५, बंदे नवाज नगर, नागपूर मो. ९५९५०५५९२

**-: जाहीरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार रफीया कौसर d/o खालीद अहमद, प्लॉट नं. ९५, बंदे नवाज नगर, नागपूर मो. ९५९५०५५९२ नागपूर यांनी नातू यांच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू रफीया कौसर d/o खालीद अहमद यांचा जन्म दिनांक २३/१२/१९८५६ नागपूर येथे घरी झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता**

---

## जाहिरनामा

महसूल व वनविभाग
कोर्ट विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय
(आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
Email ID : tahsildarngpcity@gmail.com
दूरध्वनी क्र. ०७१२-२५६१९७५

प्र.क्र. १११/प्रस्तु-३/तह. नाग (शहर)/कावि/११३/२०२५ — दिनांक : २२/०९/२०२५

वाचा :- १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च. २०२५ नुसार २. मा.उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.०३/ई-१अ.दि.१७/३/२०२५.३.मा. जिल्हा-धिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/ जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५ ४. अर्जदार यासमीन बेगम मोहम्मद आयाज रा. प्लॉट नं. १६१, किल्ला रोड महाल नागपूर - ४४०००२

ज्याअर्थी अर्जदार यासमीन बेगम मोहम्मद आयाज रा. प्लॉट नं. १६१, किल्ला रोड महाल नागपूर-४४०००२ यांनी स्वतःच्या जन्म तारखेची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांचे स्वतःचा जन्म दिनांक ०७/०८/१९८४ रोजी नागपूर येथे घरी झालेला आहे. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्मचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मा बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करिता

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




# व्यसनं टाळून कर्करोगाला आळा

कर्करोग किवा कॅन्सर हा भयावह आजार. तो झाल्याचं निदान झालं की भल्याभल्यांच्या अंगातलं त्राण जातं. मात्र तो दूर ठेवणं आपल्याच हातात असतं. अलीकडे महिलांमध्येही धूम्रपानाची आणि मद्यपानाची क्रेझ निर्माण झाली आहे. महिलांनी पार्टीत दारू पिणं ही आता आश्चर्याची बाब उरलेली नाही. मात्र आरोग्याच्या दृष्टीनं हे धोकादायक ठरू शकतं. विशेषतः धूम्रपानामुळे कर्करोगाला आमंत्रण मिळतं. २५ ते ४० वयोगटातील लोकांमध्ये निव्वळ धूम्रपान आणि तंबाखू खाण्याच्या सवयीमुळे कर्करोग होण्याच्या प्रमाणात गेल्या पाच वर्षांमध्ये दुपटीनं वाढ झाल्याचं समोर आलं आहे. महिलांच्या कर्करोगाच्या प्रमाणातही मोठी वाढ झाली बाब आहे. पिअर प्रेशर कवा मोठं झाल्याची खूण म्हणून अगर व्यसन सोडवता येत नसल्यामुळे मुलं या व्यसनाच्या आहारी जाण्याच्या प्रमाणातही मोठी वाढ झाली आहे. तोंडातून रक्त येणं, मलावरोध, आवाजात बदल होणं, तोंडातून दुर्गंधी येणं आणि १५ दिवसांपेक्षा अधिक काळ ताप येणं कवा खोकला येणं ही कर्करोगाची लक्षणं आहेत. अशा वेळी तातडीनं डॉक्टरांकडे गेलं पाहिजे. सुरुवातीच्या टप्प्यातील कर्करोग बरा होऊ शकतो; परंतु नंतरच्या टप्प्यातील कर्करोग बरा होण्याची शक्यता पुसट होत जाते. सध्या तरी केमोथेरपी हाच यावरील प्रभावी उपचार आहे. मात्र त्याचे दुष्परिणाम असतातच. परंतु तरीही खंबीर मानसिकतेच्या सहाय्यानं यातून बाहेर पडलेल्या लोकांची उदाहणंही आहेत. त्यामुळे मुळातच मद्यपान, धूम्रपान करू नये आणि अतिचता व तणाव टाळावेत असा सल्ला दिला जातो. धूम्रपान टाळलं तर कर्करोग होण्याची शक्यता आठपटीनं कमी होतं असं संशोधनही नुकतंच समोर आलं आहे. थोडीशी शंका आली तरी लगेच डॉक्टरांकडे जाणं आणि खचून न जाता परिस्थितीला सामोरं जाणं या गोष्टी केल्या तर कर्करोगही बरा होऊ शकतो.

**व्याधी विचार**



**सामना नकारात्मकतेचा**

काही माणसं समोर आली की आपल्याला चटकन त्यांना टाळण्याच्या युक्त्यांचा विचार करावंसं वाटतं. त्यामुळे जगात काहीच चांगलं नाही, जग विश्वासघातकी–वाईट लोकांनीच भरलेलं आहे अशी भावना मनात निर्माण होऊ लागते. परंतु नकारात्मकता हा एक मानसिक आजार आहे. प्रत्येकाविषयी, प्रत्येक घटनेविषयी भीती, अविश्वास कवा शंका यांमधून तो उद्भवतो. त्याची मुळं सहसा आलेल्या काही वाईट अनुभवांचा प्रभाव मनावरून पूर्णपणे पुसून टाकून मन पुन्हा प्रसन्न करण्यात आलेल्या अपयशात दडलेली असतात. आत्मविश्वासाचा अभाव असल्यामुळे इतरांनी आपल्यावर मारलेले शेरेच खरे धरल्यामुळे इतर लोकांविषयी मनात राग निर्माण झालेला असतो. परिणामी, प्रत्येक व्यक्तीचं वागणं, बोलणं या मानसिक रुग्णाला आपल्या विरोधात असल्यासारखं वाटतं. आपल्या बाबतीत काहीच चांगलं घडणार नाही असं वाटू लागतं. कधी तरी लागोपाठ आलेल्या अपयशाच्या अनुभवातून यापैकी काही लोक पूर्णपणे सावरू शकलेले नसतात. यासाठी अर्थातच समुपदेशन आणि मित्र आणि जवळच्या मंडळींनी त्यांचे गैरसमज दूर करण्यासाठी संवाद साधणं हे उपचार आहेत. पेला अर्धा भरलेला की अर्धा रिकामा हे नेहमीचं उदाहरण या व्यक्तीबाबत नेहमीच दिलं जातं. अशा रुग्णांचं मन शांत करण्यासाठी काही औषधं दिली जातात. मनातील विचार काढून आत्मविश्वास बळावला जावा यासाठी मानसोपचार केले जातात. ध्यानधारणा, योग, शांत, प्रसन्न वातावरणात राहणं, फिरणं, जिथे आपल्यावर टीका केली जाणार नाही अशा लोकांच्या सानिध्यात अधिक काळ राहणं हे यासंदर्भात उपाय ठरू शकतात. अपयशावर मात करण्यासाठी पुन्हा पुन्हा प्रयत्न करण्यास प्रवृत्त व्हावं यासाठी त्यांना सतत प्रेरणा देत राहण्याचाही उपचारांमध्ये समावेश होतो. एखादं किरकोळ यशही त्यांना पुन्हा आत्मविश्वास प्राप्त करून देण्यास पुरेसं ठरतं.

# दीर्घकाळ घसा खवखवतोय?


**डॉ. कुंदन गायकवाड**

थंड पाणी प्यायल्यास घसा खवखवतो. काही आंबट पदार्थ जास्त प्रमाणात खाल्ले, तरी घसा खवखवतो. दररोज मोठ्याने बोलण्यामुळेही घसा खवखवतो. घसा खवखवणे हे सहसा सर्दी, ॲलर्जी किंवा हवामानातील बदलांमुळे होते. सतत वेदना आणि घसा खवखवण्यामागे गंभीर आजाराची लक्षणे असू शकतात.

दीर्घकाळ घसा खवखवणे हे सहसा टॉन्सिलिटिसमुळे होते. यामध्ये घशाचा मागचा भाग सुजतो. त्यामुळे संसर्ग होतो. यामुळे घशात वेदना, गिळण्यास त्रास, घसा खवखवणे आणि कधी कधी ताप येऊ शकतो. ही समस्या मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये अधिक दिसून येते. घशातील खवखव घरगुती उपायांनी बरी होते; परंतु जर तो एका आठवड्यापेक्षा जास्त काळ टिकला, ताप आला किंवा लिम्फ नोड्स फुगले तर उपचारांना उशीर करू नका.

**कर्करोग असण्याची शक्यता**

बहुतेक प्रकरणांमध्ये घशातील खवखव (घशाचा दाह) दहा दिवसांमध्ये बरी होते; परंतु कधी कधी ती अनेक आठवडे टिकू शकते. घशातील खवखव महिनोनमहिने टिकत राहिली, आणि आवाजात कर्कशपणा, गिळण्यास त्रास होणे, वजन कमी होणे किंवा घशात गाठ वाटणे यासारखी इतर लक्षणे दिसली तर ते घशाच्या किंवा स्वरयंत्राच्या कर्करोगाचे प्रारंभिक लक्षण असू शकते. अशा परिस्थितीत, ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घेणे खूप महत्त्वाचे आहे.



**दीर्घकाळापर्यंत घशात खवखवण्याची कारणे**

घसा इतका काळ टिकण्याची अनेक कारणे असू शकतात. ते तुमच्या आसपासच्या वातावरणातील गोष्टींमुळे असू शकते, जसे की धूर किंवा तीव्र रसायने. किंवा ते अधिक गंभीर आरोग्य समस्येचे लक्षण असू शकते.



**क्रॉनिक ॲलर्जी** – परागकण, बुरशी आणि पाळीव प्राण्यांचा कोंडा यासारख्या गोष्टींमुळे होणारी ॲलर्जी.

**टॉन्सिलिटिस – अशी स्थिती ज्यामध्ये तुमचे टॉन्सिल संक्रमित होतात आणि सुजतात.**

धूम्रपान करणे किंवा दुसऱ्या व्यक्तीच्या धुराच्या संपर्कात येणे. धूर आणि रसायनांसारख्या विषारी पदार्थांच्या संपर्कात आल्यानेही दीर्घकाळ घसा खवखवू शकतो.

**(क्रॉनिक ॲसिड रिफ्लक्स)**– पोटातील आम्ल अन्ननलिकेत जाते आणि त्रास होतो. यामुळे घसा खवखवतो.

**लॅरिन्गो फॅरेंजियल रिफ्लक्स**– या प्रकारात पोटातील आम्ल घशात जाते आणि त्रास होतो

**लक्षणे आणि कारणे**

* गिळण्यास त्रास
* घसा अडकणे
* घशामध्ये वेदना किंवा खाज सुटणे
* मानेतील सुजलेल्या ग्रंथी
* कमकुवत किंवा थकलेला आवाज

**निदान कसे करावे ?**

* **जलद अँटीजेन शोध चाचणी:** ही चाचणी 'स्ट्रेप थ्रोट' सारख्या बॅक्टेरियाच्या संसर्गाची तपासणी करते.
* **घसा कल्चर:** तुम्हाला कोणता संसर्ग आहे का आणि तो कोणत्या प्रकारचा आहे हे शोधण्यासाठी (जसे की विषाणू, बॅक्टेरिया किंवा बुरशीजन्य).

# हाता–बोटात सुन्नपणा?

**डॉ. योगेश पोटे**

हस्तांदोलन करताना हातात पुरेशी ताकद जाणवत नाही? बोटांमध्ये सतत सुन्नपणा जाणवतोय? हातातील वस्तू गळून पडतात? ही केवळ थकवा आल्याचे किंवा वय वाढल्याचे लक्षणे नाहीत, तर हे पाठीच्या कण्यामधील मज्जारज्जूवर (स्पायनल कॉर्ड) विविध कारणांमुळे येणाऱ्या दाबाचे (स्पायनल कॉर्ड कॉम्प्रेशन/मायलॉपथी) सुरुवातीचे लक्षण असू शकते. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास अडखळत चालणे, अंग सुन्न होणे अशा पुढील टप्प्यातील आजारांनादेखील निमंत्रण मिळू शकते.

'स्पायनल कॉर्ड कॉम्प्रेशन' म्हणजे मणक्याच्या आतून जाणाऱ्या मज्जारज्जूवर हाडे, चकती, गाठ किंवा इजा यामुळे येणारा दाब. हा दाब वाढला, की मज्जासंस्थेवर परिणाम होऊन हात–पाय अशक्त होणे, हालचाली मंदावणे आणि समन्वय कमी होणे अशी लक्षणे दिसू लागतात. तरुणपणी ही लक्षणे न जाणवता वय वाढताना जाणवतात. त्यामुळे रुग्णाला हा वाढत्या वयाचा परिणाम असल्याचा गैरसमज होतो व त्याकडे दुर्लक्ष होते; परंतु सुरुवातीच्या टप्प्यात याचे निदान झाल्यास ही स्थिती औषधोपचार, फिजिओथेरपी किंवा शस्त्रक्रियेद्वारे दूर करता येते.



**लक्षणे कोणती ?**

* हस्तांदोलन करताना हातात ताकद न वाटणे
* बोटं, तळहात सुन्न होणं किंवा मुंग्या येणे
* वारंवार वस्तू हातातून गळून पडणे
* चालण्यात किंवा पाय हलवताना अडचण

**संतुलन बिघडणे किंवा अंग जड होणे**

**काय कराल?**

हातांमध्ये अचानक अशक्तपणा येणे किंवा सतत सुन्नपणा जाणवणे, याकडे दुर्लक्षित करू नका. अशा वेळी 'एमआरआय'सारख्या तपासण्या करून मूळ कारण शोधणे आणि त्यावर त्वरित उपचार करणे अत्यावश्यक आहे. वेळीच योग्य उपचार केल्यास मज्जारज्जूवरील दाब कमी करता येतो आणि पुढील गुंतागुंत टाळता येते.

# उशिरा झोपल्याचा वाईट परिणाम

**आरोग्य वार्ता**

**डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

सोशल मीडिया, ऑफिसचे काम आणि अभ्यासाच्या जबाबदाऱ्यांमुळे झोपेचा वेळ सतत कमी होत चालला आहे. रात्री उशिरापर्यंत जागे राहणे आरोग्यासाठी खूप हानिकारक असू शकते. असे केल्याने थकवा तर वाढतोच; पण शरीरावर आणि मानसिक आरोग्यावरही गंभीर परिणाम होतो. रात्री पुरेशी झोप न घेतल्याने शरीर कमकुवत होते. यामुळे शरीर संसर्ग आणि विषाणूजन्य आजारांना बळी पडण्याची शक्यता वाढते. झोपेचा अभाव चयापचय मंदावतो आणि लठ्ठपणा वाढवणाऱ्या हार्मोन्सचे असंतुलन करतो. रात्री उशिरापर्यंत सतत जागे राहिल्याने हृदयरोगाचा धोका वाढतो. मोबाइल, लॅपटॉप किंवा टीव्हीच्या स्क्रीनवरून निघणारा निळा प्रकाश मेलाटोनिन हार्मोनवर परिणाम करतो. रात्री उशिरा जड आणि तेलकट अन्न खाल्ल्यानेदेखील निद्रानाश होतो.



**चांगली झोप येण्यासाठी काय करावे ?**

* **झोपेचे वेळापत्रक राखा:** दररोज एकाच वेळी झोपण्याची आणि उठण्याची सवय लावा.
* **झोपण्यापूर्वी स्क्रीन**–मुक्त वेळ ठेवा. झोपण्यापूर्वी किमान एक तास आधी मोबाईल आणि लॅपटॉपपासून दूर राहा.
* **विश्रांती तंत्रे:** ध्यान आणि हलका व्यायाम करून झोप सुधारा.
* **रात्री कॅफिन आणि जड जेवण टाळा:** रात्री कॉफी किंवा जड अन्न घेऊ नका. रात्री उशिरापर्यंत जागे राहत असाल, तर ती सवय बनवू नका. योग्य वेळी झोपणे केवळ थकवा दूर करण्यासाठीच नाही तर संपूर्ण शरीरासाठीदेखील महत्त्वाचे आहे. म्हणून तुमच्या झोपेच्या वेळेत सुधारणा करा आणि निरोगी जीवनशैली स्वीकारून शरीर आणि मन तंदुरुस्त ठेवा.

# स्मरणशक्तीवर प्रदूषणाचा परिणाम

**नवसंशोधन**

**डॉ. मेघा दळे**

देशातच नव्हे, तर जगभरात वायू प्रदूषण सतत वाढत आहे. अनेक ठिकाणी ते अत्यंत धोकादायक स्थितीत पोहोचले आहे. त्यामुळे जवळजवळ प्रत्येक वयोगटातील लोकांना त्रास होत आहे. प्रदूषणाचा मनावरही परिणाम होत आहे. प्रदूषणामुळे शरीरातील स्मृतिभ्रंशाचा धोका वाढत आहे. या आजारात लोकांची स्मरणशक्ती कमकुवत होते. मेंदूच्या आरोग्यासाठी स्वच्छ हवा महत्त्वाची आहे, त्यामुळे हा आजार टाळता येतो.



एका संशोधनात दिसून आले आहे की वायू प्रदूषण, विशेषतः एम २.५ कण, लेवी बॉडी डिमेंशिया होण्याचा धोका वाढवू शकतात. हे प्रदूषण मेंदूमध्ये प्रथिनांचे संचय वाढवते. त्यामुळे मज्जातंतू पेशींना नुकसान होते. यामुळे लोक जुन्या आठवणी विसरायला लागतात. संशोधनातून दिसून आले आहे, की प्रदूषणाचे एम २.५ कण खूप लहान असतात. हे सूक्ष्म कण इतके लहान असतात, की शरीराच्या संरक्षण प्रणाली ओलांडून रक्तप्रवाहात प्रवेश करू शकतात आणि मेंदूपर्यंत पोहोचू शकतात. प्रदूषण केवळ नाकापुरते मर्यादित नाही तर न्यूरॉन्सपर्यंतदेखील पोहोचू शकते. हे कण मेंदूमध्ये पसरताना मज्जातंतू पेशी नष्ट करतात. हवेत असलेल्या कणांच्या संपर्कात आल्याने मेंदूमध्ये असलेली प्रथिने गुठळ्यांमध्ये बदलतात. ती नैराश्याची लक्षणे आहेत. हा अल्झायमरनंतर डिमेंशियाचा दुसरा सर्वात सामान्य प्रकार आहे. हा आजार शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांना जास्त प्रभावित करतो. शहरांत वाहनांमधून निघणारा धूर आणि विषारी कण त्यांचे अधिक नुकसान करतात.

**मेंदूवर कसा परिणाम?**

लेव्ही बॉडीज म्हणजे मेंदूमध्ये जमा होणारे असामान्य प्रथिनांचे समूह. ते अल्फा–सिन्युक्लिन नावाच्या प्रथिनापासून बनलेले असतात. हे प्रथिन मेंदूच्या निरोगी कार्यासाठी आवश्यक आहे; परंतु ते अनेक प्रकारे चुकीच्या पद्धतीने दुमडून विविध हानिकारक लेव्ही बॉडीज तयार करू शकते. हे तंत्रिका पेशी नष्ट करू शकतात आणि मेंदूमध्ये पसरून विनाशकारी रोगांना कारणीभूत ठरू शकतात. शास्त्रज्ञांच्या मतानुसार वायू प्रदूषणाचा सामना केल्याने आरोग्य, सामाजिक, हवामान आणि आर्थिक दृष्टिकोनातून दीर्घकालीन फायदे मिळू शकतात. हवा सुधारल्यानंतरच परिस्थिती सुधारेल. यासाठी सर्वांना काम करावे लागेल.

# रक्तातील साखरेवर नियंत्रण कसे ठेवाल?

**आरोग्यवेध**

**डॉ. दिलीप शिरसाट**

अनेक दीर्घकालीन आजरांपैकी सर्वात सामान्य आजार म्हणजे मधुमेह. रक्तातील साखर वाढायला लागली, की ती नियंत्रणात ठेवणे खूप गरजेचे असते. योग्य ते औषधोपचार नियमितपणे घेतले, तरी तेवढेच पुरेसे नसते. दैनंदिन जीवनात शिस्त असणे, सकस आहार घेणे, साखरविरहित आहार घेणे आणि रोज थोडा तरी व्यायाम करणे गरजेचे आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे अधूनमधून रक्तातील साखरेचे प्रमाण तपासणे. यामुळे रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवता येते.



साखर खूपच वाढली, म्हणेजच ३७० किंवा त्याहून जास्त असणे आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक असते. अशा वेळी होणारा त्रास दुर्लक्षित करू नये. रक्तातील साखर एवढी वाढली, तर शरीरात केटोन नावाचा विषारी घटक तयार होऊ शकतो. त्यामुळे अचानक चक्कर येणे, उलट्या होणे, अस्वस्थ वाटणे, श्वास घेण्यास त्रास होणे आदी प्रकारचा त्रास होतो. परिणामी मधुमेह असणाऱ्यांनी शरीरातील साखर वाढवणाऱ्या बाबींची विशेष काळजी घेतली पाहिजे.

रक्तातील साखरेचे प्रमाण २५० पेक्षा जास्त असेल, तर ते चिंतेचे लक्षण आहे. साखरेची पातळी ३०० च्या पुढे गेल्यास तब्येतीवर मोठा धोका निर्माण होऊ शकतो. अशा वेळी स्ट्रोक (मेंदूत रक्तपुरवठा अचानक बंद होणे) किंवा डायबेटिक केटोअसिडोसिस नावाची गंभीर अवस्था निर्माण होऊ शकते.

**जादा साखरेचे शरिरावर होणारे परिणाम**

* डोळे: दृष्टिदोष किंवा अंधत्व
* मूत्रपिंड: काम करण्याची क्षमता हळूहळू कमी होते
* हृदय: लवकर अटॅक येण्याची शक्यता
* रक्तवाहिन्या: संपूर्ण शरीरात नुकसान

साखर वाढण्याची कारणे

* जास्त तणाव
* औषधं वेळेवर न घेणं
* शरीरात इन्फेक्शन
* चुकीचं खाणं
* जीवनशैलीतील असंतुलन

काय कराल?

* भरपूर पाणी प्या. त्यामुळे साखर बाहेर टाकायला मदत होते
* केटोन टेस्ट करा
* केटोन सापडल्यास तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधा
* इन्सुलिन घेत असाल, तर डॉक्टरांनी दिलेली आपत्कालीन योजना पाळा
* साखर असलेले पेय टाळा, पण शरीरात पाणी कमी होऊ देऊ नका

**या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका...**

* रक्तात ३७० / पेक्षा जास्त साखर असूनही कमी न होणं
* फार तहान लागणं
* वारंवार लघवी होणं
* दृष्टिदोष

**डोळ्यांचं आरोग्य**

## लक्षणं मोतीबदूची



मोतीबदू हा सर्रास आढळणारा नेत्रविकार आहे. मोतीबदूची काही लक्षणं पहायला मिळतात. सकाळी उठून खिडकीबाहेर बघितल्यावर धुरकट दिसत असेल तर तुम्हाला मोतीबदू आहे, असं समजायला हरकत नाही. मोतीबदू झाल्यानंतर तुम्हाला अंधुक, धुरकट दिसू लागतं. यामुळे वाचताना, गाडी चालवताना, चेहऱ्यावरचे भाव वाचताना अडचणी निर्माण होतात. त्यातही रात्रीच्या वेळी हा त्रास अधिक वाढतो. त्यामुळे अंधुक दिसत असेल तर तातडीने डोळ्यांची तपासणी करून घ्या.

**जपणूक त्वचेची**

## रात्री धुवा चेहरा



त्वचेची नियमित काळजी घेतल्यामुळे त्वचाविकारांना आळा घालता येतो. दररोज रात्री झोपण्याआधी चेहरा स्वच्छ धुणं गरजेचं आहे. दिवसभराच्या धामधुमीत चेहऱ्यावर बरीच धूळ, घाण बसते. प्रदूषित कणांमुळे त्वचेची बरीच हानी होते. म्हणूनच ही सगळी अस्वच्छता दूर करण्यासाठी दररोज रात्री झोपण्याआधी चेहरा धुवायला हवा. धूळ, प्रदूषित कणांमुळे त्वचेची रोमछिद्रं बंद होतात. रात्री चेहरा धुतल्यानंतर ही रोमछिद्रं खुली होऊन त्वचा मोकळा श्वास घेऊ शकते. बंद झालेली रोमछिद्रं, चेहऱ्यावर साठलेली घाण यामुळे पपल्स होतात. हा त्रास कमी करण्यासाठी रात्री चेहरा धुवायला हवा.

**आजीबाईचा बटवा**

## लाभ मूगडाळीचे



डाळींचं महत्त्व आपण जाणतोच. त्यातही मूगडाळ खूप लाभदायी आहे. मूगडाळीच्या सेवनाने बरेच आजार दूर होतात. वजन कमी करण्यापासून उच्च रक्तदाब नियंत्रित ठेवण्यापर्यंत बऱ्याच बाबी मूगडाळीच्या सेवनाने साध्य होऊ शकतात. मूगडाळ हलकी असल्यामुळे पटकन पचते. यामुळे पोटाशी संबंधित तक्रारी दूर होतात. मूगडाळीत पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि फायबरसारखे पोषक घटक असतात. पोटॅशियममुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात राहू शकतो. यातल्या विरघळणाऱ्या फायबरमुळे पोटाच्या तक्रारी दूर होऊ शकतात. मूगडाळीमुळे चयापचय क्रिया सुधारते तसंच रोगप्रतिकारकशक्तीही वाढते. त्यामुळे मूगडाळीचं सेवन नियमितपणे करायला हवं.

# ओला दुष्काळ जाहीर करा

विजय वडेट्टीवार यांची मागणी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

राज्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून, सरकारने आज होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत तातडीने 'ओला दुष्काळ' जाहीर करून शेतकऱ्यांना भरीव मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

वडेट्टीवार यांनी राज्यपालांना पत्र लिहून अतिवृष्टी, पूर स्थिती, उद्धवस्त पिके, वाहून गेलेली जनावरे, कोसळलेली घरे आणि विस्कळीत वीजपुरवठा या गंभीर परिस्थितीत जनतेला तात्काळ दिलासा मिळावा यासाठी महाराष्ट्र विधानसभेचे विशेष अधिवेशन घेण्यात यावे यासाठी राज्यपालांना पत्र लिहित राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी, बाधित शेतकरी व नागरिकांना सरसकट मदत द्यावी अशी मागणी देखील केली आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, आजच मंत्रिमंडळ बैठकीत ओला दुष्काळ जाहीर करा. राज्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तब्बल २४ जिल्ह्यांतील १३७ तालुके बाधित झाले आहेत. केवळ सप्टेंबर महिन्यातील शेती पिकांचे नुकसान २६ लाख हेक्टरवर गेले आहे.अहिल्यानगर, बीड, जालना, सोलापूर, धाराशीव, छत्रपती संभाजीनगर, यवतमाळ हे जिल्हे सर्वाधिक बाधित असून, पुरामुळे राज्यातील ४१ हजार नागरिकांचे स्थलांतर करावे लागले आहे.

खरीप हंगामातील सुमारे ५२ लाख हेक्टरवरील पीक पाण्यात गेले असून, खरीप हंगाम तर हातातून निसटला आहेच; परंतु रब्बी हंगामही धोक्यात आला आहे. अनेक ठिकाणी शेतजमीन खरवडून गेल्याने शेतकरी रब्बी हंगामांपासून देखील वंचित राहणार आहे.

सरकारने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरघोस मदत द्यावी. लोकांची घरे कोसळली आहेत, जनावरे वाहून गेली आहेत. त्यामुळे बाधितांना तातडीने मदत मिळणे अत्यावश्यक आहे.

सरकारने दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना दिलासा देणारे ठोस निर्णय घ्यावेत. अतिवृष्टी ग्रस्त जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचा संसार उद्धवस्त झाला आहे. म्हणूनच त्यांना लवकर पुन्हा उभं करण्यासाठी दिवाळी पूर्वीच भरीव मदत केली पाहिजे.

# एसटी महामंडळाची १५ ऑक्टोबरपासून १०% भाडेवाढ

# सर्वसामान्यांचा दिवाळीचा प्रवास महागला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

राज्यातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या एसटीने ऐन सणावारांच्या दिवसांत तब्बल १० टक्के भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही भाडेवाढ १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत लागू असणार आहे. या निर्णयामुळे दिवाळीच्या निमित्ताने गावी जाणाऱ्या चाकरमान्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला मोठी झळ बसणार आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, राज्य परिवहन महामंडळाने दिवाळीच्या काळात १० टक्के भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. ही भाडेवाड सरसकट सर्वच बसेसना लागू असणार नाही. या निर्णयातून वातानुकूलित शिवनेरी व शिवाई बसेस वगळण्यात आल्या आहेत. त्यामुळे गावखेड्यापासून रातराणीने लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या सर्वच प्रवाशांना या भाडेवाढीचा फटका बसणार आहे.

## एसी शिवनेरी व शिवाई बस वगळल्या



राज्यात सध्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरीक मेटाकुटीस आला आहे. त्यातच एसटीने ही भाडेवाढ केल्यामुळे नाराजी व्यक्त केली जात आहे. ताज्या भाडेवाढीमुळे ज्या ठिकाणी पूर्वी १०० रुपये तिकीट होते, तिथे आता ११० रुपये आकारले जातील.

दिवाळीच्या काळात एसटी महामंडळाची अग्निपरीक्षा असते. कारण, या काळात राज्यभरातील चाकरमानी आपापल्या गावी जातात. सुट्ट्या असल्यामुळे बसस्थानकावर प्रवाशांची प्रचंड गर्दी असते. त्यामुळे सणावाराच्या दिवसांत प्रवाशांचा वाढणारा ओघ व त्यातून मिळणारा महसूल लक्षात घेता एसटीने दिवाळीच्या काळात १० टक्के भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

### चालू वर्षाच्या सुरुवातीला झाली होती दरवाढ

उल्लेखनीय बाब म्हणजे गतवर्षी टॅक्सी व रिक्षा चालक संघटनांकडून भाडेवाढीचा प्रस्ताव देण्यात आला होता. त्यानंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाकडून देण्यात आलेल्या भाडेवाढीच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे नव्या वर्षात एसटीचा प्रवास महागला होता. २४ जानेवारी २०२५ पासून एसटीची भाडेवाढ लागू करण्यात आली होती. त्यावेळी झालेल्या राज्य परिवहन प्राधिकरणाच्या (एसटीए) बैठकीत १४.९५ टक्के तिकीट दरवाढीला मान्यता दिली होती. तशी औपचारिक घोषणाही करण्यात आली होती.

# ..यांची दहा तोंडे दहा दिशेने!

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा खोचक टोला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

संघाची दहा तोंडे दहा दिशेनेच नाही तर सर्व प्रतिगामित्वामध्ये दडलेली आहेत त्याचा धिक्कार व दहन करावे, अशी आमची अपेक्षा आहे, असा खोचक सल्ला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे.



संघाला आमचे निवेदन सांगितलेले आहे. निसर्ग व नियती त्यांना सुबुद्धी देवो ही प्रार्थना करत आहे. दसऱ्याला रावणाचे दहन केले जात ते एका व्यक्तीचे नाही तर प्रवृत्तीचे दहन असते, असेही सपकाळ म्हणाले.

नागपूर येथील दीक्षाभूमीवरून सकाळी ६ वाजता राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धव सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली संविधान सत्यागग्रह पदयात्रेची सुरुवात झाली. यावर हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, संविधानाला अभिप्रेत असलेल्या भारतासाठी हातात हात घालून सर्वभारतीयांनी काम करावे आणि संविधानाचे सत्य सर्वदूर पसारावे हाच या पदयात्रेमागचा हेतू आहे.

तुषार गांधी म्हणाले, लोकशाही व संविधान व लोकांच्या सत्याग्रहाचा अधिकार यासाठी ही पदयात्रा आयोजित करण्यात आली असून हा जनतेचा आक्रोश आहे. या पदयात्रेत महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांचे नेते पदाधिकारी व सर्वसामान्य जनता यात सहभागी झालेली आहे.

# केंद्र प्रमुख पदांवर नियुक्तीसाठी ऑनलाईन परीक्षा डिसेंबरमध्ये

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

राज्यातील सर्व जिल्हा परिषद मधील कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा २०२५ चे ऑनलाईन पद्धतीने आयोजन करण्यात येणार आहे.

१ ते ५ डिसेंबर २०२५ या कालावधीत ही परीक्षा होणार असून या माध्यमातून २४१० पदांवर नियुक्ती दिली जाणार आहे. या परीक्षेची अधिसूचना, वेळापत्रक आणि ऑनलाईन आवेदनपत्राची माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सर्व कार्यरत प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) व प्रशिक्षित शिक्षक (प्राथमिक) यांच्या केंद्र प्रमुख पदावर नियुक्तीसाठी ही परीक्षा आयोजित करण्यात आली असून अधिक माहितीसाठी परीक्षार्थी उमेदवारांनी www.mscepune.in या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

# आचार्य प्रफुल दादांना अखेरचा निरोप

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. ३० :

मानव विकास ज्ञान साधना सेवाश्रम तळेगाव येथील आश्रमाचे संचालक आचार्य प्रफुल्ल दादा वाघधरे यांचे नुकतेच श्रीलंकेत झालेल्या केबल कार अपघातात निधन झाले.

कारंजा तालुक्यातील त्यांच्या मुळगावी ब्राम्हणवाडा येथे आप्त स्वकीय व पंचक्रोशीतील नागरिकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. श्रीलंकेला ध्यान साधनेकरिता गेले असता २४ सप्टेंबरला त्यांचा अपघाती मृत्यू झाला होता. त्यांच्या सोबत देशविदेशातील १२ सहकारी होते. त्यापैकी प्रफुल्ल दादासही ७ जणांचा जागीच मृत्यू झाला होता.



प्रफुल्ल दादांचे पार्थिव २७ ला श्रीलंकेवरुन विमानाने मुंबईला पोहोचले व तेथून गुरुकुंज मोझरी, तळेगाव, व मानव सेवाश्रम येथे दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी दादांचे पार्थिव किन्हाळा येथे त्यांच्या कुटीत एक तास दर्शनाकरिता ठेवण्यात आले होते.

नंतर तालुक्यातील जसापूर व गारपीट मार्गे ब्राह्मणवाडा येथे आणण्यात आले. गाव प्रदक्षिणा करून अंत्यविधी करण्यात आला. यावेळी विधानपरिषद आमदार दादाराव केचे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सौ. सरीता गाखरे, पंचायत समितीचे माजी उपसभापती जगदीश डोळे यांचेसह गुरुदेव सेवक आणि हजारोंच्या संख्येने लोकांची उपस्थिती होती.

आचार्य प्रफुल्ल दादांच्या अचानक जाण्याने जनतेची आणि देशाची खुप मोठी हानी झाली असे मत विभाकर ढोले यांनी बोलतांना व्यक्त केले. आजूबाजूच्या जिल्ह्यातील नागरिकही अंत्यसंस्काराला उपस्थित होते. यावेळी पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

: मुलखा वेगळी माणसं :

# वाचन संस्कृती रुजवणाऱ्या जोंधळे आजी



लोकमानस

वाचन संस्कृतीला प्रेरणा मिळावी यासाठी ७५ वर्षांच्या आजीबाईंनी आपल्या हॉटेलमध्ये पुस्तकांचा खजिना सर्वांसाठी खुला केला आहे. हॉटेलमधील टेबलावर मेनू कार्ड ठेवण्याऐवजी विविध पुस्तकं ठेवली आहेत. संपूर्ण जग मोबाईलमध्ये व्यस्त असताना वाचनापासून दूर गेलेल्या पिढीला वाचनाची सवय रहावी यासाठी त्या कायम प्रयत्नशील आहेत.

नाशिकच्या ओझर जवळ असलेल्या दहावा मैल येथे भीमाबाई जोंधळे यांचं रिलॅक्स कॉर्नर नावाने हॉटेल आहे. या हॉटेलमध्ये जेवणाच्या मेजवानीसह मराठी, हिंदी, इंग्रजी अशा वेगवेगळ्या भाषेतील वेगवेगळ्या स्वरूपातील पुस्तकांचा आस्वादही मिळतो.

त्यांच्या हॉटेलमध्ये प्रवेश केल्यानंतर ग्रंथालयात आल्यासारखं वाटतं. त्यांच्याकडे हॉटेलमध्ये तब्बल पाच हजार पुस्तकं उपलब्ध आहेत. हॉटेलच्या भिंती नाशिक शहरातील धार्मिक स्थळं, वाचनालय यांच्या छायाचित्रांनी रेखाटलेली आहेत. तर काही भिंती या कवितांनी भरलेल्या आहेत. हॉटेलमध्ये बसल्यावर ग्रंथालयात बसल्याचा भास होऊ लागतो.

आजीबाईंच्या हॉटेलमध्ये असलेल्या प्रत्येक टेबलावर चार ते पाच अशी विविध पुस्तकं असतात. त्यातील पुस्तक जर वाचनासाठी आवडलं नाही, तर उठून बाजूला लावलेल्या मांडणीतून, टेबलावरून आपल्याला हवं ते पुस्तक घेता येतं. हॉटेलमध्ये ठेवलेलं कुठलंही पुस्तक वाचण्यासाठी मूल्य आकारलं जात नाही. केवळ आणि केवळ वाचन संस्कृतीला प्रेरणा मिळावी या हेतूनेच भिमाबाई जोंधळे या आजींच्या हॉटेलमध्ये ही पुस्तक आहेत. नाश्ता आणि जेवणाची ऑर्डर येईपर्यंत हॉटेलमध्ये आलेले ग्राहक पुस्तक वाचत असतात आणि त्यातून त्यांना पुस्तक वाचण्याची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न या अवघ्या पाचवी शिकलेल्या आजीबाई करत आहेत.

हॉटेलमधील टेबलांवर मेनू कार्डऐवजी पुस्तक ठेवली जातात. त्यामुळे अनेकांना पुस्तक समोर आल्यानंतर ती जास्त जवळची वाटू लागली आणि ग्राहक हातातील मोबाईल बाजूला ठेवून पुस्तकं वाचू लागली. आजींच्या या हॉटेलमध्ये केवळ एका वयोगटापुरता मर्यादित पुस्तकं नाही, तर सर्वच वयोगटासाठी पुस्तकं आहेत. लोकांच्या कपाटात धूळ खात पडलेली पुस्तकंदेखील हॉटेलमध्ये आणून ठेवली आहेत. त्यामुळे दुर्मिळ असा पुस्तकांचा खजिना या हॉटेलमध्ये उपलब्ध आहे.

अशाप्रकारे हॉटेलमध्ये पुस्तक वाचनासाठी मोठा प्रतिसाद मिळत असल्याची माहिती भिमाबाई जोंधळे यांचा मुलगा प्रवीण जोंधळे यांनी दिली आहे.पुस्तक चळवळ झाली पाहिजे, वाचनाकडे जगाचं लक्ष राहिलं पाहिजे. त्यामुळे हॉटेलात पुस्तकं मांडून ठेवली आहेत. गेल्या सात वर्षांपासून त्या चळवळीत सहभागी झाल्या असून त्यांनी आपल्या हॉटेलमध्ये प्रशस्त अशी पुस्तकांची लायब्री तयार केली आहे. खरोखरच वाचनसंस्कृती जोप्सणाऱ्या जोंधळे आजी म्हणजे बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात अशी अवस्था असलेल्या आपल्या समाजा साठी एक आदर्शच आहेत.

■ ■ ■

# भारतामध्ये रचनात्मक रितीने ह्रदयरोग उपचार



भारतात ह्रदयाच्या आरोग्याकडे आता जास्त लक्ष वेधल जातंय. लोकांमध्ये लवकर निदानाची आणि आधुनिक उपचारांची गरज याची जाणीव वाढतेय. ह्रदयाच्या रचनात्मक आजारांमध्ये, विशेषतः झडपांशी संबंधित विकार, हे ह्रदय व रक्तवाहिन्यासंबंधी आजार श्रेणीचा एक प्रमुख भाग बनतात. रचनात्मक ह्रदयरोग म्हणजे ह्रदयाच्या झडपा, भित्तीका किंवा स्नायूंमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या.

या ह्रदयाच्या समस्या जगभरातील लाखो लोकांना भेडसवतात आणि लोकसंख्येच्य वाढत्या प्रमाणानुसार हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. रचनात्मक ह्रदयरोगांपैकी एक महत्त्वाचा आजार म्हणजे मायट्रल रिगर्जिटेशन (एमआर). हा आजार ह्रदयातील मायट्रल झडपा नीट बंद न झाल्यामुळे होतो. ही झडप ह्रदयाच्या दोन कप्प्यांमधील रक्तप्रवाह नियंत्रित करते. पण झडप पूर्णपणे बंद झाली नाही तर रक्त परत मागे जाते आणि त्यामुळे ह्रदयाला नेहमीपेक्षा जास्त मेहनत घ्यावी लागते.

मायट्रल व्हॉल्व्ह रिगर्जिटेशनचे साधारणतः दोन प्रकार असतात डीजनरेटिव्ह आणि फंक्शनल. डीजनरेटिव्ह मायट्रल रिगर्जिटेशन किंवा डीएमआरमध्ये, झडप स्वतःच खराब होते हे बहुतेकदा वय वाढल्यामुळे, संसगार्मुळे किंवा इतर आजारांमुळे होतं. यावर उपाय म्हणजे झडप दुरुस्ती किंवा झडप बदल शस्त्रक्रिया. फंक्शनल मायट्रल रिगर्जिटेशन (एफएमआर) मध्ये, ह्रदय मोठे होते, व्हॉत्यामुळे झडप ताणली जाऊन नीट बंद होत नाही. हे प्रामुख्याने ह्रदय कमजोर होणे किंवा हार्ट अटॅक झाल्यामुळे होतं. दोन्ही प्रकारच्या मायट्रल रिगर्जिटेशनमुळे श्वास घेण्यास त्रास होणे, लवकर थकवा येणे, ह्रदयाचे ठोके अनियमित होणे अशा तक्रारी दिसतात आणि त्यामुळे रुग्णाच्या जीवनमानावर परिणाम होतो.

परंपरेनं मायट्रल झडप दुरुस्ती किंवा बदल करण्यासाठी ओपन-हार्ट शस्त्रक्रिया हा एमआर उपचाराचा मुख्य मार्ग होता. पण सर्व रुग्ण अशी मोठी आणि जटील शस्त्रक्रिया सहन करू शकत नाहीत. ॲबॉटच्या स्ट्रक्चरल हार्ट व्यवसायातील भारतातील कंट्री मॅनेजर नीरज सिंग यांनी या तंत्रज्ञानाबद्दल आपले विचार मांडले.

भारतामध्ये ट्रान्सकॅथेटर मायट्रल झडप दुरुस्ती (ळएएफ) चा वाढता वापर हा स्ट्रक्चरल हार्ट केअर कसे केले जाते यामध्ये एक अर्थपूर्ण बदल दर्शवतो. ज्या रुग्णांना ओपन-हार्ट शस्त्रक्रिया करण्यासाठी धोका खूप जास्त आहे, त्यांच्यासाठी हा कमी इनव्हेसिव्ह उपचार नवे मार्ग उघडतो ह्रदयाची कार्यक्षमता पुनर्संचयित करणे, लक्षणे सोपी करणे, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे जीवनमान सुधारणा करणे.

भारतामध्ये मित्राक्लिप थेरपी सुरू केल्यापासून, आम्ही शेकडो लोकांना त्यांच्या ह्रदयाचे आरोग्य जपण्याच्या प्रवासात मदत करू शकलो आहोत. जागतिक स्तरावर, गेल्या 20+ वर्षांत, या तंत्रज्ञानाचा वापर करून 250,000 पेक्षा अधिक प्रक्रिया केल्या गेल्या आहेत. ही संख्या फक्त आकडेवारी नाहीत ती उन्नत ह्रदयविकार उपचारांचा विस्तार आणि आमच्या नवोन्मेषी, पुराव्यावर आधारित उपाय अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या सततच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

■ ■ ■

## पावसाने झोडपलेल्या शेतकऱ्यांना आधार कुणाचा?

: माझं मत :

**नाथराव कराड, शेतकरी**

महाराष्ट्रातील मराठवाडा हा भाग कायम दुष्काळी म्हणून ओळखला जातो. परंतु यंदा मात्र अगदी परतीच्या पावसाने याच मराठवाड्यात इतका भयानक धुमाकूळ घातलेला आहे की घरदार आणि उभी पीक अक्षरश उध्वस्त झालेली आहेत. शेतकरी पूर्ण हवालदिल झालेला आहे. निसर्गनेच झोडपले तर आता आधार कुणाचा? अशा अवस्थेत शेतकरी आहेत. आता सरकारने पिकांचा पंचनामा तत्काळ करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजारांची मदत करायलाच हवी.तरच या उद्धवस्त शेतकऱ्यांचे संसार पुन्हा उभे राहण्यास मदत होईल. या मध्ये कोणत्याही प्रकारचे राजकारण न करता ही मदत तत्काळ.शेतकऱ्यांच्या हातात पडावी अशी अपेक्षा.

**राम खाकाळ, समाजसेवक**

यंदा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना अस्मानी संकटाने अक्षरश नामोहरम करून टाकले आहे.सोयाबीन, कापूस, ऊस अशी नगदि पीक उध्वस्त झालेली आहेत.पावसाने इतका अतिरेक केला की माणसं जगली हेच फार होत.आता सरकारने या शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर पने उभे राहून त्यांना आर्थिक.मदत द्यायला हवीच याशिवाय मुंबईतील सार्वजनिक गणेश मंडळ आणि सामाजिक संस्थानी देखील आपले उत्तरदायित्व म्हणून आपल्या या अन्नदात्याला पुन्हा उभ करण्यासाठी आर्थिक मदत करायला हवी.तरच शेतकऱ्यांना मोठा आधार मिळेल.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

आय लव्ह मोहम्मदवरून

# कुर्ल्यात वाद

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी धार्मिक वाद निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे. अहिल्यानगर येथे देखील एका रांगोळीवरून धार्मिक तणाव निर्माण झाला होता. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील करमाड येथे देखील एका वादग्रस्त व्हॉट्सअपच्या स्टेटसवरून वाद निर्माण झाला होता.

आता कुर्ला येथे देखील 'आय लव्ह मोहम्मद'च्या पोस्टरवरून वाद निर्माण झाला आहे. भाजप नेते किरीट सोमय्या हे आज त्या ठिकाणी जायला निघाले होते, मात्र त्यांना पोलिसांनी अडवले होते.

सोमय्या म्हणाले, कुर्ला येथील जो व्हिडिओ व्हायरल झाला आहे, त्यात पोलिसांच्या उपस्थितीत आय लव्ह मोहम्मद वाहनांवर चिटकवले जात आहे. त्यांचे महामार्गांवर जे हॉटेल आहेत तिथे मोठे मोठे पोस्टर लाऊन दाखवावेत. आय लव्ह मोहम्मदचे पोस्टर रिक्षा, गाड्यांवर लावले जात होते, तेव्हा पोलिसांनी कारवाई का केली नाही? असा सवाल सोमय्या यांनी केला आहे.

# ठाणेगावची जगदंबा माता भाविकांचे श्रद्धास्थान

■ धिरज कसारे
कारंजा (घा.), दि. ३० :

तालुक्यातील ठाणेगावचे प्राचीन जगदंबा मंदिर जिल्हा व जिल्ह्याबाहेरील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त भाविकांची मोठ्या संख्येने गर्दी होत आहे.

ठाणेगाव परिसरात हे हेमाडपंथी मंदिर असून, या जगदंबा मंदिरात नागपूर, वर्धा, जिल्ह्यातून असंख्य भाविक दर्शनाकरिता येतात.

मंदिर बांधकामात वापरलेल्या हेमाडपंथी वस्तू श्रीमंतीची साक्ष देतात. मंदिराचे प्रवेशद्वार, सभामंडप, थोडे खोलात असून, गर्भगृह व मंदिराच्या आतील व बाहेरील वास्तू कला, शिल्पकला व कलाकुसर येथे येणाऱ्यांना भुरळ घालते. भाविकांची गैरसोय होणार नाही याची काळजी देवस्थान संचालक मंडळ नवरात्रोत्सवात घेतात.



नवरात्रोत्सवात भक्तांची रीघ

**मंदिराचे बांधकाम बाराव्या शतकातील**

मंदिराचे बांधकाम बाराव्या किंवा तेराव्या शतकातील असावे, असा अंदाज आहे. हेमाद्री पंडिताच्या नावे पुढे हेमाडपंथी वास्तुकला म्हणून बांधकाम पद्धती प्रसिद्ध झाली. ती वास्तुकला म्हणजेच एका विशिष्ट पद्धतीने केवळ दगडावर दगड रचून दीर्घकाळ टिकणाऱ्या वास्तूचे निर्माण केले

**शिवशक्तीच्या संगमाचे दर्शन**

गर्भगृहातून खाली उतरल्यास शिवलिंग रूपाने व आई अक्काबाई, बाकाबाई स्वरूप जगतकारीणी देवी जगदंबा मातेच्या रूपाने शिव व शक्तीच्या अद्भुत संगमाचे दर्शन घडते. वर्षभर येथे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडतात

जगदंबा माता मंदिर परिसर बराच मोठा आहे. सर्व बाजूंनी दगडी भिंत बांधून सुरक्षित केला आहे.

मुख्य दारातून जाताना आपल्याला प्राचीनद्वार मंडप दृष्टीस पडतो. दोन्ही बाजूच्या भिंतीवर दोन शैव द्वारपालाच्या कोरीव मूर्ती आपले लक्ष वेधतात. मुख्य मंदिरातील देवीचे दुरून दर्शन होते. दोन्ही बाजूला सिंहाच्या आकर्षक मूर्ती आहेत.

**गाभाऱ्याच्या दिशेने नंदीची मूर्ती उभी**

ठाणेगाव येथील जगदंबा देवी मंदिर जरी जगदंबा मातेच्या नावाने प्रसिद्ध असले तरी त्यातील गर्भगृहात अस्तित्वात असलेल्या मोठ्या आकाराचे पुरातन शिवलिंग व मुख्य मंदिराच्या प्रवेशद्वारासमोर चौथ्यावर गाभाऱ्याच्या दिशेने मुख करून असलेल्या नंदीची मूर्ती दिसते. मंडपाच्या प्रवेशद्वारावरील शैव द्वारपालाच्या रेखीव मुर्तीमुळे शिवमंदिर म्हणून बांधले गेले असावे, असा भास होतो.

# अनुकंपा तत्वावर वारसांना शासकीय सेवेत मिळाली संधी



■ महासागर प्रतिनिधी
देऊळगाव राजा, दि. ३० :

नगरपरिषदेच्या आस्थापनेवर कार्यरत असताना निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्त्वावर शासनाच्या निर्णयानुसार देऊळगाव राजा नगरपरिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी अरुण मोकळ यांनी वर्ग ३ मध्ये ४ वारसदारांना तर वर्ग ४ मध्ये ५ वारसदारांना कायमस्वरूपी नोकरीत सामावून घेतले आहे.



या सोहळ्यात जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष श्रीमती नंदाताई कायंदे यांच्याहस्ते सातही वारसदारांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी नवनियुक्त कर्मचाऱ्यांच्या परिवाराच्या चेहऱ्यावर हास्य फुलल्याचे दिसले.

कुटुंबातील करता माणूस अचानक निघून गेल्यावर त्या परिवार काय संकट कोसळते त्याची जाण त्या परिवारालाच असते. शासन अशा परिवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे मुख्याधिकारी अरुण मोकळ यांनी सांगितले.

शासकीय व निमशासकीय सेवेत कार्यरत असताना कर्मचाऱ्यांचे निधन झाल्यास त्या कर्मचाऱ्यांच्या वारसदारांपैकी एकास अनुकंपा तत्त्वावर सेवेत सामावून घेतले जाते. शासनाने एका आदेश नुकताच जारी केला असून, ज्या ज्या विभागांमध्ये रिक्त जागा आहेत अशा विभागात २० टक्के जागा अनुकंपा तत्त्वावर भराव्यात असे त्यात नमूद आहे . देऊळगावराजा नपच्या आस्थापनेवरील रिक्त असलेल्या जागेवर सात वारसदारांना नियुक्तीचे आदेश देण्यात आले. यासाठी मुख्याधिकारी अरुण मोकळ यांनी सतत पाठपुरावा करून मान्यता मिळवून घेतली.

याप्रसंगी भाजपा जिल्हा महिला मोर्चाच्या अध्यक्ष सविता पाटील, नगरसेवक प्रदिप वाघ प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. नपचे कार्यालय अधीक्षक राजु जाधव, आस्थापना प्रमुख गणेश मुळे, अंकित बेलोकार, विश्वजीत गवते उपस्थित होते . नवनियुक्त वारसदारांमध्ये गणेश महेंद्र शर्मा, सतिश कारभारी गीते, विनोद विधाते, मुकेश विधाते, सार्थक घोडके, सुमित अग्रवाल, निलेश शिंगणे यांचा समावेश आहे.

# नागपूर महासागर वृत्तसागर

■ बुधवार, दि. १, ऑक्टोबर २०२५ ■


## एआयच्या माध्यमातून प्रत्येक हालचालीवर करडी नजर

# १५०० पोलिसांचे दीक्षाभूमीला सुरक्षा कवच



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

* २ कंपन्या एसआरपीएफच्या
* १०० सीसीटीव्ही, मोबाईल सर्व्हिलान्स व्हेईकल
* बीडीडीएस, श्वानपथक आणि पोलिस नियंत्रण कक्ष

दीक्षाभूमीवर उपासक उपासिकांची प्रचंड गर्दी असते. देश-विदेशातील अनुयायी येतात. मुख्य सोहळ्याच्या दिवशी लाखो उपासक असतात. गर्दीची सुरक्षितता आणि व्यवस्थापन करण्यासाठी पहिल्यांदाच एआयचा वापर होणार आहे. यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय कमांड) सेंटर सुरू करण्यात आले आहे. धोक्याची लवकर ओळख, गर्दीच्या हालचालींचा अंदाज आणि पूर्व-उपाययोजना करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर होणार आहे.

६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सोहळ्याला मंगळवारपासून सुरुवात झाली. आजच पोलिसांनी दीक्षाभूमीचा ताबा घेतला. याठिकाणी एआय कमांड सेंटर सुरू करण्यात आले आहे. अशा गर्दीच्या ठिकाणी अफवा आणि चुकीची माहितीचा जलद प्रसार होतो. ज्यामुळे व्यवस्थापित गर्दीतही भीती निर्माण होते. अशा वेळी एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नियंत्रण मिळविता येते.

पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांनी मंगळवारी सकाळी बंदोबस्ताचा आढावा घेत अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. त्यांच्यावर दिलेल्या जबाबदारी चोखपणे पार पाडण्याचे निर्देश दिले.

उपस्थिती पोलिस उपायुक्तांनी सर्वांना त्यांची वेगवेगळी कामे वाटून दिली. सुरक्षा कवच निर्माण करण्यासाठी ४ एसीपी, ११०० अंमलदार, ३२५ होमगार्ड, एसआरपीएफच्या २ कंपन्या, आरसीपीच्या २ कंपन्या, पोलिस निरीक्षक, सहायक पोलिस निरीक्षक आणि १२८ पोलिस उपनिरीक्षक असे एकूण दीड हजारांवर पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. येथील बंदोबस्ताची जबाबदारी २ उपायुक्तांवर देण्यात अली आहे.

दोन पाळीत बंदोबस्त असेल. तसेच परिसरात तात्पुरत्या स्वरुपात पोलिस नियंत्रण कक्ष उभारण्यात आले आहे. शंभर सीसीटीव्ही लावण्यात आले आहेत. तीन मोबाईल सर्व्हिलान्स व्हेईकलच्या माध्यमातून गर्दीची माहिती घेतली जाईल.

याशिवाय बॉम्ब शोध व नाशक पथक, श्वान पथकाच्या माध्यमातून सतत तपासणी केली जात आहे. नातेवाईक हरवल्यास किंवा काही महत्त्वाची माहिती नातेवाईकापर्यंत पोहोचविण्यासाठी सोय उपलब्ध करून दिली आहे.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते इंगोले नगर मधील नागरिकांना जागेची सनद बहाल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

ज्या भागात पाणंद रस्त्यांना पर्याय म्हणून भक्कम मोठे रस्ते उपलब्ध झाले अशा जुन्या पाणंद रस्त्याच्या बाजुला अनेक वर्षापासून आश्रय घेतलेल्या गोरगरिब कुटुंबांना आपल्या मालकीचा निवारा मिळावा अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. यातूनच आपण पट्टे वाटप मोहिमेला गती दिली. हुडकेश्वर येथील जुन्या पाणंद रस्त्यावरील गत अनेक वर्षापासून आश्रयास असलेल्या 59 नागरिकांसह एकूण 104 नागरिकांना त्यांच्या मालकीची सनद देतांना मनस्वी आनंद व समाधान असल्याचे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

'राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा' अंतर्गत हुडकेश्वर येथील इंगोले नगर येथे त्यांच्या हस्ते पट्टे वाटप करण्यात आले. काल दिनांक 29 सप्टेंबर रोजी झालेल्या या समारंभास उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक सतीश पवार, तहसीलदार कल्याणकुमार दहाट तसेच अन्य मान्यवर, अधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पाणंद रस्त्यावरील त्या 59 नागरिकांना आपल्या मालकीची आता सनद अर्थात जागेचा पट्टा मिळाल्याने एक नवी उभारी या कुटुंबांनी घेतली. शासनाच्या या निर्णयाबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त करुन पट्टे वाटप योजनेची उपयोगीता अधोरखित केली. पाणंद रस्त्यावरील अतिक्रमीत घरांना कायदेशीर करून पट्टे वाटप करण्याचा राज्यातील हा पहिलाच उपक्रम असून, हा प्रयोग समाजातील सर्वसामान्यांना न्याय देणारा आणि खऱ्या अर्थाने लोकाभिमुख शासनाचा एक मापदंड म्हणून आता नोंदविला गेला आहे.

हुडकेश्वर येथील पाणंद, सर्व्हे नं. 173 व 174 येथे 59 पट्टे, हुडकेश्वर गावठाण शेजारील सर्व्हे नं. 1 येथे 45 पट्टे असे एकूण 104 नागरिकांना त्यांच्या मालकीची सनद प्रदान करण्यात आल्या. हातात सनद/पट्टा मिळताच अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले.

**सेवा, स्वामित्व आणि सबलीकरणाचा संगम**

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त (17 सप्टेंबर) ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (2 ऑक्टोबर) राबविण्यात येणाऱ्या सेवा पंधरवडा उपक्रमात हा कार्यक्रम नागरिकांप्रती सरकारच्या सेवाभावाची साक्ष देणारा ठरला. नागरिकांच्या दीर्घ प्रतीक्षेला पूर्णविराम देत पाणंद रस्त्यावरील अतिक्रमणधारक 59 कुटुंबांना अखेर त्यांच्या घराचा कायदेशीर हक्क प्राप्त झाला.

# १८ कोटींची इमारत वर्षभरापासून धुळखात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

तब्बल १८ कोटी रुपये खर्चून नागपूरच्या सिव्हिल लाईन्स भागात उभारलेली अन्न व औषध प्रशासन विभागाची (एफडीए) अत्याधुनिक व सुसज्ज इमारत वर्षभराहून अधिक काळापासून धूळखात पडून आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) ही इमारत पूर्णत्वास नेली असूनही, एफडीएकडून अद्याप ताबा घेण्यात आला नाही. त्यामुळे सरकारी निधीचा अपव्यय होत आहे.

ही इमारत २०१८ मध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते भूमिपूजनानंतर बांधायला सुरुवात झाली. तळमजला आणि पाच मजले असा आराखडा असलेल्या या इमारतीमध्ये तिसऱ्या व चौथ्या मजल्यावर एफडीएच्या प्रयोगशाळा प्रस्तावित होत्या.

मात्र, खासगी सल्लागाराने तयार केलेल्या प्रयोगशाळेच्या आराखड्यावर एफडीएने आक्षेप घेतला व काम थांबवले. पर्यायी आराखडा सादर करण्याची जबाबदारी एफडीएवर असतानाही, गेल्या दोन-तीन वर्षांपासून त्यांच्याकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नाही.



या इमारतीतील वीज यंत्रणा, फर्निचर आणि उपकरणांच्या गॅरंटी-वॉरंटी कालावधीत कोणतीही कारवाई न झाल्याने ती संपत आली आहे. त्यामुळे आता विद्युत कंत्राटदारांवर अनाठायी दुरुस्तीचा आर्थिक भार येण्याची शक्यता आहे. देखभाल व नूतनीकरणासाठी होणारा अतिरिक्त खर्चही शासनावर येणार असून ही इमारत पांढरा हत्ती ठरत आहे. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी पीडब्ल्यूडीने सहआयुक्त, एफडीए (नागपूर विभाग) यांना ताबा पावती सादर केली होती. मात्र, सात महिने उलटून गेले तरी एफडीएकडून कोणताही प्रतिसाद न आल्याने ८ सप्टेंबर रोजी इमारत एकतर्फी हस्तांतरित करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

# २७२ किलो अंमली पदार्थ केले नष्ट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

पोलिस आयुक्त रवींद्रकुमार सिंगल यांच्या मार्गदर्शनात शहर नशामुक्त करण्यासाठी पोलिस विभागाकडून ऑपरेशन थंडर राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत अंमली पदार्थांची तस्करी आणि खरेदी-विक्री करणाऱ्यांवर सतत कारवाई सुरू आहे.

पोलिसांनी १८ ठाण्यांत नोंद १०० प्रकरणांमध्ये २७२ किलो अंमली पदार्थ जप्त केला होता. यामध्ये गांजा, एमडी, चरस आणि गर्द आदींचा समावेश होता. ४३ लाख रुपये किंमतीचा हा माल सोमवारी वैज्ञानिक पद्धतीने पोलिस आयुक्तांच्या उपस्थितीत नष्ट करण्यात आला. यापूर्वी आंतरराष्ट्रीय ॲन्टी ड्रग्ज डे ला पोलिसांनी जनजागृती आठवड्या दरम्यान १.३२ कोटी रुपयांचा माल नष्ट केला होता.

# राष्ट्रवादीच्या वतीने नागपुरात दसरा महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नागपूर शहर आणि ग्रामीण यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०२ ऑक्टोबर, २०२५ रोजी एक भव्य, ऐतिहासिक आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा दसरा महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर अध्यक्ष अनिल अहिरकर आणि ग्रामीण जिल्हाध्यक्ष राजाभाऊ टाकसाळे यांच्या नेतृत्वात हा भव्य सोहळा पार पडणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटक राष्ट्रीय सचिव, जिल्ह्याचे निरीक्षक आणि माजी आमदार राजेंद्र जैन हे लाभणार आहेत.कार्यक्रमाला पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. तसेच, शहरातील आमदार आणि इतर विशेष मान्यवर या सोहळ्याला उपस्थित राहून जनतेला संबोधित करतील.या भव्य सोहळ्याचे संयोजक म्हणून कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर हे विशेष परिश्रम घेत आहेत. तसेच, तानाजी वनवे आणि मालूताई वनवे हे सह-आयोजक म्हणून सक्रिय भूमिका पार पाडत आहेत.




या कार्यक्रमाच्या माध्यमातून नागपूरकरांना एकाच दिवशी धम्मचक्र परिवर्तन दिनाचा सामाजिक समतेचा संदेश, गांधी जयंतीचे राष्ट्रीय मूल्यं आणि दसऱ्याचा विजयोत्सव अनुभवता येणार आहे.या भव्य सोहळ्याला नागपूर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्व नेते, प्रदेश पदाधिकारी, शहर आणि ग्रामीणचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

नागरिकांनी आणि सर्व पक्ष कार्यकर्त्यांनी या ऐतिहासिक सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, नागपूर शहर आणि ग्रामीण जिल्ह्याच्या वतीने करण्यात आले आहे.

या प्रसंगी शहर कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर,नरेश अरसडे, सुनीता येरणे, विशाल खांडेकर, लक्ष्मी सावरकर, बजरंगसिंह परिहार, जानबा मस्के, शोएब असद, राजू मिश्रा, विश्वास फक्किडे, कपिल मेश्राम, यशश्री बनसोड, भारत शर्मा, विकी शर्मा,अमित तावडे, अतुल शेंडे, मॉंटी गंडेचा समीर रहाटे, श्याम पांडे, राजेश फुले, श्याम बिहारी पांडे, कनिजा बेगम, अंजुम शेख, अनुपमा डोंगरे, विशाल खांडेकर,हिमांशु पंचबुधे, चंद्रकांत नाईक, किरण नंदनवार, दिनेश रोडगे, प्रफुल मेश्राम, अनिल तांदुळकर, संदेश खोब्रागडे, विशाल गोंडाने, विवेक वानखेडे, सलाम शेख, आशिक तुर्के, शोभा येवले, पुष्पम धानोरकर स्वप्निल दहिवले, राहुल कांबळे उपस्थित होते.

## ड्रॅगन पॅलेस येथे छायाचित्र प्रदर्शन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त, भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या केंद्रीय कम्युनिकेशन ब्युरोच्या प्रादेशिक कार्यालयाने कामठी येथील जगप्रसिद्ध ड्रॅगन पॅलेस येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित 'महामानव का जीवन प्रवास-महामानव का जीवन प्रवास' या दोन दिवसांच्या छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन केले आहे.

ओगावा सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते बुधवार, १ ऑक्टोबर रोजी होईल. ओगावा सोसायटीच्या अध्यक्षा सुलेखा ताई कुंभारे आणि नागपूरच्या सेंट्रल ब्युरो ऑफ कम्युनिकेशन्सचे प्रादेशिक प्रचार अधिकारी सौरभ खेकडे हे या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीत असतील.

या प्रदर्शनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील दुर्मिळ छायाचित्रे आणि विविध घटना प्रदर्शित केल्या जातील. डॉ. बाबासाहेबांचे विचार आणि जीवनातील घटनांबद्दल जास्तीत जास्त लोकांना जाणून घेण्यासाठी प्रेरणा मिळावी.

केंद्रीय कम्युनिकेशन ब्युरो, प्रादेशिक कार्यालय, नागपूर, हे केंद्रीय कम्युनिकेशन ब्युरो, प्रादेशिक कार्यालय, पुणे, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार यांच्या अंतर्गत कार्य करते. हे कार्यालय नियमितपणे विविध सरकारी धोरणे आणि योजना जनतेपर्यंत पोहोचवते आणि नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील विविध तहसील आणि गावांमध्ये विविध लोककला प्रकार, स्पर्धा इत्यादींद्वारे जागरूकता निर्माण करते.

# बीएसएनएलच्या रजत महोत्सवाच्या प्रवासात शहरी आणि ग्रामीण डिजिटल दरी कमी : यश पान्हेकर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

केंद्रीय संचार आणि टेलिकम्युनिकेशन मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या भारत संचार निगम लिमिटेड बीएसएनएलला १ ऑक्टोबर २०२५ रोजी २५ वर्षे पूर्ण होत आहे. या रजत महोत्सवाच्या प्रवासात बीएसएनएलने लँडलाईन टू ब्रॉडबँड, फायबर टू होम, भारत नेट आणि आता स्वदेशी 4 जी नेटवर्क असा प्रवास केला असून शहरी आणि ग्रामीण डिजिटल दरी कमी केली आहे, असे प्रतिपादन बीएसएनएल नागपूरचे मुख्य महाव्यवस्थापक यश पान्हेकर यांनी नागपूरमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत केले.




नागपूर जिल्ह्यामध्ये 2 लाख 27 हजार पेक्षा जास्त बीएसएनएलचे मोबाईल ग्राहक असून, ब्रॉडबँड कनेक्शनचे 868 तर फिक्स्ड लँडलाईन इंटरनेट कनेक्शनचे ग्राहक 24 हजारापेक्षा जास्त आहेत. नागपूरमध्ये 395 टॉवरच्या माध्यमातून 4 जीच्या सेवा देण्यात येत आहेत असे त्यांनी सांगितले. नागपूर बीएसएनएलने उत्पन्न वाढीसाठी आपल्या मालकीच्या शहरातील तसेच जिल्ह्यातील शासकीय जागा तसेच इमारती विविध केंद्र राज्य तसेच सार्वजनिक उपक्रम क्षेत्राच्या विभागांना भाडेतत्वावर दिल्या असून त्या माध्यमातून बीएसएनएल नागपूरला दरवर्षी सुमारे 8.5 कोटी महसूल प्राप्त होत आहे.

नागपूर मध्ये ऑप्टिकल फायबर नेटवर्क ची लांबी सुमारे 2200 किलोमीटर असून देशातील पहिले डिजिटल व्हिलेज असणारे नागपूर जिल्ह्यातील सातनवरी या गावामध्ये देखील बीएसएनएलच्या भारतनेट या हाय स्पीड ऑप्टिकल फायबर कनेक्टिव्हिटी आणि बँड सुविधेचा उपयोग होत आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

## 'ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त 'बाकी शून्य' नाटकाचे आज सादरीकरण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

मनपाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्यसाधून नागपूर महानगरपालिका आणि मनपा ज्येष्ठ नागरिक कक्ष संयुक्त विद्यमाने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन 1 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 2 वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात साजरा केला जाणार आहे. कार्यक्रमात बाकी शून्य' या दोन अंकी नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. "जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात ज्येष्ठ नागरिक व कुटूंबातील सदस्यांकरिता विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहेत. कार्यकमात मान्यवरांच्या हस्ते मनपाच्या विविध उपक्रमात सक्रीय सहभाग घेणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते होईल. तर प्रमुख अतिथी म्हणून मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. अतिरिक्त आयुक्त विजया बनकर, सहायक आयुक्त नरेंद्र बावनकर, वैद्यकीय आरोग्य शिक्षणाधिकारी साधना सयाम यांच्यासह इतर अधिकारी व ज्येष्ठ नागरिक उपस्थित राहतील.

# मनोविकृतामुळे गिट्टीखदानमध्ये तणाव

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

**मंडपात घुसून घातला गोंधळ**

एका मनोविकृत तरुणाने मंडपात घुसून धुडगूस घातल्याने गिट्टीखदान परिसरात तणाव पसरला. या घटनेचा व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर परिसरातील नागरिक संतप्त झाले. काही हिदुत्ववादी संघटनाही परिसरात पोहोचल्या. त्यानंतर शेकडो संतप्त लोकांनी पोलिस ठाण्याला घेराव घातला. यामुळे तणावाची स्थिती कायम होती. अखेर सोमवारी सायंकाळी गिट्टीखदान पोलिसांनी आरोपीला अटक केली. पोलिसांनी कठोर कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर नागरिकांचा राग शांत झाला. सूरज खोब्रागडे (२५) रा. मानवतानगर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

सूरज हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा आहे. काही दिवसांपूर्वी गिट्टीखदान ठाण्यांतर्गतच एका प्राण्यासोबत विकृतीचे प्रकरण पुढे आले होते. सूरज या प्रकरणात आरोपी होता आणि त्याला अटकही झाली होती. तो चोरीच्या गुन्ह्यांमध्येही सक्रीय होता. सोमवारी पहाटे तो मानवतानगरच्या एका मंडपात घुसला. तेथे त्याने अश्लील चाळे केल्याचे सांगण्यात येत आहे. परिसरातच राहणाऱ्या एका तरुणाने त्याला मंडपात घुसताना पाहिले होते. मोठा अनर्थ टाळण्यासाठी त्या तरुणाने आरडा-ओरड करण्याऐवजी व्हीडिओ बनवला. त्यानंतर त्याने मंडपाच्या पदाधिकाऱ्यांना याची माहिती दिली. तोपर्यंत सूरज तेथून फरार झाला होता. पाहता-पाहता या घटनेचे वृत्त संपूर्ण परिसरात पसरले. सकाळीच १०० हून अधिक लोक ठाण्यात पोहोचले. सूरजविरुद्ध तक्रार दाखल केली. पोलिसांनी शहरात शांतता ठेवण्यासाठी लोकांची समजूत काढली. मात्र सायंकाळपर्यंतही सूरजला अटक न झाल्याने पुन्हा रोष पसरला. ७०० ते ८०० लोक गिट्टीखदान ठाण्याच्या बाहेर गोळा झाले. कारवाईची मागणी करीत घोषणा देऊ लागले. माहिती मिळताच परिमंडळ क्र. २ चे उपायुक्त नित्यानंद झा यांच्यासह अधिकारी आणि अतिरिक्त बळ ठाण्यात पोहोचले. सायंकाळी पोलिसांनी सूरजला सदर परिसरातून अटक केली. पोलिसांनी त्याच्यावर कठोरात कठोर कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर वातावरण शांत झाले. या घटनेनंतर कोणताही अनुचित प्रकार घडला नसला तरी लोकांमध्ये संताप आहे.

# पहिल्याच दिवशी पाच हजार उपासकांनी घेतली धम्मदीक्षा

## भदंत ससाई यांच्या उपस्थितीत बुद्ध वंदना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

69 व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर आयोजित तीन दिवसीय धम्मदीक्षा सोहळ्याला मंगळवारपासून सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी जवळपास पाच हजार अनुयायांनी श्रामणेर दीक्षा घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमीचे अध्यक्ष तथा धम्मसेना नायक भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या उपस्थितीत सकाळी 9.30 वाजता बुद्ध वंदना घेण्यात आली.

त्यानंतर धम्मदीक्षेच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. जपानहून 30 प्रतिनिधींचा एक संघ आला आहे. त्यापैकी काही बांधवांनी श्रामणेरची दीक्षा घेतली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमीतर्फे आणि भिक्खु संघाच्या सहकार्याने धम्मदीक्षेचा कार्यक्रम अव्याहतपणे सुरू आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही पवित्र दीक्षाभूमीवर धम्मदीक्षेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. 30 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबरपर्यंत सलग तीन दिवस चालणाऱ्या धम्मदीक्षा सोहळ्यात विविध राज्यातून आलेले उपासक, उपासिका, अनुयायी व श्रामणेर यांना भिक्खु संघातर्फे दीक्षा देण्यात आली. भदंत सुरेई ससाई यांच्या प्रमुख उपस्थितीत मंचावर भंते नागसेन, भंते प्रज्ञाबोधी, भंते अश्वजित, भंते धम्मविजय, भंते महानागा, भंते कश्यप, भंते बुद्धघोष, भंते धम्मप्रकाश, भंते मिलद, भंते धम्मशील, भंते संघ, शांतीनागा उपस्थित होते.

मंगळवारी सकाळी 9.30 वाजता भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांनी बुद्ध वंदनेने कार्यक्रमाला सुरुवात केली. नंतर धम्मदीक्षेचा कार्यक्रम सायंकाळपर्यंत सुरू होता. धम्मसेनेचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी धम्म दीक्षा घेणाऱ्यांचे अर्ज भरून घेत होते. एका अर्जावर एकाच कुटुंबातील जास्तीत जास्त पाच अनुयायांच्या नावाची नोंदणी करण्यात आली.

धम्मदीक्षेनंतर त्या सर्वांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. धम्मसेनेचे दीपक मुंघाटे, गणेश दुपारे यांच्यासह पदाधिकारी आणि भिक्खुसंघ सहकार्य करीत आहेत. दीक्षाभूमी ही प्रेरणाभूमी असून येथून मिळालेल्या उर्जेमुळे जीवनात सकारात्मकता निर्माण होते. उपासक, उपासिका आणि अनुयायी मोठ्या प्रमाणावर येतात आणि धम्मदीक्षा घेतात, असे भदंत ससाई म्हणाले.

## आसमान फाउंडेशनतर्फे टिळक विद्यालयात कन्या पूजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

आसमान फाउंडेशन नागपूर तर्फे दरवर्षी प्रमाणे यंदाही लहान मुलींसोबत नवरात्र उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी टिळक प्राथमिक विद्यालय धंतोली येथील गरीब व आर्थिक रूपाने दुर्बल नऊ मुलींचे पूजन केले.

तसेच पन्नास मुलींना शालेय साहित्य वितरित करण्यात आले. डॉ.रवि गि-हे यांनी आसमान फाउंडेशनच्या माध्यमातून नवरात्रोत्सव शस्त्र म्हणून वही पुस्तक व पेन यांचा वापर करून नरकासुर रुपी अज्ञानाचा अंत केला पाहिजे. कार्यक्रमात फाउंडेशनच्या महिला सदस्य विभा विंचुरकर, मेघा गि-हे, उषा जैन, जयश्री बोबडे यांनी नऊ कन्यांचे पूजन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा संचालक अध्यक्ष स्वानंद सोनी, योगेश्वर बुटी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभारे, प्राचार्या सपना कुरलकर, दर्शना देशपांडे यांचे सहकार्य लाभले.

## आम्ही शिक्षक कोणत्याही परिस्थितीत बीएलओचे काम करणार नाही
# नागपूर (ग्रा ) तहसील प्रशासनाविरोधात बहिष्कार

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :



नागपूर (ग्रामीण) यांनी एकजूट दाखवत बीएलओचे काम न करण्याचा ठराव घेतला. समितीच्या वतीने नागपूर ग्रामीण तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले असून, "आम्ही शिक्षक कोणत्याही परिस्थितीत बीएलओचे काम करणार नाही," असा ठाम इशारा यावेळी देण्यात आला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची पूर्वतयारी म्हणून मतदार यादी दुरुस्तीकरिता नागपूर ,कामठी, हिंगणा विधानसभा मतदारसंघात नवीन बीएलओंची (बूथ लेव्हल ऑफिसर) नियुक्ती करण्यात आली.

मात्र, या निर्णयामुळे तहसील प्रशासन आणि शिक्षक यांच्यात वादंग निर्माण झाला आहे. यापूर्वी बीएलओचे काम अंगणवाडी सेविका, आशा वर्कर व पोलीस पाटील यांच्या माध्यमातून पार पाडले जात होते. तलाठी यांच्या सुपरव्हिजनखाली हे काम सुरळीत चालत होते.

परंतु आता हे काम शिक्षक आणि मुख्याध्यापकांकडे दिल्याने शिक्षक संघटना आक्रमक झाल्या आहेत. शिक्षण हक्क कायदा अधिनियम २००९ नुसार, प्रत्यक्ष निवडणुकीशिवाय निरंतर चालणाऱ्या कामांसाठी शिक्षकांची नेमणूक करण्यास मनाई आहे. यासंदर्भात राज्य शासनाने २३ ऑगस्ट २०२४ रोजी शासन निर्णयही जारी केला आहे.

तरीदेखील तहसील प्रशासन शिक्षकांना या कामात गुंतवित असल्याचा आरोप करण्यात आला. त्यामुळे ग्रामीण भागातील शाळांतील विद्यार्थ्यांचे नुकसान होईल, अशी भीती शिक्षकांनी व्यक्त केली. आंदोलनावेळी शिक्षकांनी आक्रमक भूमिका घेतली व शासन निर्णय, कायद्याचे संदर्भ देत प्रशासनाच्या भूमिकेचा निषेध व्यक्त केला. सर्व शिक्षकांनी एकीचे दर्शन घडवत बीएलओ कामावर बहिष्कार जाहीर केला.

यावेळी समितीचे पदाधिकारी महेंद्र बनसिंगे, शुद्धोधन सोनटक्के, दामोदर कोपरकर, पुरुषोत्तम चौधरी, सुरेश गोंडाणे, गुणवंत इखार, दिनेश तिरपुडे, विशाल केदार, अजय रामगीरकर, अशोक वैद्य, अर्चना कावळे, ज्ञानेश्वरी बांद्रे, सुरेश खंगार, गिरीधर गायनेर आदी शिक्षक उपस्थित होते.

## विशेष ग्रामसभेला गावकऱ्यांची गर्दी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ३० :

खसाळा गावात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान आणि विशेष ग्रामसभा मोठ्या उत्साहात पार पडली. या ग्रामसभेला गावकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करून आपल्या विषय सादर केले. कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, सरपंच जयश्री इंगोले, तहसीलदार जगदाळे, गटविकास अधिकारी येवले आणि विस्तार अधिकारी गावंडे आदी उपस्थित होते. ग्रामसभेत सुरुवातीला कार्यकारी अधिकारी महामुनी यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला आणि गावातील विकासकामांची माहिती घेतली. त्यांच्या हस्ते स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ झाला तसेच वृक्ष लागवडही करण्यात आली. गावकऱ्यांनी यावेळी स्वच्छतेची शपथ घेतली. ग्रामसभेत सामाजिक उपक्रमांतर्गत वृद्धांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

# पारधी समाजाच्या सक्षमीकरणासाठी प्रशासन उतरले शेषनगर पारधी बेड्यावर

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ३० :



नागपूर ग्रामीण भागातील डेगमा खुर्द येथील शेषनगर पारधी बेड्यावर आयोजित विशेष समाधान शिबिराने आदिवासी पारधी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. छत्रपती शिवाजी महाराज अभियानांतर्गत राज्याचे महसूल व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार आणि जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी वंदना सौरंगपते आणि तहसीलदार सचिन कुमावत यांच्या नेतृत्वात हे शिबीर यशस्वीपणे पार पडले. या उपक्रमाने पारधी समाजाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवताना शासकीय योजनांचा थेट लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचवला.

या शिबिरात महसूल, कृषी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, भूमि अभिलेख, आरोग्य विभाग आणि प्रादेशिक परिवहन यासारख्या विविध विभागांनी एकत्र येऊन सेवा पुरवल्या. आधार कार्ड, जात प्रमाणपत्र, डोमिसाइल, रेशन कार्ड, मतदान कार्ड, उत्पन्न प्रमाणपत्र यांसारखी आवश्यक कागदपत्रे ३०० ग्रामस्थांना तात्काळ मिळाली. याशिवाय, शासकीय योजनांचे लाभही गावकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात आले. दुर्गम भागातील नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व सुविधा मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

शिबिराच्या यशासाठी हिंगणा तहसीलदार सचिन कुमावत, तालुका कृषी अधिकारी सरनाईक, नायब तहसीलदार सुजाता गावंडे, पुरवठा निरीक्षक रागिणी गायकवाड, मंडळ अधिकारी पी. एम. झिले, तलाठी संदीप नखाते, कृषी मंडळ अधिकारी संजय काळसर्पे यांच्यासह डेंगमा ग्रामपंचायतीच्या सरपंच विद्या महेंद्र गोरामन, उपसरपंच प्रवीण खाडे, माजी पंचायत समिती सभापती रुपाली खाडे, पारधी समाज संघटनेचे बबन गोरामन, पोलीस पाटील गीता पवार आणि सामाजिक कार्यकर्ते महेंद्र गोरामन, मंगल भोसले, अनिल पवार, माजी सरपंच अतिश पवार यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

या सर्वांच्या सहकार्याने शिबिराने सामाजिक समावेश आणि सक्षमीकरणाचा आदर्श निर्माण केला.

शिबिरादरम्यान कृषी विभागाने पारधी समाजातील आदर्श शेतकरी सुभाष भोसले, सुधाकर भोसले आणि रामगोपाल भोसले यांचा प्रशस्तीपत्र, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तहसीलदार सचिन कुमावत आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या शेतांना भेट देऊन आधुनिक शेतीच्या प्रयोगांची पाहणी केली.

सरपंच विद्या गोरामन यांनी अशा शिबिरांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावर तहसीलदार सचिन कुमावत यांनी, आदिवासी पारधी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी नागपूर जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. जिल्हा व तहसील प्रशासन तसेच ग्रामपंचायतीच्या सहकार्याने आयोजित या शिबिराने शासनाच्या समावेशक विकास धोरणाला बळकटी दिली.

# राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालयात स्व. रावबहाद्दूर डी. लक्ष्मीनारायण डे साजरा

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ३० :



येथील राणी इंदिराबाई भोसले महाविद्यालयामध्ये स्व. रावबहाद्दूर डी. लक्ष्मीनारायण डे भावपूर्ण व कृतज्ञतापूर्वक वातावरणात साजरा करण्यात आला.

डी. लक्ष्मीनारायण यांच्या पुज्य प्रतिमेला प्रथम माल्यार्पण करून व दिप प्रज्वलित करून सामुहिक अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन मांडेकर यांनी लक्ष्मीनारायण यांच्या विचार कार्य औदार्य तत्वशिलता उद्योगव्यवसायातील भव्यता दातृत्व या गुणविशेषाबद्दल ऊपस्थीतांना अवगत केले. त्यांची स्मृती कल्याणकारी डोळस व दुरदृष्टीच्या मानवी सहृदयी दातृत्वशिलतेचा ऊदात्त आदर्श आहे असेही यावेळी सांगितले.

महाविद्यालयातील डॉ.कटमुसरे, डॉ. लामखेडे, डॉ. चव्हाण, डॉ. केने, डॉ. झाडे , श्री घाटोळ, प्रा.पिसे, प्रा. सोमकुवर, राहुल बोरकर, मनिषा धवड ऊपस्थीत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गायत्री कुकडे यांनी केले.

प्रस्तुत कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. मिनाक्षी झाडे, दिनेश घाटोळ यांच्या संयोजनात रा.से.यो. विभागांतर्गत करण्यात आले. आयोजित कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी डॉ.करंभे, प्रा. खेडीकर यांचेसह विजय देशमुख, संजय टेकाम, टेकेश्वर देशमुख यांनी विशेष परीश्रम घेतले.

## धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त येणाऱ्या अनुयायाची उत्तम सुव्यवस्था करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३० :

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर देश विदेशातून लाखो अनुयायी येतात परंतु पावसामुळे दीक्षाभूमी परिसर अस्त व्यस्त झालेला आहे. त्यामुळे बाहेरगावरून येणाऱ्या अनुयायांची गैरसोय होऊ नये म्हणून उत्तम सुव्यवस्था करण्याकरिता भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाच्या वतीने नागपूर जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ.अनुप खांडे यांनी निवेदन स्वीकारले.

सदर निवेदन भारतीय जनता पार्टी अनुसूचीत जाती मोर्चाचे नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष सतीश डोंगरे यांच्या नेतृत्वात देण्यात आले यानिमित्त जिल्हा महामंत्री सुभाष गुजरकर, नागपूर ग्रामीण मंडळ अध्यक्ष सुरज पाटील, हुडकेश्वर मंडळ अध्यक्ष अरविंद नाईक, उपसरपंच ग्रामपंचायत कापसी (खुर्द) अक्षय रामटेके उपस्थित होते.

# भाजपा झोपडपट्टी आघाडीत घेतला प्रवेश



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

भारतीय जनता पक्ष झोपडपट्टी आघाडी मध्ये शहराचे अध्यक्ष नागेशजी सहारे तसेच महामंत्री संजय चावरे पालक दिलीप गौर माजी आमदार डॉ.मिलिंद माने यांच्या उपस्थितीत कळमना श्रीरामवाडी येथील लच्छू डेकाटे व मीनाक्षी बुरडे यांच्या नेतृत्वात दीडशे महिला पुरुषांच्या मोठ्या प्रमाणात प्रवेश घेण्यात आला.

त्यावेळी मान्यवर माजी नगरसेवक श्री शेषरावजी गोतमारे, महेश पाटील, सचिन खोब्रागडे, ओम ईश्वरकर, अमित सलामे यांनी स्वागत केले त्यावेळी महेश बुरडे पिंकी मारोडी, ज्योती पालेवार, पूनम बुंदे, ममता देशमुख ,शकीला कुरेशी, अनुसयाबाई केजकर, लिलाबाई खापेकर, लता शिंदे, दिपाली सोनवणे, मनीषा सोनटक्के, पुष्पा देशमुख, नीलिमा पवनीकर ,छाया सोनवणे, चंदा निखारे, दीपमाला, तारा वर्मा, लिलाबाई धकाते, कौसल्या धकाते,लक्ष्मी चव्हाण, बेबी पवनीकर,चंद्रकला निखारे,वंदना नीनावे, अनुसया केदारकर, ताराबाई हिरावून, सुमनबाई तिवारी, शोभा इंदोरकर, प्रभाकर नथू देशमुख, नंदू हेडाऊ, श्यामलाल रहांगडाले व इतर पदाधिकारी व नागरिक म्हणून उपस्थित होते.

## मोगली लँड मॅरेथॉनमध्ये सृष्टी सौंदर्यचे ५८ स्पर्धक सहभागी

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ३० :

मध्यप्रदेशातील पेंच अभयारण्य परिसरातील टुरिया गाव येथे सायरस्स मॅरॅथॉन संस्थेतर्फे आयोजित मोगली लँड मॅरेथॉन स्पर्धा २१ सप्टेंबर रोजी उत्साहात पार पडली. ५, १० आणि २१ किलोमीटर अंतराच्या या धावस्पर्धेत देशभरातून सुमारे ९०० धावपटूंनी सहभाग नोंदवला.

समर्थ हायस्कूल, रामटेकचे तब्बल २३५ स्पर्धक यामध्ये उतरले होते. त्याचबरोबर सृष्टी सौंदर्य बहुउद्देशीय संस्था, रामटेक चे पुरुष व महिला मिळून ५८ स्पर्धकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला. यावेळी दहा किलोमीटर स्पर्धेच्या १८ वर्षांखालील गटात अभंग किंमतकर यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. तर ३५ ते ४९ वर्षांच्या महिलांच्या गटात दहा किलोमीटर धावेत डॉ. मंजुषा सेलोकर यांनी तृतीय क्रमांक मिळवला. याशिवाय ५० वर्षांवरील गटातील २१ किलोमीटर स्पर्धेत ऋषिकेश किंमतकर यांनी तृतीय स्थान पटकावले. बक्षीस वितरण सोहळ्यात रवींद्र नारनवरे यांनी ग्रॅटिट्युड अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. निरोगी आयुष्य जगण्यासाठी मैदानी खेळांना प्राधान्य द्यावे, नियमित चालणे, योग व प्राणायामाचा अंगीकार करावा.

# सन्मान सौदामिनींचा कर्तृत्ववान लेकींची गौरवगाथा उपक्रम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :



महावितरण म्हणजे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रगतीची बीज पोहोचवणारी जीवनवाहिनी. आणि या जीवनवाहिनीला गतिमान ठेवण्याचे, अनेकदा अत्यंत खडतर परिस्थितीत आपले कर्तव्य निभावण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणारी आहे, कंपनीतील कर्मचारी महिला-याच त्या 'सौदामिनी'. त्यांच्या कार्याला विनम्र भावनिक सलाम करण्यासाठी महावितरणने 'सन्मान सौदामिनींचा' हा अतिशय हृदयस्पर्शी आणि प्रेरणादायी उपक्रम सुरू केला आहे.

सोमवारी (दि. 29), नागपूर येथील लघु प्रशिक्षण केंद्र, शहर मंडल येथे सकाळी सिव्हिल लाईन्स विभागांतर्गत कार्यरत असलेल्या सर्व महिला कर्मचाऱ्यांसाठी 'सन्मान सौदामिनींचा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला एकूण 59 महिला कर्मचाऱ्यांची उपस्थिती लक्षणीय होती, ज्यामुळे सभागृहात उत्साहाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले होते.

या सर्व सहभागी महिलांचा, त्यांच्या अथक परिश्रमांचा आणि निष्ठेचा सन्मान म्हणून, त्यांना कृतज्ञतापूर्वक गुलाबपुष्प आणि एक प्रेरणादायी पुस्तक देऊन गौरविण्यात आले.

गौरव समारंभानंतरचा क्षण अधिकच भावनिक आणि प्रेरणादायी होता. महावितरणमध्ये सेवा देत असताना आलेल्या अनुभवांचे कथन करण्यासाठी काही निवडक महिलांनी व्यासपीठ गाजवले, यात चार तांत्रिक कर्मचारी, एक उच्चस्तर लिपीक, एक सहायक लेखापाल, आणि एक उपकार्यकारी अभियंता या सर्व सात 'सौदामिनीं'नी महावितरणमध्ये काम करताना आलेल्या आव्हानें, मिळवलेले यश आणि संस्थेप्रती असलेले आपले अतूट समर्पण यावर अत्यंत मोकळेपणाने संवाद साधला.

त्यांच्या कहाण्या ऐकून डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्या. त्या फक्त त्यांच्या नोकरीतील अडचणी सांगत नव्हत्या, तर घरातील जबाबदाऱ्या आणि बाहेरील कर्तव्य यांचा समन्वय साधतानाचा त्यांचा रोजचा संघर्ष आणि त्या संघर्षातुन मिळालेला विजय त्यांनी मांडला. त्यांचा आवाज आत्मविश्वास, जिद्द आणि समाधानाची भावना व्यक्त करत होता.

# जेष्ठ नागरिकांना विनामूल्य देवी यात्रा

■ महासागर प्रतिनिधी,
इसासनी, दि. ३० :




जेष्ठ नागरिक हि समाजाची धरोवर आहे. त्यांचा त्याग व समर्पण हा एक सामाजिक ठेवा आहे.उतार वयात तेच जेष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात उपेक्षित राहतात यांच्या मध्ये एकोपा वाढवा व त्यांचे नैराश्य कमी व्हावे त्यांना नैसर्गिक अधिवासाचे सानिध्य प्राप्त व्हावें या उद्देशाने प्रेरित होवुन सामाजिक उत्तरदायित्व म्हणून युवा उद्योजक, सामाजिक कार्यकर्ते आशिष सिंह जनकवार यांनी जेष्ठ नागरिकांसाठी मोफत देवी दर्शन या स्तुत्य उपक्रमाचे आयोजन केले.

अनुसया माता संस्थान पारडसिंगा व परीसरातील तिर्थक्षेत्रांना भेटी दिल्या साधारण १७० जेष्ठ नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. या उपक्रमा करीता सुदर्शन बमनवार, गोपीचंद बांते, गजानन भोयर, कपिल डेकाटे, सुधीर रावत, अक्षय दिनेश काळे, अनिल नागोसे राजेश नारखेडे यांनी अथक परिश्रम घेतले.

## प्रतिधी शैक्षणिक शिष्यवृत्ती लाभार्थ्यांचा सत्कार




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

प्रतिधी या शैक्षणिक शिष्यवृत्ती कार्यक्रमात यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा ठाण्याचे आमदार संजय केळकर यांनी नुकताच ठाणे येथे सत्कार केला.

या उपक्रमाअंतर्गत देशभरातील 5,000 मुलांपर्यंत शिक्षणाची मदत पोहोचली आहे, ज्यात दिव्यांग मुलांचा समावेशही आहे.

शालेय शिक्षणात पुढे जाण्यासाठी आर्थिक सहाय्य आणि मार्गदर्शन मिळत असून, आतापर्यंत 7 शहरांतील 7,800 मुलांना हा उपक्रम लाभ झाला आहे. यावेळी अमेझॉन इंडियाच्या ऑपरेशन्स (पश्चिम) संचालक गीता उप्पल उपस्थित होत्या.

# स्वच्छता ही सेवा अंतर्गत स्वच्छता मोहीम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :




मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात स्वच्छता ही सेवा 2025 च्या चौदाव्या दिवशी, दिनांक 30 सप्टेंबर 2025 रोजी भव्य स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात आली. या मोहिमेत प्रशासकीय कार्यालये, रेल्वे शाळा, डेपो, शेड्स व कार्यशाळांमध्ये कर्मचाऱ्यांनी अनावश्यक वस्तू हटविणे, झाडलोट करणे तसेच स्वच्छता व निर्जंतुकीकरण यामध्ये सक्रिय सहभाग नोंदविला. स्थानक परिसरातील रेल्वे रुळ, प्लॅटफॉर्म, सक्युलेटिंग एरिया, प्रतीक्षालये व प्रवासी सुविधा यांची सखोल स्वच्छता करण्यात आली. गाड्यांमध्येही स्वच्छतेवर विशेष भर देत कचऱ्याचे योग्य संकलन व विल्हेवाट लावण्यात आले.

रेल्वे हद्दीतील नाले, तळी व साठवण क्षेत्र यांची गाळ काढून स्वच्छता करण्यात आली, जेणेकरून पाणी साचणे व डासांची उत्पत्ती होऊ नये. पर्यावरणीय शाश्वततेसाठी कचरा व प्लास्टिक काढून टाकण्यात आला.

# तिडके महाविद्यालयात जागतिक पर्यावरण आरोग्य दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. ३० :

रामटेक येथील श्री नरेंद्र तिडके महाविद्यालयात रासेयो विभागाचे दोन्ही युनिट आणि निसर्ग मंडळाच्या वतीने आज दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी जागतिक पर्यावरण आरोग्य दिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये व समाजामध्ये पर्यावरण व त्याचे मानवी जीवनातील महत्त्व याबाबत जनजागृती करण्यासाठी "प्लास्टीक निर्मूलन, एक पेड माँ के नाम" यांसारख्या उपक्रमांद्वारे महाविद्यालय परीसरामध्ये एन.एस.एस.च्या स्वयंसेवकातर्फे जनजागृती करण्यात आली. तत्पूर्वी " पर्यावरण व स्वच्छता यांचा अनुबंध " या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतिहास विभागाचे प्रमुख प्रा.सुभाष सेलोकार तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा.तुलसिदास बाघमारे तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ. स्वप्नील मनघे आणि डॉ. विवेक साहू मंचावर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष जाधव यांनी केले. आभार बी.ए.भाग-१ विद्यार्थिनी कु.सोनाली मोहनकर हीने मानले. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि एनसीसीचे विद्यार्थी उपस्थित होते.

# जीवनात पैसा गौण.. कर्तृत्व महत्वाचे : मेजर जनरल एस. के. विद्यार्थी

■ महासागर प्रतिनिधी,
काटोल, दि. ३० :

जीवनात पैसा गौण आहे तर कर्तृत्व महत्वाचे आहे. समाजात वावरतांना माज्या अंगात असलेल्या वदीला मान आहे. मी जर वदीर्ची मयार्दा पाळत नसेल तर मला समाजात स्थान राहणार नाही. म्हणून आजही सैनिकांबद्दल विश्वसनीयता कायम आहे, असा मोलाचा संदेश मेजर जनरल एस. के. विद्यार्थी यांनी दिला. बनारसीदास रुईया हायस्कूल येथे माजी सैनिक संघटना व बनारसीदास रुईया हायस्कूल कमेटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात एन.डी.ए.बद्दल माहिती देतांना उद्गारले.




यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा बनारसीदास रुईया हायस्कूल कमेटीचे अध्यक्ष डॉ. दिलीप चांडक, प्रमुख मार्गदर्शक मेजर जनरल एस. के. विद्यार्थी, कर्नल व्हेटरन्स नवनीत दुग्गल, यांच्यासह प्रमुख अतिथी काटोलचे उपविभागीय पोलीस अधिकारी बापू रोहम, वायुसेनेचे ग्रुप कॅप्टन भूषण महाजन, ब. रु. हायस्कूलच्या मुख्याध्यापिका वंदना काळे, ब. रु. कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका अरूणा पवार, ब. रु. हायस्कूलचे उपमुख्याध्यापक हेमंत चोपडे, पर्यवेक्षक हिरामण सोमकुवर, पर्यवेक्षिका रेखा जोगेकर यांची उपस्थिती होती.

यावेळी माजी सैनिक संघटनेकडून डॉ. दिलीप चांडक, तेजसिंग जगदाळे व धीरज ढोले यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच मेजर शेखर पाटील यांचा भूमिअभिलेख कार्यालयातून सेवानिवृत्त झाल्याबद्दल सपत्नीक सत्कार करण्यात आला. वीरमाता मीराबाई सतई व विरपत्नी टीना टाले यांनाही सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेजर रत्नाकर ठाकरे व अरुणा पवार, सूत्रसंचालन अजय खडसे तर आभार विजय चौधरी यांनी मानले. लीना सावरकर यांनी आपल्या मधुर आवाजात 'हम होंगे कामयाब' व 'ए मेरे वतन के लोगों' हे गीत सादर केले. त्यांना भास्कर सिरसाट यांनी तबल्यावर आणि कृष्णा सावरकर यांनी हार्मोनियमवर साथ दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेजर अशोक राऊत, अनिल भिगारे, मधुकर काळबांडे, निलेश व्यास, दिलीप जैस्वाल, विजय मूल्लेवार, संदीप काळे, पुरुषोत्तम जोगेकर यांच्यासह अमर ज्योती संघटना नागपूर, काटोल-नरखेड माजी सैनिक संघटना आणि वरूड माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी तसेच ब. रू. हायस्कूल व कॉन्व्हेंटच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

# अतिक्रमण कारवाईत नगरपालिका प्रशासनाचा दुजाभाव

■ स्वप्निल राऊत, काटोल, दि. ३० :

ग्राहकांना दुकान दिसावे याकरिता दुकानदार दुकानाच्या समोरच छोटे फलक ठेवतात. फलक हे वाहतुकीस अडथळा निर्माण होतील त्यामुळे नगरपालिका प्रशासनाकडून फलकावर जप्तीची कारवाई करतात. शहरात शुक्रवारपासून नगरपालिकेकडून दुकानाच्या समोर असलेल्या फलक उचलण्याची मोहीम सुरू केली आहे. पालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून संयुक्तपणे सुरू असलेल्या सदर कारवाईत 'काहींना' जाणीवपूर्वक अभय देण्यात आल्याचे दिसल्याने या कारवाई विरोधात नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

25 सप्टेंबर रोजी नगर पालिका प्रशासनाने नागपूर मार्गावरील बस स्थानक पासून उड्डाणपूलापर्यंत काही दुकानांचे फलक उचलण्यात आले तर काही दुकानदारांना अभय देण्यात आले. पालिकेचे वाहन दुकानासमोर येऊन पोहोचले. दुकानदारांना कोणतीही पूर्वसूचना न देता. मनमानी पद्धतीने प्रशासन कारवाई करत असल्याने नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला. तसेच काहींच्या अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत असल्याबाबतही नागरीकांनी अधिकाऱ्यांसमोर नाराजी व्यक्त केली जात आहे.

स्थानिक दुकानदारांच्या फलकावर अतिक्रमण कारवाई करायची आणि बाहेरून येणाऱ्या परप्रांतीय लोकांना पाणीपुरीचा व्यवसायासाठी जागा उपलब्ध करून द्यावी. शहरातील काही राजकारणी आपल्या घरासमोर किंवा दुकानासमोर पाणीपुरी चहा नास्ताच्या व्यवसायाकरिता जागा उपलब्ध करून त्यांच्याकडून थेट चार ते पाच हजार रुपये प्रति महिना वसूल केले जात असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आले. या अतिक्रमणावर सुद्धा पालिका प्रशासनाकडून कारवाई करण्यात यावी.

असा सवाल नागरिक करीत आहे.



काटोल नगर पालिकेची दुटप्पी भूमिका

आम्हाला कुठलीही पूर्वसूचना न देता आमचे बोर्ड जप्त केले. परंतु काही दुकानासमोर बोर्ड तसेच ठेवले. अतिक्रमणच्या नावावर हा पालिका प्रशासनाचा मनमानी कारभार आहे.

कारवाई करायची असेल तर मग दुकानाच्या बोर्डवरच का पाणीपुरीवाल्यांचे ठेले सुद्धा फुटपाथवर असते. त्यांच्यावर का कारवाई करण्यात आली नाही.

**राजेश वाघमारे व्यवसायिक**

---

रस्त्याच्या मधोमध असलेला मोकाट जनावराचा कळप- येणाऱ्या जाणाऱ्यांना प्रचंड याचा त्रास सहन करावा लागतो. पालिका प्रशासनाला वारंवार सूचना करूनही जाग येत नाही.

---

**दिनेश मोरोलीया, नागरिक**

पालिकेच्या वतीने व्यावसायिकांना कुठलीही पूर्वसूचना न देता करण्यात आलेली अतिक्रमणाची कारवाई ही संयुक्तिक नसून याविरोधात आम्ही व्यावसायिकांच्या वतीने आवाज उचलू..

**दिनेश निंबाळकर**
**काटोल विधानसभा प्रमुख,**
**प्रहार जनशक्ती पक्ष**

---

नवरात्र आटोपल्यानंतर शहरातील मेन रोडवरील तसेच बाजारातील अतिक्रमण हटवण्यात येईल.

**धनंजय बोरीकर**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद काटोल**

# अतीवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पन्नास हजाराची मदत करा



■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. ३० :

अतीवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पन्नास हजाराची रुपयाची आर्थीक मदत जाहीर करावी असे बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने रामटेक तहसीलदार रमेश कोळपे यांच्या मार्फत राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कृषीमंत्री पालकमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

अतिवृष्टीमुळे शेतक-यांचे आतोनात नुकसान झालेले आहे. तरी वरुण राजा बरसत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी साचल्याने हाती आलेले पिकांचे नुकसान झालेले आहे. यामुळे शेतकरी मेटाकुटीस आला असून शेतकऱ्यांना आत्महत्या करण्याची वेळ येत आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या बियाण्याची रक्कम देखील निघाली नाही, अनेक शेतकऱ्यांनी व्याजाने पैसे काढून शेतामध्ये सोयाबीन, मक्का, कापूस, तूर, बाजरा, धान, उस या सारख्या पिकांची खुप मोठी नासाडी झाली आहे. या शेतकऱ्यांचा तहसीलदार व मंडळअधिकारी, तलाठी यांच्यामार्फत पंचनामे करून तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करुण शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी रु. ५० हजार रूपयांची आर्थिक मदत जाहीर करावी, यामुळे शेतकऱ्यांना आधार होईल व तो आपले जीवन संपवण्यापासून वाचू शकेल. वरील मागणी एक आठवड्यात न झाल्यास बी.आर.एस.पी. राज्यभर तीव्र आंदोलन करेल अशे निवेदन देण्यात आले. यावेळी बा आर एस पी चे कृपासागर भोवते, ओमकार खोब्रागडे, राजकुमार अडकने, दिनेश मुन, रामकृष्णाजी नवघरे ,जयभिम देशभ्रतार, वेनुधर भिमटे,दामोधर कडबे, रवि मेश्राम प्रो.मोटघरे सह आदी प्रामुख्याने उपस्थीत होते.

# स्व. बळीराम दखणे यांची १०५ वी जयंती उत्साहात साजरी

■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ३० :



शिक्षण विकास मंडळ रामटेक द्वारा संचालित विकास प्राथमिक शाळा, कन्हान व बळीरामजी दखणे हायस्कूल कन्हानचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय बळीरामजी दखणे यांची १०५ व्या जयंती निमित्ताने विद्यार्थ्यांकडून निरनिराळे विरांगणा यांचे वेशभूषा करून घेण्यात आले.

विद्यार्थ्यांनी जिजाऊ सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, झाशीची राणी, लक्ष्मीबाई अशा निरनिराळ्या वेशभूषा केली होती. प्रथम स्वर्गीय दखने यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी ज्या भूमिकेच्या वेशभूषा केलेल्या होत्या त्या भूमिकेतील पात्राविषयी आपल्या भाषणातून माहिती दिली.

याप्रसंगी वर्ग तिसरीच्या विद्यार्थिनी श्रेया चकोले हिचे जिजाऊचे वेशभूषा व भाषण उत्कृष्ट राहिले उपस्थित सर्व पालकांनी प्रमुख पाहुण्यांनी तयार होऊन आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष दखणे हायस्कूलचे मुख्याध्यापक सचिन अल्लेडवार, प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले यतीन कुमार पशिने, प्रायमरीचे मुख्याध्यापक राजेंद्र खंडाईत, दखणे हायस्कूलचे पालक सभेचे सचिव गुंडेराव चकोले प्रामुख्याने उपस्थित होते . मान्यवरांनी स्वर्गीय बळीरामजी दखणे उर्फ काकाजी यांच्या जीवन चरित्र विषयी विस्तृत अशी माहिती दिली. कार्यक्रमातील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या भाषणाबद्दल व वेशभूषा बदल त्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन भाग्यश्री नखाते तसेच आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर बांबल यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता विकास प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षक तसेच दखणे हायस्कूल मधील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांना शेंगदाणा पापडी व चॉकलेट वाटून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# नवरात्रोत्सव निमित्त आरोग्याविषयी चेतना जागृती कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर, दि. ३० :

न्यू नंदनवन, नागपूर येथे दिनांक 25 सप्टेंबर 2025 गुरुवार रोजी विमेंन्स कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स मधील महिला सुरक्षा व सक्षमीकरण अंतर्गत 'व्ही' टीम एज्युकेशन सिस्टीम मिशन (हेल्दी इंडिया) यांच्या वतीने विद्यार्थिनींना गर्भाशय व स्तन कॅन्सर आणि मासिक पाळीवेळी महिलांनी आरोग्याबाबत जागृत राहण्याकरिता आवाहन केले. याविषयीचे मार्गदर्शन हेल्थ कन्सल्टंट आकाश दांडेलेव हेमा धकाते मॅडम यांनी केले.



मार्गदर्शनामध्ये पीसीओडी, पीसीओएस , गर्भाशय कॅन्सर, अश्या विविध आजाराविषयी विद्यार्थिनींना माहिती दिली. आरोग्याकरिता उत्तम आहार घ्यावा तसेच शरीराला आवश्यक असणाऱ्या पाण्याचे महत्त्व सांगितले. महिलांचे स्वास्थ चांगले राहिले तरच घरची व पर्यायी देशाची प्रगती होईल. तसेच मासिक पाळी दरम्यान कोणती काळजी घ्यायला पाहिजे? कोणते पॅड वापरायला पाहिजे? स्वतःची आरोग्य स्वच्छता कशी करायला पाहिजे? आपल्या शरीराला पोषक आहार कोणते? असे प्रश्नोत्तराच्या स्वरूपात विद्यार्थिनींना बोलते करून चेतना जागृत केल्या.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद गुल्हाने यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या तर कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. विजया राऊत यांनी केले. कार्यक्रमाला प्रा.डॉ.दिपाली भावे, डॉ. रंजना व्यवहारे, प्रा. अलका ब्राह्मणकर, प्रा. छाया कोटांगणे व प्रा. विशाल सोरते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. अमिता तलमले आणि आभार प्रा.स्नेहल महल्ले यांनी मानले.

## प्रहारच्या विद्यार्थिनीने गाठली राष्ट्रीय हॅंडबाल स्पर्धा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

हॅंडबाल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र तर्फे आयोजित सब-ज्युनियर हॅंडबाल स्पर्धा चाचणी घेण्यात आली होती. त्यामध्ये सी.पी.अँड बेरार एज्युकेशन सोसायटी संचालित प्रहार मिलिटरी स्कूल, रविनगर ची विद्यार्थिनी मनस्विनी हरडे हिची निवड सब-ज्युनियर गर्ल्स महाराष्ट्र टीम मध्ये झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना कुळकर्णी व हॅंडबॉल चे प्रशिक्षक ओमप्रकाश शाहू तसेच शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांनी मनस्वीनी ला शुभेच्छा दिल्या आणि पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन दिले.

# चार किंवा पाच रेल्वे लाईन होतील, पण...

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. ३० :

चार किंवा पाच रेल्वे लाईन होईल पण नरखेड प्रवाशांसाठी काय फायदा? 2019 कोरोना काळापासून नरखेड जंक्शन या शहराच्या रेल्वे चे थांबे बंद करण्यात आले आहे. नरखेड वासियांनी फार मेहनत करून फक्त गोंडवाना एक्सप्रेस या गाडीला थांबवलं आहे. नागपूर जंक्शन ते आमला जंक्शन च्या मध्ये येणारे जंक्शन गाव फक्त नरखेड आहेत.

तरी या शहरात गाड्यांचा थांबा का नाही? कोरोना काळाच्या आधी नरखेड जंक्शन ला थांबणाऱ्या रेल्वे गाड्या - चेन्नई - नवी दिल्ली ग्रँड ट्रंक एक्सप्रेस, हैदराबाद -हजरत निजामुद्दीन दक्षिण एक्सप्रेस, रायगड-हजरत निजामुद्दीन व भुसावळ-हझरत निजामुद्दीन गोंडवाना एक्सप्रेस, कोल्हापूर- धनबाद दीक्षाभूमी एक्सप्रेस, रायपूर -अमृतसर छत्तीसगढ एक्सप्रेस, चेन्नई-इंदौर जयपूर एक्सप्रेस, नागपूर - खंडवा दादाधाम एक्सप्रेस, विशाखापट्टणम-दानापूर दानापूर एक्सप्रेस, नागपूर-डॉ. आंबेडकर डॉ. आंबेडकर एक्सप्रेस अमरावती- जबलपूर जबलपूर एक्सप्रेस आणि नागपूर-आमला मेमू पॅसेंजर. या सर्व गाड्यांचा नरखेड जंक्शन ला थांबा होता. परंतु कोरोना काळापासून या सर्व गाड्या रद्द करण्यात आल्या होत्या. फक्त नागपूर - आमला मेमू पॅसेंजर ही गाडी चालू होती.



नरखेड, प्रवाशांसासाठी काय फायदा?

मात्र 2 वर्षा नंतर रायगड व भुसाव नवी दिल्ली गोंडवाना एक्सप्रेस या गाडीचा नरखेडला थांबा मिळाला. परंतु 2 वर्षापर्यंत नरखेड वासियांना हा त्रास सहन करावा लागला. आणि 5 वर्षा नंतर चेन्नई-नवी दिल्ली ग्रँड ट्रंक एक्सप्रेस, कोल्हापूर- धनबाद दीक्षाभूमी, अमरावती-जबलपूर जबलपूर एक्सप्रेस, रायपूर -अमृतसर छत्तीसगढ एक्सप्रेस. या गाड्यांना नरखेड जंक्शन येथील थांबा मिळाला. परंतु हैदराबाद - हजरत निजामुद्दीन दक्षिण एक्सप्रेस, चेन्नई- जयपूर जयपूर एक्सप्रेस, नागपूर- खंडवा दादाधाम एक्सप्रेस, विशाखापट्टणम दानापूर दानापूर एक्सप्रेस, आदी या गाड्यांना अजून पर्यंत थांबा मिळाला नाही.

नरखेड वासियांनी या सर्व गाड्या थांबवायला खूप प्रयत्न केला परंतु गाड्या आजुन पर्यंत थांबविल्या नाहीत. तरी ज्या कोरोना काळाच्या आधी नरखेड जंक्शन ला थांबणाऱ्या गाड्या होत्या, त्या सर्व गाड्यांचा नरखेड जंक्शन ला रेल्वे प्रशासनाने थांबा दिला पाहिजे. जेणेकरून नरखेड वासियांना त्रास होणार नाहीत. या सर्व रेल्वे गाड्यांचा थांबा नरखेड जंक्शन ला मिळाला पाहिजे.

# राजीव नगर रहिवाशांना मालकी भाडेपट्टे द्या



■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ३० :

अर्जुन वर्मा यांच्या नेतृत्वाखाली, राजीव नगर रहिवाशांनी वानाडोंगरी नगरपालिकेतील राजीव नगर रहिवाशांसाठी मालकी भाडेपट्टे देण्याची विनंती मुख्यमंत्री, पालकमंत्री, हिंगणाचे आमदार, तहसीलदार आणि मुख्याधिकारी यांना सादर केली आहे.

राजीव नगर येथील एका शिष्टमंडळाने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि आ. समीर मेघे यांची भेट घेऊन या विषयावर चर्चा केली. राजीव नगरमधील गरीब आणि मजूर अनेक वर्षांपासून या परिसरात राहत आहेत. आ.मेघे यांनी वानाडोंगरी परिसरातील इतर विभागांमध्येही भाडेपट्टे वाटप केले आहेत. नागपूरमधील चुना भट्टी परिसरातही भाडेपट्टे वाटप करण्यात आले आहेत.

राजीव नगर रहिवाशांना पट्टे मिळावेत यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन आ. समीर मेघे यांनी दिले आहे. निवेदन देणाऱ्यांमध्ये अर्जुन वर्मा, ज्योती पारस्कर, माया चौधरी, दयानिधी गोंड, सुधाकर कठोने, मालतीदेवी शाहू, रमावती विश्वकर्मा, विशाल प्रसाद गौड, भागीरथी काठोने, मुन्नी पंडित, कौसल्या शाह, कुसुमदेवी महतो, मंगला कानेरकर, रिना सिंह,राजेश पटेल, सुकेशिनी मेश्राम, उद्धव काठोने, सुशीला मेश्राम, कुबरा खान, रेखा वर्मा, मधु वर्मा, रेणुका थापा आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# नवरात्री निमित्त महिलांचा सत्कार




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

नागपूर महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती अध्यक्ष व प्रभाग क्रमांक २८ चे माजी नगरसेवक पिंटू झलके यांच्या वतीने नवरात्रीच्या पावन पर्वावर दरवर्षी प्रमाणे यंदाही विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या ११ महिला भगिनींचा दररोज सन्मान करण्यात आला. या उपक्रमा अंतर्गत सतत ९ दिवस दररोज ११ महिला या प्रमाणे ९९ महिलांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये शिक्षिका, परिचारिका, डॉक्टर, एडवोकेट,कॉर्पोरेट क्षेत्रातील महिला, महानगरपालिकेतील महिला अशा विविध कार्यकर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला.

# अजनी परिसरातील ४ गुंड तडीपार

**नागपूर :** परिमंडळ क्र. ४ च्या पोलिस उपायुक्तांनी अजनी परिसरातील ४ गुंडांना एकाच दिवशी दोन वर्षांसाठी जिल्ह्यातून तडीपार केले आहे. शुभम उर्फ प्रतिक हंसराज फुलझेले (२४), शिवम उर्फ शुभम सुभाष चौधरी (३०), रितेश उर्फ मोंटू रमेश सोनकुसरे (२६) आणि सूरज दिलीप सोनटक्के (३०) अशी तडीपार केलेल्या आरोपींची नावे आहेत. चारही आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्याविरुद्ध गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. सणासुदीत त्यांच्यापासून परिसरातील शांतता व कायदा सुव्यवस्थेला धोका असल्याने अजनीच्या ठाणेदारांनी त्यांचा तडीपारीचा प्रस्ताव पोलिस उपायुक्तांकडे पाठवला.

# वेस्टर्न कोलफिल्ड्सकडुन राजभाषा हिंदी पंधरवड्याच्या समारोप




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :

वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने आयोजित केलेल्या राजभाषा हिंदी पंधरवड्याच्या समारोपाच्या दिवशी झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात प्रमुख पाहुणे अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक जय प्रकाश द्विवेदी, विशेष पाहुणे संचालक तांत्रिक (संचालन/प्रकल्प आणि नियोजन) आनंदजी प्रसाद, संचालक (मानव संसाधन) डॉ. हेमंत शरद पांडे, मुख्य दक्षता अधिकारी अजय मधुकर म्हेत्रे आणि महाव्यवस्थापक (मानव संसाधन/प्रकल्प) आणि विभाग प्रमुख (अधिकृत भाषा) पी. नरेंद्र कुमार यांच्या उपस्थितीत डॉ. प्रवीण दाबली यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# गुमगाव येथे नावीण्यपुर्ण अंगणवाडीचे भुमिपूजन

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. ३० :

बीटीजी फाउंडेशन अर्थसहाय्यित नावीन्यपूर्ण अंगणवाडी केंद्र गुमगाव क्रं. २०० येथील अंगणवाडीचे भूमिपूजन(२४) करण्यात आले. कार्यक्रमाला बीटीजी फाउंडेशन चे फाउंडर नीता गुप्ता, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कैलाश घोडके, गटविकास अधिकारी संदीप गोडशलवार,सरपंच अरुण देवतळे, उपसरपंच तेजराम ढवळे, सहाय्यक गटविकास अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी सुशांत गाडेवार, गटशिक्षणाधिकारी ज्योत्स्ना हरडे, एनएल सी ऑर्गनायझेशनचे आचल अरोरा, आचल अग्रवाल,विनायक आष्टणकर, बीटीजीचे शिवराज व त्यांची चमू, अंगणवाडी पर्यवेक्षिका व अंगणवाडी सेविका, गावातील नागरिक, महिला फार मोठ्या संख्येने उपस्थित होते. अंदाजे २० लाख रुपए निधी खर्च करून अद्यावत व सर्व सुविधा युक्त अंगणवाडीची आकर्षक इमारतीची निर्मिती करण्यात येणार आहे. पोषण महाअंतर्गत अंगणवाडी सेविका यांनी तयार केलेल्या पोषण प्रदर्शनीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# ऐतिहासीक श्री भिमादेवी देवस्थान

माता भिमादेवी येथील ग्रामदैवत असून लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. माता भिमादेवी मंदिर प्राचीन असून देवी संदर्भात अनेक कथा प्रचिलीत आहे. पूर्वी भिमादेवी मंदिराच्या सभोवताल मातीचे दिवे लावून, पारंपरिक पद्धतीने नवरात्रोत्सव उत्सव साजरा करीत असत. सुमारे ६८ वर्षापुर्वी १९५७ ला काही उत्साही तरुणांनी नानालाल भाई उन्नरकर यांच्या पुढाकारातून श्री भिमादेवी नवयुवक मंडळांची स्थापना केली.



मंडळाच्या माध्यमातून नवरात्री उत्सव जत्रेच्या स्वरूपात प्रारंभ होण्यास सुरवात झाली. दरवर्षी धार्मिक उत्साहा व्यक्तिरिक्त विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमा व्यतिरिक्त नकला गोंधळ, भारूड आर्केस्टा आदि कार्यक्रमाची मेजवाणी रसिकांना मिळायची. १९९४ पासून ते २००० पर्यंत श्री विजय लांजेवार यांच्या पुढाकारात नवरात्री उत्सवात विनोदी एकांकीका स्पर्धेचे आयोजन मंडळाच्या लौकिकेत भर पाडणारे होते. भिमादेवी मंदिर देवस्थाचे अधिपत्य येथील मालगुजार श्रीमंत राजे गुजर यांच्याकडे होते. १९८५ पासून ते मंडळाकडे आहे.

या श्री भिमादेवी मंदिराचे बांधकाम व श्रमदान लोक वर्गणीतून करण्यात आले. मंदिरा समोरील भव्य रंगमंच, सामाजिक भवन, भक्त निवास, भोजन कक्ष, अखंड ज्योत कक्ष, टिनाचे भव्य शेड भाविकांच्या सुविधेकरीता उभारण्यात आले आहे. दोन कोटी रुपयाच्या शासकीय निधीतून मंदिराचे जिर्णोधार होत आहे. यावर्षी नवरात्रोत्सवात दि. २२ सप्टेबरला कलश घटस्थापना व अखंड ज्योत पुजारी जिंतू पांडे व मंडळांचे अध्यक्ष गोविंद गुप्ता, बंडु उरकुडकर, मधुकर देव्हारे, मनोहर बोरकर, बंटीजी गुप्ता व इतर सदस्यांच्या उपस्थित स्थापना करण्यात आली. तसेच दोन दिवस शालेय नृत्य स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यात शालेय विद्यार्थ्यांच्या चमुने हिरारीने सहभाग नोंदविला. तसेच रास गरबा मध्ये युवतिंनी सहभाग घेवून कार्यक्रमात नवचैतन्य निर्माण झाले. दररोज होणाऱ्या महाआरतीने भक्तीमय वातावरण निर्माण झाले.

या महाआरतीत माजी आमदार सुधीर पारवे, माजी आमदार राजु पारवे यांनी सहपत्नीक उपस्थिती दर्शवली. तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनीही माँ भिमादेवी चे दर्शन घेतले.

अष्टमीला भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला असून विजया दशमीला श्रीराम रथ यात्रा, रावण दहन व भव्य फटाका शो चे आयोजन करण्यात आले आहे. यात मंडळांच्या सर्व सदस्य व नागरीकांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.



वार्तापत्र
राजेश जांभुळे, भिवापूर

# भाजपाचे कार्य म्हणजे संघटित लोकशाहीचे उत्कृष्ट उदाहरण

## स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये प्रयत्नांची पराकाष्ठा करा : चंद्रशेखर बावनकुळे



■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. ३० :

भारतीय जनता पार्टी पक्ष हा देशातील एकमेव पक्ष आहे जो संघटन लोकशाहीला घेऊन व धरून चालतो. बुथ, शक्ती केंद्र प्रमुख, मंडल, प्रदेश ते राष्ट्रीय स्तरावर पक्षाची रचना मजबूत आहे. प्रत्येक कार्यकर्त्याला वेळोवेळी पदाची जबाबदारी दिली जाते. हे पद सन्मानाचे असून, त्या जबाबदारीचे कार्यकर्त्यांनी न्यायाने पालन करणे आवश्यक आहे, म्हणून भाजपाचे कार्य म्हणजे संघटीत लोकशाहीचे उत्कृष्ट उदाहरण ठरत असल्याचे मत राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मौदा येथे आयोजित कार्यकर्ता संवाद मेळाव्यात केले.

कामठी विधानसभा मतदारसंघातील मौदा नगरपंचायत येथे आयोजित कार्यकर्ता मेळावा महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडला, यावेळी माजी आ. सुधाकर कोहळे, माजी आमदार टेकचंद सावरकर, भाजप जिल्हा अध्यक्ष आनंद राऊत, जिल्हा महामंत्री अनिल निधान, मौदा तालुका अध्यक्ष मुकेश अग्रवाल, शहर अध्यक्ष मोरेश्वर सोरते, युवा मोर्चा अध्यक्ष चेतन खडसे, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा निशा सावरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य राधा अग्रवाल, भारती सोमनाथे, चांगो तिजारे, नरेश मोटघरे, रामेश्वर लिचडे, डॉ. नीलिमा घाटोळे, विमल पोटभरे, राजू सोमनाथे, रमेश कुंभलकर, मुन्ना चलसानी, प्रकाश कुहीकर, देवराव करडभाजने, दीपक मानकर, मनीराम यादव, शरद भोयर, अन्नू शर्मा, वर्षा मरघडे, निळकंठ भोयर, सुनीता पराशर, राहुल पोटभरे, राहुल हटवार, चंद्रशेखर जाधव, शिव वैद्य, यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बावनकुळे पुढे म्हणाले, विधानसभा निवडणुकीत मतदारांनी दिलेली मते ही कर्ज म्हणून स्वीकारली आहेत. त्यामुळे पाच वर्षे विकासकामांच्या माध्यमातून हे कर्ज फेडायचे आहे. आमचे सरकार लोक कल्याणकारी आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जीवनाश्यक वस्तूंवरील कर २८ टक्क्यांवरून पाच टक्क्यांवर आणला.

त्यामुळे आता सर्वसामान्यांचे जीवन सुकर होणार आहे. भाजपाला दिलेले मत सत्कारणी लागल्याचा प्रत्यय साऱ्यांना येत आहे. जी वचने आम्ही विधानसभा निवडणुकीत दिली होती, ती पूर्ण करणार आहोत. घर नसलेल्यांना पंतप्रधान आवास योजनेतून घरे दिली जाणार आहेत. लाडकी बहीण योजना बंद केली जाणार नाही, शेतकऱ्यांना दिवसा आठ तास वीज आणि कर्जमाफी करण्याचा शब्द आम्ही पाळणार आहेत.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपाला बहुमताने विजयी करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करा. या भागासाठी विकास निधी आणण्याची जबाबदारी माझी आहे. आपला नगराध्यक्ष निवडून आला, तर योग्य पद्धतीने विकासकामे होतील.

निवडणूक हरल्यानंतर आरोप करण्याची कॉंग्रेस नेत्यांची जुनीच परंपरा आहे. हिंमत असेल तर स्थानिक कॉंग्रेस नेत्यांनी निवडणूक लढवावी. भाजपाचे उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास व्यक्त करीत जोमाने कामाला लागण्याचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

# डिजिटल अरेस्टची धमकी देऊन २१ लाख उकळले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :

डिजिटल अरेस्ट करण्याची धमकी देऊन सायबर गुन्हेगार वृद्ध नागरिकांना चुना लावत आहे. स्टील अथॉरिटी ऑफ इंडियातून सेवानिवृत्त अधिकाऱ्यालाही अशाच प्रकारे २१ लाखांचा चुना लावण्यात आल्याचे प्रकरण पुढे आले आहे. पोलिसांनी ७० वर्षीय पीडित अधिकाऱ्याच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित व्यक्ती अधीक्षक पदावर कार्यरत होते. गत ९ ऑगस्ट रोजी घरी असताना त्यांच्या व्हॉट्सॲपवर ९७६६७४४६५ क्रमांकावरून व्हीडिओ कॉल आला. फोन करणाऱ्याने कुलाबा पोलिस ठाण्याचा अधिकारी संदीप रॉय बोलत असल्याची माहिती दिली. टेरर फंडिंगमध्ये त्यांच्या खात्यातून व्यवहार झाला आहे. कॅनरा बँकेतील त्यांच्या खात्यातून ही रक्कम पाठविण्यात आल्याची माहिती दिली. पीडित अधिकाऱ्याने असा कोणताही व्यवहार झाला नसल्याची माहिती दिली. आरोपीने त्यांना आधार, पॅन कार्ड आणि संपत्तीशी संबंधित कागदपत्र काढून ठेवा, लंच ब्रेकनंतर पुन्हा कॉल करतो असे सांगितले. त्यानंतर त्यांच्या व्हॉट्सॲपवर एनआयए आणि मुंबई पोलिसांच्या लोगोसह काही कागदपत्र पाठविण्यात आले. त्यात टेरर फंडिंग करणाऱ्या लोकांची नावे होती. पीडित अधिकाऱ्याचे नावही त्या यादीत होते. त्यांच्याविरुद्ध यूपीए ॲक्ट आणि मनी लॉन्ड्रिंगचा गुन्हे नोंदवून डिजिटल अरेस्ट झाल्याची धमकी देण्यात आली. तसेच महाराष्ट्राच्या वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्याच्या कार्यालयात नेऊन बोलणे करून देण्याचे सांगण्यात आले. आरोपींना त्यांचे डेबिट कार्ड आणि खात्याचीही माहिती होती. सर्व संपत्तीची माहिती घेण्यात आली. त्यानंतर त्यांना धमकावून खात्यांमध्ये २१ लाख रुपये जमा करण्यास सांगण्यात आले. ही रक्कम आरबीआयच्या चौकशीनंतर परत करण्याची बतावणी केली.

# पतीला जिवे मारण्याचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

कौटुंबिक वाद विकोपाला गेल्यानंतर संतापलेल्या पत्नीने पतीच्या डोक्यावर दारूची बाटली फोडून रक्तबंबाळ केले. ही थरार घटना सोमवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास अंबाझरी ठाण्यांतर्गत पांढराबोडीच्या जयनगर परिसरात घडली. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली. या प्रकरणी पोलिसांनी आरती शाहू (३४) रा. पांढराबोडी यांच्या तक्रारीवरून आरोपी पत्नी प्रज्ञा शगारे (२८) विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. जखमी पती रोशन शगारे (३२) याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

रोशन आणि प्रज्ञा यांच्या विवाहाला साडेतीन वर्ष झाली. त्यांना मुलबाळ नाही. रोशन हा खाजगी काम करतो. त्यांच्यात अधून मधून खटके उडायचे. सोमवारी दुपारी रोशन घरी होता. कौटुंबिक कारणावरून त्यांच्यात वाद झाला. वाद विकोपाला जाताच प्रज्ञाने घरी ठेवलेली दारूची बाटली रोशनच्या डोक्यावर आदळली. रोशन रक्तबंबाळ होऊन खाली कोसळला. पाहता पाहता परिसरातील लोकांची गर्दी वाढत गेली.

# पथ विक्रेत्यांसाठी लोक कल्याण मेळावा २ ऑक्टोबर पर्यंत

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजनेला मार्च २०३० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून, या योजनेत पथविक्रेत्यांसाठी कर्जाच्या टप्प्यांमध्ये मोठी वाढ करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व राष्ट्रीयकृत बँकांमध्ये, तसेच विशेषतः स्टेट बँक ऑफ इंडियाच्या विविध शाखांमध्ये १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत 'लोक कल्याण मेळावा' आयोजित करण्यात येत आहे. या शिबिरामध्ये पथविक्रेत्यांना कर्ज वाटप, डिजिटल ऑनबोर्डिंगची सुविधा, तसेच पीएम सुरक्षा विमा योजना व पीएम जीवन ज्योती विमा योजना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

पीएम स्वनिधी योजनेच्या पुर्नरचनेनंतर कर्जाची मर्यादा वाढवण्यात आली आहे त्यानुसार, प्रथम टप्पाः १०,००० रुपये ऐवजी १५,००० रुपये, द्वितीय टप्पाः २०,००० रुपये, ऐवजी २५,००० रुपये, तृतीय टप्पाः ५०,००० रुपये करण्यात आली आहे. या वाढलेल्या कर्जासाठी नागपूर महानगरपालिका क्षेत्रात प्रथम टप्प्याकरिता २५३२, द्वितीय टप्प्याकरिता १०८५२ आणि तृतीय टप्प्याकरिता २००६ पथविक्रेत्यांनी अर्ज सादर केले आहेत.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी सर्व पथविक्रेत्यांना आवाहन केले आहे की, ज्यांनी अद्याप पीएम स्वनिधी योजनेचा लाभ घेतलेला नाही, त्यांनी या शिबिराला भेट देऊन योजनेचा लाभ घ्यावा. ज्या पथविक्रेत्यांचे सामाजिक व आर्थिक प्रोफाईलिंग सर्वेक्षण पूर्ण झाले नाही, त्यांनी मनपाच्या झोन क्र. १ ते १० मधील समाज विकास विभागाशी संपर्क साधावा, ज्यांचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे, त्यांनी योजनेनुसार विभागांना भेट देऊन योजनांचा लाभ घ्यावा. ज्यांचे कर्ज अर्ज बँकेकडे प्रलंबित आहेत, त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह बँकेला भेट देऊन 'लोक कल्याण मेळावा' अंतर्गत आयोजित शिबिराचा लाभ घ्यावा. असे आवाहन करण्यात आले आहे.

# दीक्षाभूमी परिसरात नियंत्रण कक्षाचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते उद्घाटन




■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

६९ व्या धम्मचक्र प्रवर्तनाच्या कार्यक्रमाला नागपुरात येणाऱ्या लाखो अनुयायांना आवश्यक नागरी सुविधा पुरविण्यासाठी नागपूर महानगरपालिकेचे पूर्ण प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सोहळ्यासाठी आलेल्या अनुयायांना नागरी सुविधांची माहिती देण्यासाठी दीक्षाभूमी परिसरात महानगरपालिकेने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याजवळ उभारलेल्या नियंत्रण कक्षाचे मंगळवारी (ता:३०) डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन (ता. ३०) करण्यात आले. यावेळी दीक्षाभूमी परिसरात महानगरपालिकेने पुरविलेल्या नागरी सुविधांची माहिती संकलित केलेल्या व्यवस्थापन माहिती पुस्तिकेचे प्रकाशन सुद्धा आयुक्त डॉ. चौधरी यांच्या हस्ते झाले.

यावेळी अतिरिक्त आयुक्तवसुमना पंत, वैष्णवी बी, मुख्य अभियंता मनोज तालेवार, उपायुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त राजेश भगत, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, मुख्य अग्निशमन अधिकारी तुषार बारहाते, उपद्रव शोध पथकाचे पथक प्रमुख वीरसेन तांबे, कार्यकारी अभियंता सर्वश्री रवींद्र बुंधाडे, राजेश दुफारे, श्रीकांत वाईकर, राजेंद्र राठोड यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. हा नियंत्रण कक्ष २४ तास सुरू राहणार आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा सोहळा हा नागपूरचा एक अभिमानाचा व गौरवाचा भाग असल्याचे सांगून डॉ. चौधरी यांनी राज्यातून व परराज्यातून येणाऱ्या धम्म बांधवांना चांगल्या सुविधा देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. त्यांना नागरी सुविधा देण्यासाठी सर्व व्यवस्था महानगरपालिका प्रशासनाने केली आहे. लाखोंच्या संख्येने येणाऱ्या या अनुयायांना नागरी सुविधा पुरविणे हे एक आव्हान आहे. पुढील तीन दिवस महानगरपालिकेचे अधिकारी व सर्व कर्मचारी अहोरात्र काम करीत आहेत. परंतु, अनुयायांच्या अडचणी दूर करण्याची जबाबदीर आपली आहे. या भावनेने सर्व कर्मचाऱ्यांनी काम करावे व या पवित्र सोहळ्याला उपस्थित राहून आपल्या गावी जाणाऱ्या अनुयायांच्या मनात नागपूरची एक चांगली प्रतिमा निर्माण झाली पाहिजे, यासाठी आपण सर्व काही दिवस प्रयत्न करू या, असे आवाहन त्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी केले.

प्रारंभी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी व अतिरिक्त आयुक्तवसुमना पंत यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत उपायुक्त मिलिंद मेश्राम यांनी केले. तर अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांचे स्वागत कार्यकारी अभियंता रविंद्र बुंधाडे यांनी केले.



सर्वशक्ती शारदा उत्सव मंडळ, देवाळकरपुरा, भिवापूर

# नागपूरात भव्य बीआरडीएस डिझाइन प्रदर्शन



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :

भंवर राठोड डिझाइन स्टुडिओ तर्फे आयोजित BRDS डिझाइन प्रदर्शन २०२५ नागपूरातील द नक्षत्र बॅंक्वेट येथे उत्साहात पार पडले. भारतातील सर्वात मोठे डिझाइन प्रदर्शन म्हणून उदयास आलेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी महाराष्ट्र सरकारचे अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल, युनेस्कोचे अध्यक्ष डॉ. वेदप्रकाश मिश्रा, राष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रम प्रमुख डॉ. रजनीश चौहान तसेच मिस नेशन २०२५ विजेत्या जान्हवी जेठानी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या भव्य प्रदर्शनात कलाकृती, 3D मॉडेल्स, फॅशन डिझाइन्स, कॅनव्हासेस आणि विविध कलात्मक निर्मितीचे दर्शन घडले. पंधरा प्रमुख शहरांमध्ये दरवर्षी आयोजित होणारे हे प्रदर्शन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व्यासपीठ ठरते. यंदा ५,००० हून अधिक अभ्यागतांनी या कार्यक्रमाला भेट दिली. BRDS चे संस्थापक व अध्यक्ष डॉ. भंवर राठोड यांनी करिअर सेमिनार घेतला, ज्यामध्ये NID, NIFT, NATA आणि UCEED सारख्या राष्ट्रीय प्रवेश परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी उपयुक्त टिप्स दिल्या. तसेच देशातील २५ हून अधिक आघाडीच्या डिझाइन महाविद्यालये व विद्यापीठांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना थेट मार्गदर्शन व समुपदेशन केले.

गेल्या २० वर्षांत ८५ वर केंद्रांद्वारे ८००० हून अधिक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत BRDS ने डिझाइन व आर्किटेक्चर प्रशिक्षण क्षेत्रात देशातील अग्रणी संस्था म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे.

# सुधीर खुबाळकर यांनी लावला हरवलेल्या इकबाल रशीदचा सुगावा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ३० :



इकबाल मोहम्मद रशीद वय 28 वर्ष राहणार गाजियाबाद युपी हा मानसिक चिंतेमध्ये असल्याने त्याला ताजुद्दीन बाबाचे आशीर्वाद घेण्यासाठी नागपूर येथे मोठा ताजबाग दर्गा येथे आणले होते तो दिनांक 30 मार्च 2025 रोजी सहा महिन्यांपूर्वी आईच्या हाताला झटका मारून हरवला होता. त्याला सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सुधीर खुबाळकर पोलीस ठाणे सक्करदरा नागपूर यांनी अथक प्रयत्न करून शोधून काढून त्याला आस्था निवारा केंद्र नागपूर येथे ठेवण्यात आले व मिसिंग इसमाच्या घरच्या परिवाराशी संपर्क करून त्यांना नागपूरला बोलावून परिवाराच्या ताब्यात दिले.



सार्वजनिक नवदुर्गा उत्सव मंडळ, तेलीपुरा भिवापूर

# माजी आमदार सुधीर पारवे यांचा भिवापूर तालुक्यात पिक पाहणी दौरा



■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. ३० :

तालुक्यातील चिखलापार, महालगाव, पांजरेपार,नांद, टाका, जवळी, नक्षी येथिल अतिवृष्टीग्रस्त भागाला भेट देऊन नुकसान झालेल्या शेती पिकांची माजी आमदार सुधीर पारवे यांनी खंड विकास अधिकारी डॉ. चेतन जाधव, तालुका कृषी अधिकारी सुप्रिया कोकणी, नायब तहसीलदार प्रवीण राठोड यांच्या समवेत पाहणी केली.

यात सलग झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणावर उभ्या पिकांचे नुकसान झाले असून शेतकरी हवालदिल झाले आहे,शेती पिकांचे नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे तात्काळ करून घ्यावेत. नुकसान भरपाई मिळावी अशा सुचना यावेळी सुधीर पारवे यांनी अधिकाऱ्यांना केल्या.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार उभी असुन त्यांना ठामपणे मदत करेल. यावेळी दौऱ्यात खरेदी विक्री संस्थेचे सभापती भास्कर येंगळे, सुधाकर बोरकुटे, अरविंद चौधरी, किशोर मॉर्गनवार, किरण वरघने, त्र्यंबक उमक, अनिकेत वराडे, शितल राजूरकर, मोहन धारने, सुयोग पांचाळ, यांच्या सह ग्रामसेवक, तलाठी कृषी सहाय्यक संबंधित विभागाचे कर्मचारी शेतकरी बांधव उपस्थित होते.

## महासागर प्रभाग वार्ता

# इंदोरा चौकात गटार लाईन खचली; मुख्य रस्त्यावर साचले घाण पाणी

प्रमोद जांभूळकर,
नागपूर दि.३०

उत्तर नागपूरमधील आशीनगर झोन क्र. ९ मधील प्रभाग क्र. ७ अंतर्गत येणाऱ्या इंदोरा चौक मॉडल टाऊन परिसरात मुख्य गटार लाईन चोकअप व खचल्यामुळे परिसरात घाण पाण्याचा साठा निर्माण झाला असून, नागरिकांचे आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



विशेषत: बजरंग पान मंदिरासमोर गटाराचे टाके खचले असून, मुख्य रस्त्यावर मोठमोठे खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडीसह अपघाताचा धोका वाढला आहे. याच मार्गावरून अनेक शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी आणि कर्मचारी रोज जात असतात.

दसऱ्यानिमित्त इंदोरा परिसरात लाखो बौद्ध अनुयायी भेट देणार असल्याने समस्या अधिक गंभीर बनली आहे. जपानहून येणाऱ्या अतिथींसमोर 'स्वच्छ नागपूर'चा विपरीत चेहरा सादर होण्याची भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

दीड महिना काम सुरु, पण दुरुस्ती नाही

प्रविण पाटील यांनी सांगितले की, इंदोरा चौक विकासाच्या विळख्यात सापडला आहे. मागील दीड महिन्यापासून येथे काम सुरु आहे, पण अजूनही दुरुस्तीचे नाव नाही. पंजाब डेअरीसमोर सुमारे सहा फूट खोल खड्डा आहे, ज्यात एक माणूस पडला होता. त्याला स्थानिकांनी वाचवले. उद्या काही मोठा अपघात झाला, तर जबाबदार कोण?

सानिध्य जांभुळकर म्हणाले, धम्मचक्र प्रवर्तन दिन अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. विविध राज्यांतील भाविक येतात. जपानहून ससाई भंतेजी आणि ओळखीचे जपानी नागरिकही येणार आहेत. अशा वेळी इथे साचलेले घाण पाणी आणि रस्त्यांवरील खड्डे ही नागपूरच्या स्वच्छतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

सामाजिक कार्यकर्ते कुणाल निमगडे, अजय सहारे, राजेश वासनिक, नवीन शहारे, विवेक देशपांडे, राजेश राऊत, विनय घरडे, अरुण शेंडे, रविंद्र जनबंधू, दिलीप भोतमांगे, प्रशांत साखरे, देवा सहारे, बॉबी वालदे, सुधीर खोब्रागडे, सतीश जांभुळकर आदींनी आशीनगर झोनचे सहाय्यक आयुक्त हरीश राऊत यांना दसऱ्यापूर्वी गटार लाईनची दुरुस्ती व रस्त्यांवरील खड्ड्यांची तात्काळ दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

# आरमर टाऊन कॉलनीत सिव्हर लाईन ठप्प; नागरिक त्रस्त

प्रभू गजभिये,
नागपूर दि. ३०

प्रभाग क्र. २ अंतर्गत येणाऱ्या आरमर टाऊन कॉलनी आणि समोरील रॉय विहार हाऊसिंग सोसायटी परिसरातील सिव्हर लाईन गेल्या काही महिन्यांपासून पूर्णतः बसली असून, रस्त्यावर साचणाऱ्या घाण पाण्यामुळे दुर्गंधीचे वातावरण निर्माण झाले आहे. या दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, संबंधित शासकीय यंत्रणा समस्येकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.



ही समस्या गेल्या चार महिन्यांपासून सुरू असून, नागपूर महानगरपालिका आशी नगर झोन क्र. ९ अंतर्गत ही सिव्हर लाईन येते. स्थानिक नागरिकांनी वारंवार प्रभागातील नगरसेवक, तसेच मनपा आयुक्त यांच्याशी संपर्क साधून समस्या मांडली; मात्र कोणतीही ठोस कारवाई झाली नाही.या पार्श्वभूमीवर बहुजन समाज पक्षाचे उत्तर नागपूर विधानसभा माजी महासचिव विवेक किशोर सांगोडे यांनी पुढाकार घेत मनपाच्या ऑनलाइन पोर्टलवर तक्रार दाखल केली तसेच लेखी निवेदने देत झोन अधिकारी आणि हेल्थ ऑफिसर यांच्याशी सातत्याने चर्चा केली. त्यानंतर, झोन क्र. ९ कडून जेसीबी मशीन पाठवून तात्पुरती नाली तयार करण्यात आली.मात्र, मूळ सिव्हर लाईन दुरुस्तीसाठी जेव्हा प्रत्यक्ष काम सुरू करण्यात आले, तेव्हा महावितरण विभागाची ११ केव्ही हायटेंशन लाईन अडथळा ठरली. त्यामुळे काम पुन्हा थांबवण्यात आले. मनपाकडून महावितरणला याबाबत लेखी निवेदन दिलं गेलं असलं तरी आजतागायत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. नागरिकांच्या म्हणण्यानुसार मनपा आणि महावितरणच्या यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव असल्यामुळे त्यांना घाण, दुर्गंधी आणि रोगराईचा सामना करावा लागत आहे. सततचे दुर्लक्ष आणि ढिसाळ कारभारामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.जनतेच्या जिवाशी खेळण्याचं कंत्राट या शासकीय कार्यालयांनी घेतलं आहे का?असा सवाल नागरिक विचारत आहेत.